# माणूस




फेब्रुवारी – १९६३

मूल्य एक रुपया

**आर्तत्राणाय नः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि**

वर्ष दुसरें : अंक नववा

•

फेब्रुवारी १९६३



: संपादक :

श्री. ग. माजगावकर

## स्वरुप-दर्शन


| | | |
|---|---|---|
| सामाजिक अंतरंग | : | ' योगभ्रष्ट ' : अन्नदाशंकर राय.<br>मी पाहिलेला लाल हुकुमशहा : रा. म. शास्त्री. |
| कथा | : | अँटन चेकॉव्ह : दत्ता सावळे : ग. ना. वालावलकर. |
| कविता | : | भालचंद्र पत्की : सुमन करमरकर : केशव बोबडे : भगवंत भाटे. |
| समीक्षा | : | व्रती आणि अरविंद गोखले : प्रा. भीमराव कुलकर्णी. |
| विविध विषय-विभाग | : | ना. स. करंदीकर : सुधीर दामले : पु. ना. ओक<br>एस्. ए. कुलकर्णी : रंगा मराठे. |


मुखपृष्ठ : माधव शिंदे

**आमचीं शस्त्रें हीं पीडितांच्या रक्षणासाठीं; निरपराध्यांच्या हत्येसाठीं नव्हेत.**

---

पत्रव्यवहाराचा पत्ता

' माणूस, ' मराठी मासिक

४१९ नारायण पेठ, पुणें २.

• • •

वार्षिक वर्गणी : आठ रुपये

किरकोळ अंक : एक रुपया

सूचना

(१) कथासाहित्य किंवा लेख पाठविताना सोबत टपालखात्याच्या नवीन नियमानुसार पुरेसें टपाल हशील पाठवावे

(२) कविता पाठविताना, कविता नापसत ठरून ती परत हवी असल्यास पुरेसे टपाल हशील पाठवावे.

(३) नापसत साहित्य जर परत नको असेल तर केवळ निर्णय कळविण्यास पुरेसे टपाल हशील पाठविल्यास निर्णय कळविण्यात येईल व असें साहित्य निकालात काढलें जाईल.

(४) प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

(५) या मासिकात व्यक्त झालेली मतें ' माणूस ' मासिकाच्या चालकाचीं अधिकृत मते असतातच असे नाही.




## संपादकीय

# बोलें तैसा चालें !

एकीकडे लडाखमधूनहि चीन आपलें उरलें-सुरलेलें सैन्य मागें घेत असल्याच्या वार्ता येत आहेत तर दुसरीकडे सिक्कीम–भूतानच्या सरहद्दीवर चीनी सैन्याची बरीच मोठी जमवाजमव सुरू आहे असेंहि कानांवर येत आहे. दोन्ही घटना शेजारी शेजारी ठेवल्या कीं चीनच्या गनिमी युद्धतंत्राचा बोध चटकन् होतो. शांतता कीं युद्ध असा एकटोकी व एकमार्गी विचार चीनी कम्युनिस्टांनीं यापूर्वी कधींच केलेला नाहीं. 'कम्युनिझमचा प्रसार' हें ध्येय व त्यासाठीं कधीं शांततेची आरोळी, तर कधी युद्धाची मुसंडी, तर कधीं अंतर्गत उठावण्या असा बहुमुखी व लवचिक कार्यक्रम चीनी नेत्यांसमोर नेहमीं असतो. एक ठाम सैद्धांतिक निष्ठा व तिच्यासाठीं अहोरात्र सातत्यानें व चिकाटीनें प्रयत्नशील राहण्याची जिद्द असल्याखेरीज असें बहुमुखी व लवचिक तंत्र अवलंबतां येत नाहीं. या दोन्ही बाबतींत आमचे राज्यकर्ते उणे पडत आहेत. म्हणूनच चीन आक्रमक असूनहि बदनाम व एकाकी मात्र आपण ठरत आहोंत.

कोलंबो योजनाच घ्या. मुळींत आठ सप्टेंबरची अट हीच पहिली चूक. आठ सप्टेंबरच्या रेषेवर चीन असतांनाच कांहींहि तडजोड निघूं शकत नाहीं म्हणून पूर्वीच वाटाघाटी बंद करण्यांत आल्या. आतां जरी चीन आठ सप्टेंबरच्या रेषेवर गेला तरी अशी कोणती नवी परिस्थिति उदभवली आहे कीं, ज्यामुळें त्यावेळीं बंद पडलेल्या वाटाघाटींतून आतां कांहीं नवी तडजोड–योजना निघूं शकेल ? आठ सप्टेंबर रेषेवर चीन गेला तरी १२ हजार चौरस मैलांचा प्रदेश चीनच्या ताब्यांत राहतोच. वाटाघाटींनीं हा प्रदेश आपल्याला मिळत नाहीं हें पूर्वीच सिद्ध झालें. आतां पुन्हा वाटाघाटी करून तो मिळणार आहे कां ? याची सुतराम् शक्यता नाहीं. मग युद्ध हा एकच पर्याय राहतो. तें केव्हां, कसें करायचें हा प्रश्न अलग. पण तत्त्वतः दुसरा पर्याय नाहीं. किंवा १२ हजार चौरस मैलांवर पाणी सोडण्याची तयारी ठेवायची. जशी १–३ काश्मिरवर पाणी सोडण्याची आपण तयारी चालवलेली आहे तशी. पण हा दरवाजा सध्यां तरी बंद आहे असें वाटतें. कारण २९ ऑक्टोबर १९६२ रोजीं देशांतील कोटयवधि जनतेला राज्यकर्त्यांनीं शपथ घ्यायला लावली आहे कीं, इंच इंच भूमीहि मुक्त करूं. १४ नोव्हेंबर १९६२ रोजीं लोकसभेनें एक गंभीर प्रतिज्ञा घेतलेली आहे कीं,–' भारत की पवित्र भूमीसे हमलावारोंको खदेड कर ही रहेंगे. चाहे जितना भी लंबा व कठिन संघर्ष क्यों न करना पडे !' 'सत्यमेव जयते' चें ब्रीद मिरवणाऱ्या राज्यकर्त्यांकडून या शपथांचा, प्रतिज्ञांचा भंग होईल असें वाटत नाहीं. निदान होऊं तरी नये.

शिवाय कोलंबो–योजना ८ सप्टेंबरच्या योजनेशीं मिळती-जुळती आहे असें पंडितजी म्हणाले तरी त्यावर जनतेचा विश्वास कसा बसावा ? कारण चीनलाहि ही योजना आपल्या भूमिकेशीं मिळती-जुळती वाटते आहे. ८ सप्टेंबरची भूमिका चीनला मान्यच करा-


वयाची होती तर पंडितजी ती आक्रमणाच्या दिवसापासून मांडतच होते. तेव्हां ती चीननें कां स्वीकारली नाहीं? नक्कीच तेव्हांपेक्षां आतां कांहींतरी अधिक चीनच्या पदरांत पडत आहे. जनतेपासून हें लपवलें जात आहे. पार्लमेंटची मान्यता हें एक नाटक आहे. कारण पंडितजींनीं आपली अनुकूलता जाहीरहि करून टाकली आहे.

सैनिकी पराभवामागोमाग राजनैतिक पराभवाचीहि पाळी आपल्यावर आली आहे. आक्रमणाचा धक्का देऊन वाटाघाटीच्या टेबलावर भारताला खेचून आणण्याचें चीनचें तंत्र आम्हांला अजूनहि उमगलें नाहीं. वास्तविक आक्रमण झाल्याबरोबर भारतानें निग्रहानें एकाच भूमिकेवर उभें राहायला हवें होतें, की 'बळकावलेला सर्व मुलूख प्रथम खालीं करा. मग वाटाघाटी !' मुलुख खालीं होईपर्यंत भारत आणि चीन हीं युद्धमान राष्ट्रें. मुलुख खालीं झाल्यावर आंतरराष्ट्रीय न्यायाप्रमाणें जो समझौता होईल तो उभयतांवर बंधनकारक.

चीनच्या धक्का प्रयोगामुळें आलेल्या भोंवळींतून आम्ही भानावर येतों न येतों तोंच तिबेटमध्यें सिक्कीम-भूतानच्या निर्वासित राजवटी चीननें स्थापन केल्याच्या वार्ता येऊन थडकल्या आहेत. आमचेकडे दलाई लामा आश्रयार्थी म्हणून तीन वर्षें हवा खात बसले आहेत. पण 'तिबेटचें निर्वासित सरकार' ही कल्पनाहि आपल्याला शिवूं शकत नाहीं. उलट तिबेटचा प्रश्न ज्यांनीं ज्यांनीं काढला त्यांना त्यांना पंडितजींनीं चक्क मर्खांत काढले. मग त्यांत आमचे पहिले राष्ट्राध्यक्ष अजातशत्रू राजेंद्रबाबू यांचाहि समावेश झाला. उलट कोणतेंहि सबळ कारण नसतांना चीन मात्र सिक्कीम-भूतानच्या प्रचलित राजेशाही राजवटींविरुद्ध बंडाच्या हालचाली करणाऱ्या राजवटींना मान्यता देणें असें नव्हें, तर स्थापनेंत प्रत्यक्ष पुढाकार घेतो. यापुढें सिक्कीम भूतानच्या सरहद्दीवर वटवटी ओघानें आल्याच. पाठोपाठ अंतर्गत भागांत शस्त्रास्त्रेंहि रवाना होणारच. आणि दुर्दैवानें अशीच परिस्थिति चालू राहिली तर 'एक दिवस सिक्कीम–भूतानच्या जनतेनें सरंजामशाहीविरुद्ध उठाव करून नवी राजवट स्थापन केली' ही वार्ताहि कानावर आली तर नवल नाहीं.

दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास वरून वरून जरी नजरेखालीं घातला तरी हिटलरी तंत्र चीनी नेते कसें व्यवस्थित अंमलांत आणत आहेत हें स्पष्टपणें दिसून येते. शांततेची भाषा बोलत बोलतच हिटलरनें प्रथम ऑस्ट्रिया घेतला, नंतर सुडेटन जर्मन मिळविला नंतर झेकोस्लोव्हाकिया घशांत घातला आणि पोलंडवर उघड उघड स्वारी करेपर्यंत युरोपांतील एकहि सत्ताधीशाचे डोळे उघडले नाहींत. उलट त्याच्या आक्रमक वृत्तीला खतपाणी मिळेल अशीच तहाचीं, शांततेचीं बोलणीं करण्यांत दोस्त राष्ट्राचे मुत्सद्दी भूषण मानत होते. 'तह नको, वाटाघाटी नकोत' असें बजावणाऱ्या चर्चिलसारख्या एखाद्या माणसाला 'युद्धपिपासू' अशीं शेलकीं विशेषणें बहाल केलीं जात होतीं. पण इतिहासानें सूड घेतला. ज्यांनीं शांततेचीं प्रवचनें झोडलीं तेच हिटलरच्या उदयास आणि वाढीस कारणीभूत ठरले आणि जें युद्धखोर म्हणून हिणवले गेले तेच संहारापासून युरोपचा बचाव करूं शकले. युद्धापासून दूर पळण्यानें युद्ध टळत नाहीं. युद्धाला तोंड देणारेच शांततेचेहि खरेखुरे धनी होऊं शकतात. हिंसेनें हिंसा वाढत जाते हें खरें. पण दुर्बलांच्या अहिंसेनें जेवढी हिंसा वाढते तेवढी हिंसेच्या हिंसात्मक प्रतिकारानें वाढत नाहीं असा खुद्द आपलाच गेल्या पंधरा वर्षांतील अनुभव आहे. या अनुभवाची पुनरावृत्ती नको म्हणूनच एकदां उद्दिष्टें व मार्ग पक्के करा. आणि जें ठरेल त्यावर भक्कमपणें उभें राहा. बारा हजार चौरस मैल चीनला दान करायचे असतील तर वाटाघाटींना बसा; नाहींतर 'कर्तव्य नाहीं' अशी स्वच्छ पाटी लावून युद्धाची तयारी करा. मग त्यासाठीं तिबेटवर आक्रमक युद्ध करण्याची वेळ आली तरी मागेंपुढें पाहूं नका. कारण शत्रू घरांत आला तर आपण त्याच्या घरांत जाणें यांत कांहींच चूक नाहीं.

● ● ●



# विद्यार्थ्यांचे प्रश्न : प्राध्यापकांचीं उत्तरें

२४ डिसेंबर १९६२ रोजीं पुणें येथील शाहू महाविद्यालयाच्या वतीनें शंकासमाधानाचा एक अभिनव कार्यक्रम झाला. विद्यार्थ्यांच्या मनांत भारत-चीन युद्धाविषयीं ज्या कांहीं शंका-कुशंका उद्भवत असतील त्या त्यांनीं मोकळेपणानें आपल्या प्राध्यापकांसमोर मांडाव्यात व प्राध्यापकांनीं या शंकांचीं उत्तरें विद्यार्थ्यांसमोर ठेवावींत अशी योजना होती. विद्यार्थ्यांनीं आपले प्रश्न लेखी स्वरूपांत चार दिवस आधीं ठेवण्यांत आलेल्या एका स्वतंत्र पेटींत टाकले व या प्रश्न-चिठ्ठ्यांची वर्गवारी करून विविध विषयांच्या प्राध्यापकांकडून या प्रश्नांना उत्तरें देण्यांत आलीं. हें काम मुख्यतः प्राचार्य मंगुडकर, प्रा. दुधिले, प्रा. ताकवले, प्रा. माळशे, प्रा. खार, प्रा. तळवंडी यांनीं केलें. डॉ. चाफेकर यांनीं या कार्यक्रमाचें संयोजन केलें.

कांहीं महत्त्वाचे प्रश्न व त्यांचीं उत्तरें येथें सादर करीत आहोंत--

# राष्ट्र संयोजित आघाडी

प्रश्न :–चीनच्या आक्रमणाचा फायदा घेऊन देशांतील लोकशाही व समाजवाद यांच्या विरोधी शक्ति डोकें वर काढीत नाहींत काय ? ही परिस्थिती अशीच ५–६ वर्षे चालली तर देशांतील लोकशाही व समाजवाद यांच्या शक्ति दुबळ्या होणार नाहींत काय ?

उत्तर :–ही भीति पुष्कळ अंशीं खरी आहे. यासाठीं हें युद्ध म्हणजे केवळ दोन देशांतील युद्ध नव्हे तर तें मूलत: लोकशाही व हुकूमशाही या जीवनमूल्यामधील युद्ध आहे.

या विचारावर अधिक भर दिला पाहिजे. युद्धाचे हें तात्त्विक वा वैचारिक अधिष्ठान स्पष्ट केलें तर वरील धोका कमी होईल.

प्रश्न :–चीननें भारतावर आक्रमण कां केलें असावें ?

उत्तर :–याला दोन कारणें संभवतात. हिंदुस्थान हा आशिया वा आफ्रिका या खंडांतील नव्यानें स्वतंत्र झालेल्या सर्व राज्यांचें नेतृत्व आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न करीत होता. या प्रयत्नाला सुरुंग लावावा व हें नेतृत्व आपल्याकडे घ्यावें हें पहिलें कारण संभवलें. दुसरें १९५० सालीं आशियामधील या दोन प्रचंड देशांनीं एकाचवेळीं प्रगतीस सुरुवात केली. परंतु ही दोन्हीं अर्ध प्रगत राष्ट्रें दोन भिन्न मार्गानें म्हणजे लोकशाही व साम्यवाद या वाटेनें जात होतीं. हिंदुस्थानने लोकशाही मार्गानें पुष्कळ यश मिळविलें. हिंदुस्थानने हा मार्ग यशस्वी केला तर साम्यवादाचा आधार आशिया व आफ्रिका खंडांतून ढासळेल अशी त्याला भीति वाटली असावी. हिंदुस्थानचा विकास लोकशाही मार्गानें होऊं देऊं नये म्हणून मुद्दाम सरहद्दीवर हें युद्ध धुमसत ठेवावें व करोडं रुपये विकास योजनेकडून युद्धाकडे खर्च करायला लावावे व सर्व विकास योजना विस्कळित कराव्या असाहि हेतु असण्याचा संभव आहे?

प्रश्न :–भारताचें परराष्ट्रीय धोरण चुकलें असें म्हणावें कां ?

उत्तर :–आपलें तटस्थतेचे धोरण मुख्यत: आपल्या आर्थिक विकासांतून जन्माला आलें. मागासलेल्या राष्ट्राला आर्थिक विकास करायचा तर युद्धांत पक्ष घेऊन भागत नाही. आपला आर्थिक विकास आतांपर्यंत झाला, याचें रहस्य आपल्या तटस्थतेच्या धोरणांत आहे. यादृष्टीनें आपण आपल्या परराष्ट्रीय धोरणाकडे पाहिलें पाहिजे.

प्रश्न :–पं. नेहरू रशियाने दिलेल्या ५–६ मिग विमानानें कौतुक करतात परंतु अमेरिकेच्या करोडो रुपयांच्या मदतीचा फारसा उल्लेखहि करीत नाहींत. या धोरणानें आपण इंग्लड, अमेरिकेसारख्या पाश्चात्य लोकशाही राष्ट्राकडून आर्थिक मदत मिळवूं शकूं कां ?

उत्तर :–आपल्या या धोरणाचा आपल्याला मिळणाऱ्या मदतीवर अनिष्ट परिणाम होण्याचा संभव आहे असें कांहीं विचारवंत मानतील. परंतु इंग्लड-अमेरिका देत असलेली मदत मुख्यत: लोकशाहीच्या रक्षणासाठीं असल्यामुळें त्याचा फार वाईट परिणाम होणार नाहीं.

प्रश्न :–चीननें आक्रमण करून मध्येंच पुन्हां एकतर्फी युद्ध तहकुबी कां जाहीर केली ?

उत्तर :–रशियानें चीनवर दडपण आणून त्याला हें करायला भाग पाडलें असेल असें वाटते. चीनची एकच मोठी मर्यादा म्हणजे चीनजवळ अणुबॉंब नाही. तें अमेरिकेजवळ आहे. यासाठीं आणीबाणीच्या प्रसंगीं चीनला रशियावर अवलंबून राहावें लागणार आहे कारण अमेरिकेप्रमाणें रशियाजवळ पण हा अणुबॉंब आहे. यासाठींच चीननें रशियाला भीक घातली असली पाहिजे.

प्रश्न :–ज्या गांधीवादी तत्त्वज्ञानानें देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यास मदत केली तें गांधीवादी तत्त्वज्ञान स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास दुबळें आहे असा याचा अर्थ नाहीं कां ?

उत्तर :–गांधीवादामध्यें अहिंसेला महत्त्वाचें स्थान आहे. परंतु म. गांधी दुर्बलांच्या अहिंसेपेक्षां शूरांच्या हिंसेला अधिक मानीत होते. या दृष्टीनें आणि हातांत शस्त्र घेणें गांधीवादाशीं पूर्ण सुसंगत ठरणारें आहे.

प्रश्न :–कम्युनिस्टांवर आपण राष्ट्रद्रोही म्हणून टीका करतो. परंतु त्याजबरोबर जागतिक सरकारच्या कल्पनेचा पुरस्कार करतो. राष्ट्रवाद व जागतिक सरकार यामध्यें आपली मुख्य निष्ठा कोणती ?

उत्तर :–कम्युनिस्टांवर राष्ट्रद्रोही म्हणून टीका करण्यापेक्षां लोकशाहीचे शत्रू मानवी स्वातंत्र्याचे मारेकरी म्हणून टीका करणें अधिक चांगलें.

प्रश्न :–राजाजींची ‘बफर’ राज्याची कल्पना कितपत हितावह आहे ?

उत्तर :–हे बफर राज्य दुबळें राहिलें तर कम्युनिस्ट चीनच्या भक्ष्यस्थानीं पडेल. त्याचा वाईटच परिणाम होण्याचा संभव आहे.

प्रश्न :–कम्युनिस्ट पक्षावर बंदी कां घालूं नये ?

उत्तर :–त्यामुळें ते भूमिगत होतील व अधिक उपद्रवकारक होतील. त्यांना उघडया मैदानातच पराभूत केले पाहिजे. जागरूक लोकमताच्या जोरावर या पक्षाचा बीमोड केला पाहिजे.

● ●

# योगभ्रष्ट

अन्नदाशंकर राय

कलकत्त्याच्या 'देश' साप्ताहिकाच्या सह-संपादकांनीं लेख पाठविण्याची विनंती करून पाठवलेल्या पत्रांत अन्नदाबाबूंचें हें उत्तर 'देश'च्या ५ जानेवारीच्या अंकांतून भाषांतर करून घेतलें आहे. विचारवंत साहित्यिक म्हणून अन्नदाशंकरांची ओळख वेगळी करून देण्यापेक्षां या पत्रानेंच झाली तर तें अधिक बरें.

शांतिनिकेतन
१५ डिसेंबर १९६२

कल्याणीयेषु,

तुझ्या पत्राच्या उत्तरादाखल पत्रच लिहित आहे. एकदां वाटलं होतं, गप्पच राहावं. पण जिथं बाकी सगळ्यांनींच तोंडं उघडलेलीं आहेत, तिथं एक माणूस तोंड मिटून गप्प राहिला, तर त्याचादेखील कडू अर्थ होईल.

वीस वर्षांपूर्वीची एक घटना आठवते. माझ्या एका शेजारच्या मुलाची आतां-जातो कीं—मग जातो अशी अवस्था होती. शहरांतले सगळेच्या सगळे बडे-बडे डॉक्टर बाहेर बसून सल्लामसलत करत होते. ज्याची केस त्याच्यावरच शेवटीं निर्णय घेण्याची जबाबदारी. त्यानं इतरांचा सल्ला घेतला, तर ठीक आहे. पण तरी जबाबदारी त्याचीच. त्याची एकट्याची. तेव्हां स्वतःच्या विवेकाशीं वाद त्यानंच घेतला पाहिजे. मग त्याला असं नाहीं म्हणतां येणार, कीं, मी चारजणांच्या सल्ल्यानं असा वागलों, चूक माझी एकट्याची नाहीं.

मला अजून स्पष्ट आठवतं, खूपवेळ चर्चा चालली. पण डॉक्टर गुप्त एकहि शब्द बोलले नाहींत. कां ? केस त्यांची नव्हती म्हणून ? पण ते उदासीन आहेत असं मनांतल्या-मनांत म्हणायलाहि मला बरं वाटत नव्हतं. बरीच रात्र झाली होती. निर्णय कांहींतरी एक घ्यायला हवा होता अन् डॉक्टरा-डॉक्टरांत मतभेद होता. त्यांच्यांतला एकजण तर अगदींच गप्प होता. केस त्यांची नव्हती, म्हणून काय त्यांना दयामाया नव्हती ? माझी न् त्यांची चांगली ओळख होती. डॉक्टर माणूस म्हणूनदेखील तितकेच चांगले होते.

शेवटीं डॉक्टर गुप्त उठले. व्हरांड्यांतून दोन-चार पायऱ्या उतरून खालीं आले. डॉक्टर बंद्योपाध्याय म्हणाले, "ए दुर्गादास ! अरे, तूं उठलास कां ? तुझं काय म्हणणं आहे ?" डॉक्टर गुप्त मागं वळले. म्हणाले, 'मी असतों तर हें औषध देऊन पाहिलं असतं.' असं म्हणून त्यांनीं एक औषधाचं नांव सांगितलं. मग बसलेल्या डॉक्टरलोकांनीं त्यांना धरून बसवलं. परत चर्चा झाली. पण खूपवेळ नाहीं. गाडी तयार होती. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट स्वतः येऊन पेट्रोल-कूपन देऊन

# योगभ्रष्ट

**अन्नदाशंकरराय**

गेला होता. औषध आणायला एकजण गेला. औषध आलं. औषध दिलं गेलं. मुलगा वाचला. आम्ही वाचलों.

म्हणजे बघ गप्प राहणं म्हणजे उदासीन असणं नाही. त्याचा दुसराहि काही अर्थ असणं शक्य असतं. ह्या परिस्थितीत काळजी लागून राहिली नाहीं असा कोण आहे? उद्विग्न झालेला नाही असा कोण आहे? आपण सगळेंचजण घरांतले कर्ते-पुरुष आहोंत. पण म्हणून काय आपण सगळेच डॉक्टर आहोत कां? इथं डॉक्टराची संख्या सबंध देशात तीन की चार इतकीच आहे. त्यांत निर्णय घेण्याची जबाबदारी फक्त नेहरूंच्यावर आहे. आतां त्याना रामराम ठोकून त्यांच्या जागीं दुसऱ्या कुणाला बसवाव हें घरांतल्या कर्त्या-पुरुषाकडून कसं व्हाव? अन् दुसरा माणूस तरी तिथं कसा बसेल? भोजराजा जेव्हां विक्रमादित्याच्या सिंहासनावर बसायला जात होता, तेव्हां बत्तीस बाहुल्यांनी त्याला बत्तीस गोष्टी ऐकवून शांत केल होत. नाहीं-तर भोजराजाचीच नाचक्की झाली असती. त्याच्या प्रजेचहि अमगळ झाल असत. तर आता इथं या बाबतीत नेहरूनाच आपल्या बुद्धिनुसार निर्णय घ्यायला हवा. आणखी कुणाचा सल्ला त्यास हवा असेल, तर कुणाचं काय म्हणणं असेल तें त्यान माडाव. नेहरूनीं जर तो सल्ला घेतला तर उत्तमच. पण ती जबाबदारी मात्र फक्त त्याचीच आहे.

एक गोष्ट नक्कीच तुझ्या लक्षात आली असेल, कीं विनोबा गप्प आहेत. म्हणजे जेवढं अगदीं बोलायलाच हवं, तेवढंच फक्त ते बोलले आहेत. देशाचं रक्षण केलं पाहिजे. त्याचा सर्वश्रेष्ठ उपाय--भूदान-ग्रामदान-ग्रामसंघटन-शांतिसेना. ह्या जुन्या गोष्टीच त्यांनी नव्या अवस्थेत सांगितल्या आहेत.

विनोबा तयार झालेले गांधीजींच्या तालमींत नेहरू पण तयार झालेले गांधीजींच्याच तालमीत. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी जेव्हां वैयक्तिक सत्याग्रहाचं आंदोलन सुरू करावं लागलं, तेव्हां गांधीजी म्हणाले--" विनोबा, पहिले सत्याग्रही होतील. कारण विनोबा कोणत्याहि परिस्थितीत अहिंस आहेत. त्याची प्रतिकाराची पद्धत संपूर्णतया अहिंसा आहे. दुसरा सत्याग्रही कोण होईल, याच्यावर गांधीजींनीं खूप विचार केला. जगाच्या उद्वेगजनक परिस्थितीत भारताचं भाग्य कदाचित् एक दिवस भारतीयाच्याच हातीं येईल. तेव्हां देशाला संपूर्णतया अहिंसेनं स्वतःच संरक्षण करतां येईल कां? आपण जर हयात नसलों, तर याच मार्गानं विनोबांना देशाच रक्षण करतां येईल का? आदर्शवादी गांधीजी हे वास्तववादीहि होते. म्हणून दुसरा सत्याग्रही म्हणून त्यांनीं नेहरूंची निवड केली.

तेव्हांपासून देशांतल लोकमत दोन भागात विभागलेलं आहे. एका विभागाचे प्रतिनिधि आहेत विनोबा. दुसऱ्या विभागाचे प्रतिनिधि आहेत नेहरू. शिरगणती करून कुणाच्या पक्षात जास्ती लोक आहेत, हें कळायला काहीं मार्ग नाही. कारण देशाच रक्षण कोणत्या पद्धतीनं करावं, या प्रश्नावर मतं घेतलेलीं नाहीत. मतदानात विनोबाजींची जीत झाली, तर प्रधानमंत्रीपदाची जबाबदारी ते घेतील का? सशस्त्र प्रतिकाराऐवजीं निरस्त्र प्रतिरोधाचा आदेश ते देतील का? जवानांच्या बदली शांतिसैनिकांना लडाख अन् नेफात पाठवितील का? त्यांना तसं वाटलं, तरी देशातल्या लोकांना तसं वाटणार नाहीं. ती हिंमत आमच्यात नाही. त्याच्याकरतां देश तयार झालेला नाहीं. अन् केव्हाच नव्हता. काश्मीर रक्षण करण्याकरतां सशस्त्र सैनिक पाठवण्याच्या प्रस्तावाला संमति द्यायला गांधीजींनाहि भाग पडलं होतं. तिकडे शांतिसैनिक पाठवले असते, तर कदाचित् आदर्शाच रक्षण झालं असतं, पण काश्मीरच झाल नसतं. अन् ज्याअर्थी उद्देश काश्मीरच्या रक्षणाचा होता, त्याअर्थी तेव्हांच्या परिस्थितींत योजून पाहण्याजोगा उपाय फक्त एकच होता--सशस्त्र सैन्य पाठवणं. गांधीजींना हें समजत होतं, उमजत होतं म्हणून खेदानं त्यांनी तें मान्य केलं.

आजच्या परिस्थितीत विनोबानादेखील देशरक्षणाचा चिरकाळचा उपायच मानून घ्यावा लागतो आहे. पण इतिहासाशीं त्यांची अशी प्रतिज्ञा आहे, कीं देशाचं रक्षण करण्याकरितां अहिंस उपायदेखील निघाला पाहिजेल, वापरून पाहिला गेला पाहिजे. भारत हा एकटाच देश आहे, जिथं हा प्रयोग सफळ होण्याची किंचित्-का-होईना शक्यता आहे. तसं अजिबातच नसतं, तर पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड झाली नसती, अन् झाली असती तर विनोबानीं तें मान्य केल नसत. तसच विनोबांच्यासारखा लायक इसम मिळाला नसता, तर गांधीजींनीहि जगांतल्या लोकांना अशा जबरजस्त कसोटीच्या गोष्टी ऐकवल्या नसत्या. कारण नाहीतर ते हास्यास्पद झालं असतं. इतिहास रुळलेल्या चाकोरीनं गेला असता. गांधी-टॉलस्टॉय यानीं अरण्यरुदन केलं असं झालं असतं. आता विनोबा जर आपल्या श्रद्धेत दृढ होऊन राहिले, तर इतिहास त्यांनाहि एक संधि देईल अशी शक्यता आहे. भारताच्या मेलेल्या हाडात काही सजीवता आहे, असं गांधीजींच्या नेतृत्वाच्या आधी कुणाला वाटल होत का? मला एकदां वाटल होतं. एकदा वाटल नव्हतं. परत एकदा वाटल होतं नि परत एकदा वाटलं नव्हतं. मी जेव्हां महात्माजींची भेट घेतली, तेव्हां वैयक्तिक सत्याग्रह सुरू व्हायचा होता. इकडे दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात होऊन गेली होती. मला ते खूप काळजीत असल्यासारखे दिसले. इतकी मोठी कसोटी त्यांच्या आयुष्यात आली नव्हती मी म्हणालों, " आपण करून दाखवा मग माझा विश्वास बसेल."

हे एक दिवस भारताला करून दाखवतां येईल का? माझं बुद्धिवादी मन म्हणतं, 'काय वेड-बीड लागलय् काय? अहिंसेनं देशाच रक्षण!' सोन्याचीं कौल हो चालू शतकातली चीज नव्हे.' पण माझ्यात एक-जण सृष्टिवादीहि आहे. तो म्हणतो, 'प्रकृति नित्य नवी सृष्टि करत चालली आहे. माणूस पण नित्य नवी सृष्टि करत-करत सुसंस्कृत

झाला आहे, जास्ती-जास्ती सुसंस्कृत झाला आहे. प्रयत्न केला तर अगदींच सुसंस्कृतदेखील होईल. हायड्रोजन बॉंबनंतर काय ? एकतर प्रलय, नाहीतर सृष्टि-सृष्टीच्या वाटेनंच माणसाला जायला हवं. डिनोसेरासप्रमाणें नामशेष होऊन जायचीच त्याची इच्छा असेल तर अर्थात् निराळं. त्याला वाट कोण दाखवणार ? हे गांधी. हे विनोबा. हा अर्धा भारत जो आज पायी चालत तपस्या करत आहे, ज्याच्या मनात काडीइतकीसुद्धा भीति नाही, ज्याचं अंतःकरण विश्वप्रेमानं तुडुंब भरलेलं आहे."

साऱ्या भारतानं आज देशाच्या रक्षणाचा संकल्प केला आहे. ह्या बाबतीत दुमत नाहीं. पण देशाच्या रक्षणाची पद्धत काय असावी याबद्दल मात्र मतभेद आहे. दोन्ही मत तितकीच प्रामाणिक आहेत. तितकीच खरीं आहेत. नेहरूंना जशी त्यांच्या मताप्रमाणें काम करायची मुभा दिली पाहिजे, तसच विनोबानाहि त्यांच्या श्रद्धेनुसार नि सामर्थ्यानुसार काम करू दिलं पाहिजे. कुणीं कुणाला अडथळा केला नाहीं म्हणजे झालं. हा भारत कांहीं सामान्य देश नव्हे. इथं तीन हजार वर्षांचा इतिहास मिळाला आहे, आणखी दोन हजार वर्षांचीं चिन्हं शोधली तर सापडतील. या देशात किती तऱ्हेची निरख पारख झाली आहे ! ज्याच्या ऋषीनादेखील गोमांस प्रिय होत, तें आता गोमांसाच्या जवळपासदेखील जात नाहींत त्यांच्यांतली बहुसंख्य मंडळी मांसदेखील खात नाहीत. ही पांच हजार वर्षं आपण काही गवत उपटण्यांत काढलेली नाहींत. अहिंसेंत आपण खूप मजल मारली आहे. रामायण-महाभारताच्या पायावर आपला समाज उभा आहे या दोन्ही महाकाव्यांचा मुख्य विषय एकच आहे— सत्याचा महिमा. दोन्ही नायक सत्यसंध आहेत. युद्धकाळांत युधिष्ठिर अर्धसत्य बोलला होता, म्हणून त्या पापाचं परिमार्जन म्हणून त्याला नरकात राहावं लागलं— सत्यावर इतका भर कधीकाळीं कोणत्यातरी देशात दिला गेला आहे का ?

देशाचं अर्धं मन हिंसेंत, अन् अर्धं अहिंसेंत आहे हीच आमची शोकांतिका आहे. सोळा-आणे हिंसेकरतां तयारी नाहीं, सोळा-आणे अहिंसेकरता पण तयारी नाहीं अहिंसेकरता तयारी म्हटली की, प्रथम अहिंसा नाही, प्रथम सत्य. महात्माजींनीं वारवार इतर कोणत्याहि गोष्टीपेक्षां सत्यावर भर दिला होता. सत्य हाच ईश्वर. एखाद्या परिस्थितींत हिंसेचं समर्थन एकवेळ करतां येईल पण असत्याच मात्र कोणत्याहि परिस्थितीत करतां येणार नाहीं. देशाचं रक्षण करण्याकरता असत्य उच्चारायला हवं, असत्य आचरायला हवं, अशी मागणी कुणी करेल तर त्यामुळें भारताच्या अंतरात्म्याला पीडा होईल. युद्धांत जय मिळेल कदाचित्. पण त्याच्या नंतर लगेचच महाप्रस्थान अन् नरकवास. याखेरीज वेगळा कांही परिणाम शक्यतेच्या कोटीतला असता. तर व्यासदेवांनी तो दाखवला असता अन् तरी युद्धाची मागणी इतकी सर्वभक्षक असते, कीं तिथं पहिला बळी पडतो तो सत्याचाच. कोणत्याहि देशांत कोणत्याहि काळात असं आढळून आलं आहे, की, हिंसेच्या बरोबर असत्य असतं. अहिंसेच्या बरोबर सत्य असतं. जिथं एक पक्ष हिंसेचा आसरा घेतो, अन् अहिंसेचा दुसरा पक्ष आसरा घेतो तिथं सत्यच बनत नारायण अन् असत्य बनतं नारायणी सेवा. तरी पण साधारणतः जें घडून येतं तें असं. हिंसा विरुद्ध अहिंसा नव्हे, तर हिंसा विरुद्ध हिंसाच. म्हणून दोन्ही बाजूंना थोडं सत्य असतं, थोडं असत्य असतं.

जिथं दोन्ही पक्षांत कांहीं-ना-काहीं सत्य असतं, तिथदेखील कमी-जास्तीचा प्रश्न येतोच. या कमी-जास्ती प्रमाणावरदेखील युद्धाचं फळ अवलंबून असतं. इतिहासात निव्वळ बळजोरी खूप बाबतीत विजयी झाली आहे, म्हणून निव्वळ बळजोरीचं प्रेस्टिज अजून खूपच आहे. पण एवढ्यांत दरम्यानच्या काळात माणूस एक पायरी वर गेला आहे. म्हणून प्रत्येक वेळी युद्धकाळात तो वाद घालतो— कोणत्या पक्षाकडे न्यायाचा जोर जास्ती आहे. न्याय-अन्याय नक्की करणं, हेंदेखील आधुनिक युद्धाचं एक अपरिहार्य अंग आहे. जे युद्धांत आघाडीवर जातात, त्यांच्यात शिकलेल्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतेच आहे, त्यांना माहित करून घ्यायचं असतं, की कोणत्या बाजूला किती डिव्हिजन्स आहेत, कोणकोणती शस्त्रास्त्र आहेत, अन् त्याचबरोबर हेंहि त्यांना जाणून घ्यावसं वाटत, की कोणत्या बाजूला किती न्याय आहे. पहिल्या महायुद्धाच्या वेळेला फ्रेंचाचा सेनानी होता मार्शल फाश. नंतर तो दोस्तांच्या सैन्याचा सरसेनानी झाला होता. युद्ध जिंकल्यावर त्यानं असं लिहिलं होत, की,

" To sum up, whether we are dealing with the soldier, the high command, the nation or the Government, in each of these divisions war demands an ever-increasing share of the moral forces whose close union and wise combination are alone capable of producing victory. It is to the insufficiency of certain of these forces, or to the lack of cohesion between them, that we must look to grasp and explain the collase, in the course of the last war of certain great powers and likewise of armies of formidable repute, which in so far as they themselves are concerned, certainly did not fall short of that repute." ( Encyclopaedia Britannica 14 th Edition, Vol. 2 Army Morale in War, Page 415 ).

जे युद्धांत गुंतलेले नसतात, ते तर युद्धात पडलेल्या दोन देशांकडे दुरून पाहात असतात. त्यानाहि जाणून घ्यावसं वाटत असतं, की न्याय कुणाच्या बाजूला आहे, सत्य कुणाच्या बाजूला आहे. त्याचा नैतिक पाठिंबादेखिल युद्धकाळांत मोलाचा असतो. पहिल्या महायुद्धात अमेरिकेने इंग्लंडची बाजू घेऊन आखाड्यात उतराव कीं नाही याबद्दल अमेरिकन लोकमत द्विधाग्रस्त होत. पण हळुहळू लोकमत जर्मनीच्या विरुद्ध गेलं. याला इतर अनेक कारणात असहि एक कारण होतं, की जर्मनानी अमेरिकनाच्या न्यायबुद्धीला डिवचलं. नाहीतर अमेरिकेचा इंग्लंडशी असा काही तह झालेला नव्हता, की संकटात एकासाठी दुसऱ्यानं हाती शस्त्र धरावयालाच हवं म्हणून. स्वार्थाचं बंधन जसं होत, तशी आर्थिक स्पर्धाही पण होती. रक्ताचं बंधन तर दोन्ही बाजूंशी होत. हें जसं एक उदाहरण दिलं, तशी आणखीहि देता आली असती. आधुनिक युद्धात न्याय-अन्यायाचा प्रश्न घटनांची गति बदलूं शकतो. सुएझला काय झालं ? आपलाच रास्त हक्क आहे असं इंग्लंड अन् फ्रेंच जगातल्या लोकांना पटवून देऊं शकले नाहीत. एवढंच काय पण स्वदेशातल्या लोकांनीहि एकमुखानं पाठिंबा दिला नाही. हे जर वीस-तीस वर्षांपूर्वीं झालं

# युद्ध ही क्रिकेटची मॅच होतां उपयोगी नाहीं

**टॉलस्टॉय.**

'वॉर अँड पीस'— 'युद्ध आणि शांतता' या टॉलस्टॉयच्या जगद्विख्यात कादंबरीचा विषय केवळ युद्धहि नाहीं आणि केवळ शांतताहि नाहीं. या कादंबरीत युद्धाचें चित्र आहे—रशियन पराक्रमाचें आणि राष्ट्रीय निर्धाराचें चित्रहि आहे. पण कादंबरीचा कर्ता केवळ देशभक्त नाही,—तर मानवभक्त आहे.—केवळ विजयपूजक नाहीं, जीवनपूजक आहे! यामुळें ही कादबरी युद्धाच्या रक्तरंजित कक्षेंतून निसटून शांततेच्या धवल विश्वांत शिरली आहे. पण या असामान्य द्रष्टयाचें शांतताविश्वहि समजावून घेतलें पाहिजे. आपल्या दरिद्री कल्पनेप्रमाणे 'वॉर अँड पीस'मधील 'पीस'चा अर्थ हवा तसा लावून चालणार नाही. वरवर विचार करणारांची अशी कल्पना होते कीं, या कादबरीत सशस्त्र युद्धाची निंदा व शांततेचें, अप्रतिकाराचें स्तोम असेल पण वानगीदाखल एक विचार पहा—

युद्धाचा पहिला साक्षात् अनुभव घेणाऱ्या पीअरीला त्याचा मित्र अँण्ड्रे म्हणतो— "युद्ध ही एक कल्पनातीत भयंकर गोष्ट आहे असें मी मानतो." पण तो असेहि त्याला बजावतो की, युद्ध करायचेंच असले तर मग तें समेटाच्या आणि सलोख्याच्या वतीनें करण्यांत मात्र हंशील नाहीं. युद्ध म्हणजे क्रिकेटची मॅच होता उपयोगी नाहीं. युद्ध कैद्याचें लटांबर गोळा करावयाचें म्हटल्यावर मग तें युद्ध कसलें? तो नाजुक लक्ष्मीधराच्या सैन्यांत झालेला दरबारी सामना होईल. युद्ध जर खरेंखुरें भयंकर बनले, तरच आपण मरणाच्या तयारीनें युद्धाला जाऊ—व मगच फुसक्या कारणाकरितां युद्ध करणें बद पडेल"

असत, तर सुएझच्या लढाईनं एवढ वादळ माजवलं नसत. इंग्रज, फ्रेंच अन् इस्रायली—तिघानीं मिळून किल्ला फत्ते केला असता. सैन्याच बळ तर त्याचच जास्ती होतं. पण या वीस वर्षांत जगांतलें लोक बळजोरीविषयीं शंका घ्यायला शिकले आहेत. त्याचा पहिला प्रश्न असतो— कोण ठीक आहे? कोण बेठीक आहे?

एवढ्यात युनायटेड नेशन्स नावाची एक सस्था जन्माला आली आहे. तिथं जगातील बहुतेक राष्ट्र हजर आहेत कांही झगडे त्यानीं मिटवून दिले आहेत. नाहीतर महायुद्ध पेटलं असत. कांही झगडे त्याना मिटवतां आले नाहींत. म्हणूनच महायुद्धाची शक्यता अजून गेलेली नाही. भारत या महान् संस्थेचा सभासद आहे. चीन म्हणूनहि एक सभासद तिथ आहे, पण त्या चीनशी भारताचा काहीं एक सबंध नाहीं. हा चीन स्वत:च्याच काहीं बेटांपुरतां मर्यादित आहे. आपला कारभार ज्याच्याशीं आहे, तो आहे लाल चीन किंवा नवा चीन. चीनची बहुतेक भूमि त्याच्याच ताब्यांत आहे. युनाटेड नेशन्सनं त्याला मान्यता दिली नसल्यानं चीनकरतां राखून ठेवलेली जागा या लाल चीनला मिळू शकत नाहीं. अन् ही जागा त्याला दिली, तर तो फोर्मोसा बळकावायला पाहील, अन् तेव्हां जर झगडा उद्भवला, तर तो चिनी लोकाचा घरगुति झगडा होईल. तो झगडा मिटवण्याकरतां युनायटेड नेशन्सना धावून जातां येणार नाहीं. युनायटेड नेशन्स कागोंत गेलं आहे. कारण कांगोच्या केंद्रीय सरकारानं त्याला तिथं बोलवल आहे. चीनच केंद्रीय सरकार तर काहीं त्याला बोलावणार नाही. मग लाल चीनला जागा द्यायची युनायटेड नेशन्सला अशी काय घाई आहे? फक्त फायदा झाला असता आपला अन् आपल्यासारख्याच आणखी काही शेजाऱ्याचा. कारण आपल्याशी सीमेवरून तंटा उद्भवला असता, तर आपल्याला तो युनायटेड नेशन्समध्यें नेता आला असता. लाल चीन तिथं असता म्हणजे जगातल्या बाकीच्या शक्तीना त्याची समजूत काढून शातता प्रस्थापित केली असती. अन् लाल चिन जर हटवादीपणा केला असता, तर बाकीच्या शक्तिनी त्याला मदत न करता आपल्याला केली असती. पण लाख प्रयत्न करूनदेखील लाल चीनला आपण त्याची न्याय्य जागा मिळवून देऊ शकलो नाही.

झगडा केव्हातरी निर्माण होणार याची जाणीव आपल्यापैकी कित्येकांना १९४९ सालापासूनच होती. कारण त्याचा नकाशा अन् आपला नकाशा ताडून पाहिलं तर बरीचशी जमीन अशी होती — जी आपल्या मतें आपली होती. पण ही गोष्ट त्यांना सांगितली तर अंग झटकून टाकत होते, गोष्ट तशीच झुलत ठेवत होते. नकाशे दुरुस्त करून घ्यायला वेळ नाही,, होईल होत आहे, जरा थांबा—बघतों आधी तुम्ही आमची सॉव्हरीन्टी तर मान्य करा. आम्ही जर तिबेटवर साव्हरीन नसलों तर, मग आमच्या सहीची किंमतच काय? सही मिळत नाहीं म्हणून तुम्हाला निश्चित होता येत नसल तर, एकदां दिलखुलासपणे म्हणून टाका, की भाई चीन, तिबेटवर तू सॉव्हरीन आहेस. एक सागायचं राहून गेल की जमीन तिबेटच्या सीमेला लागून होती.

चौ-एन-लाय् जेव्हा एकदा शांतिनिकेतनमध्यें आले होते तेव्हां दुपारच्या जेवणाच्या वेळी मी त्याच्या पंक्तीला होतों. मी त्याच्यावर नजर ठेवली होती. आपल्या नावाचा बरोबर उच्चार काय होतो, ते त्यानी मला सांगितलं. जेवणाच्या शेवटी एकदम ओरडले 'हिंदी चिनी भाई भाई.' माझे कान जर त्यावेळीं बिघडलेले नसलें. तर मला ऐकू आलं ते असं 'बहाई, बहाई. कदाचित् बेहाई-बेहाई' (व्याही—व्याही) असं असेल. माझे दोन मित्र तान युन सन अन् सुधीर खास्तगीर व्याही—व्याही झाले आहेत. चिन्याशीं भारतीयाची ओळखदेख तर दोन हजार वर्षांपेक्षा जास्ती काळची आहे, रेशीम आलेल आहे त्याच्या देशातून, चहा आला आहे त्यांच्या देशांतून. रेशमी सडकेवरन तेहि जसें यायचे, तसेच आपणहि जायची. आपण

जायची बौद्ध धर्म घेऊन चित्रकला घेऊन. चीनच्या मार्गानं ह्या सगळ्या देणग्या जपानमध्येंहि पोहोंचल्या. समुद्राच्या वाटेनंदेखील. कधीं कुणास कल्पनाहि करतां आली नव्हती. की, चीन अन् भारत याच्यामध्यें बखेडा माजेल म्हणून. रवींद्रनाथ चीनमध्यें गेल्यावर त्याचा मोठा सन्मान झाला. चीनमधल्या ज्ञानी लोकांची मुक्तकठानं प्रशंसा त्यानीं माझ्याजवळ केली होती. शांतिनिकेतनमधलं चीनभवन म्हणजे या दोन देशाच्या मधला पूल होता. चॅंग-कै शेक इथ येऊन खूप रक्कम दान करून गेले होते. चौ एन-लॉय आले अन् त्यानीं आणखी रक्कम दिली.

हा शाश्वत चीन. त्या देशांतल्या बौद्ध लोकाकरतां भारत म्हणजे Holy land आहे. या शाश्वत चीनशीं शाश्वत भारताचा कधीकाळीं तरी काहीं तटा होता का, कीं अशा एखाद्या अशुभ शक्यतेकरता आपण युद्धांच्या दृष्टीनं किंवा कोणत्याहि अर्थानं आधीपासनंच सज्ज असावं ? आपल्याला ठाऊक होत, सरहद्दीबद्दलचा विरोध एक दिवस आपोआपच मावळेल. असल्या स्वरूपाचा तंटा कितीतरी देशात कितीतरी वेळां माजला आहे. पर्शिया नि अफगाणिस्थान याच्या सरहद्दीबद्दलचा तटा असाच होता. या जागेच नाव शेइस्तान. प्राचीन नाव शकस्तान. दोन्हीं पक्षानीं इग्रजाचा लवाद मान्य केला. गोल्डस्मिड कमिशनन १८७२ साली जाऊन सरहद्दीची रेघ आखून दिली. पण गडबड काही तेवढ्यानं थांबली नाही. कागदोपत्री एक रेघ ओढून देऊन काही पुरेस होत नाही, सर्व्हेची टीम जाऊन सगळ नीट पारखून पिलर्स रोवून सगळं पक्कं करून टाकणं आवश्यक असत. तीस वर्षं गेली. परत दोन्हीं पक्षानी इग्रजांचाच लवाद मान्य केला. तेव्हां भारताच्या इग्रज सरकारन मॅकमहोन कमिशन पाठवल. मॅकमहोन बड्या घराण्यातला होता. सॅंढर्स्ट पास झालेला मिलिटरी ऑफिसर होता. नंतर ता पोलिटिकल ऑफिसर झाला, पर्शिया आणि अफगणिस्तान याच्यातली सरहद्द पक्की करून त्यान दोन्ही पक्षाना सतुष्ट केल. त्याकरतां त्याला १९०३ पासून १९०५ सालापर्यंत दोन तीन वर्षं राबाव लागल होतं.

या मॅकमहोनला प्रमोशन मिळत-मिळत एकदिवस तो भारताच्या इग्रज सरकारच्या परराष्ट्र खात्याचा सेक्रेटरी झाला. त्याकाळीं बाकी सगळ्या खात्याच्या सेक्रेटरीवर एक्झिक्युटिव्ह काउन्सिलचा एकेक मेंबर असायचा. पण परराष्ट्र खातं होत गव्हर्नर जनरलचं खास दप्तर. म्हणून त्याकाळी जो फॉरीन सेक्रेटरी व्हायचा, तो म्हणजे निवडक लोकातला निवडक इसम असायचा. तस म्हणायचं तर फॉरीन सेक्रेटरी हा गव्हर्नर जनरलचा सेक्रेटरी असल्यासारखा होता. पहिलं महायुद्ध तडकलं, तेव्हा लॉर्ड किचनेरला इजिप्तमधून ब्रिटिश मन्त्रिमडळात घेण्यात आलं. इजिप्त झालं ब्रिटिश प्रोटेक्टोरेट. तिथं एक हायकमिशनर नेमण्यात आला. कोणाला नेमलं माहित आहे ? मॅकमहोनला. भारत सोडायच्या आधी तो एक काम करून गेला. तिबेट, चीन अन् भारत या तीन पक्षांच्या प्रतिनिधीची एक बैठक त्यानं भरवली. नकाशावर दोन रेघा त्यान दाखवल्या. त्यांतली एक रेघ होती भारत अन् तिबेट याच्यातली सरहद्द दाखवणारी. दुसरी होती तिबेट अन् चीन याच्यातली सरहद्द दाखवणारी यातल्या पहिलीबद्दल चिनी प्रतिनिधीचा विशेष आक्षेप नव्हता, पण दुसरीबद्दल होता वरच्या लोकांचा हुकूम घेतल्याशिवाय आपल्याला सही करता यायची नाहीं, म्हणून कागदपत्र चीनच्या केंद्रीय सरकारकडे पाठवण्यांत आले. चीन-सरकारन मजुरी दिली नाही.

मंजुरी न देण्यामाग काय-काय कारणं होती, ती सगळी काही मला माहित नाहीत. पण एक कारण थोडफार माहित आहे. चीनशी तिबेटचा सबध काय आहे, याबद्दल बऱ्याच काळापासन वाद होता. भारत जसं म्हणतो आहे, की काश्मीरचा प्रश्न हा आतरराष्ट्रीय प्रश्न होऊ शकत नाही, काश्मीरवर भारताची सॉव्हरीनटी आहे, तसच चीन पण म्हणायचा, की तिबेटचा प्रश्न हा आतराष्ट्रीय होऊ शकत नाही. तिबेटवर चीनची सॉव्हरीनटी आहे तिबेटवर रशियाचा पण डोळा होता, इग्रजाचा पण डोळा होता तेवढ्यावर एक मिहकोल्ह्याची लढाई लागण शक्य होत. इग्रज अन् रशियनानी मिळून १९०७ सालीं एक कनेशन भरवल. त्यात अस ठरल की, तिबेटवर चीनची सॉव्हरीनटी आहे. अस जर का आहे, तर १९०७ सालची पोझिशन १९१४ साली बदलण शक्य नाही तर तेव्हाहि चीन सॉव्हरीनच होता. तेव्हाचं चीन-सरकार जरी इग्रजाच मित्र होत अन् युद्धकालीन दोस्त होतं, तरी सरहद्दीचा प्रश्न त्यानी तसाच अनिर्णीतच ठेवून दिला. का ? कदाचित् अशामुळें की करारावर सही केली तर तिबेटलाहि चीनसारखच स्वाधीन नि स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता दिल्यासारखं होऊन गेल असतं. मग सॉव्हरीनटीचा हक्क टिकला नसता. स्वतःचीच सही चीनच्या विरुद्ध गेली असती.

आता भारत-तिबेट-चीनच्या वेळेला मॅकमोहननं हिमालयात जें केल, तेंच काम गोल्डस्मिडनं पर्शिया अन् अफघाणीस्तानच्या वेळेला शहेस्तान किंवा शकस्थानात केलं होतं. म्हणजे, एक रेघ त्यानं दाखवून दिली होती. गोल्डस्मिडच्या रेघेनंतर तीस वर्षं उलटलीं. तरी भाडण काही मिटलं नाहीं. कारण, कागदोपत्रीं एक रेघ ओढण पुरेस नसतं. सर्व्हे टीम जाऊन सर्व्हे व्हावा लागतो. पिलर्स रोवावे. लागतात. त्याकरतां एक वेगळं कमिशन लागत. मॅकमोहन लाइनच्या बाबतीत तसं कधी झालच नाही. अजून तें व्हायच बाकी आहे. चिनी सरकारन मजुरी दिली असती तर राष्ट्रवादी अमलातच हें होऊन गेलं असतं. इग्रज सरकारशीं चीन सरकारची खूप दोस्ती होती. पण का-कुणास ठाऊक, इग्रज सरकारनहि निकड दाखविली नाही. इग्रज सरकार इतकं निर्विकार होतं, कीं नकाशांतदेखील मॅकमोहन लाइन दाखवायला त्यान पचवीस वर्ष उशीर केला. तेवढ्यात चीन जपानी युद्धात गुतलं गेल होत.

समज, की आपल्या जमीनदारीच्या हद्दीचा प्रश्न अनिर्णित ठेवून जमिनदारी दुसऱ्याला देऊन टाकून किंवा हातची घालवून दोन् जमिनदार बाजूला झाले. त्याची जागा दुसऱ्या दोघानी घेतली. आधीच्या जमिनदारामध्यें जितका समझौता होता, तितका नंतरच्या जमिनदारामध्यें नाही आता तटा तर होणारच. स्वतंत्र भारत म्हणतो आहे कीं, मीच आता ब्रिटिश भारताचा वारसदार आहे. पूर्वीचा नकाशा मला नीट समजावून देवून मग इग्रज गेले आहेत. या नकाशाप्रमाणे ही सगळी जागा माझी आहे तो मी ताब्यातहि घेतलेली आहे. तू जर माझा खराखुरा मित्र असशील तर माझा मुलुख मला निर्विवाद उपभोगूं देशील लाल चीन म्हणतो आहे, कीं ही सपत्ती मी चॅंग कै शेकच्या सत्तेपासून जिंकून घेतली आहे. तू ज्याला तिबेट म्हणतोस, ता आमचा तिबेट प्रांत आहे. इग्रजानीं त्याला हाताशी धरलं होत. कच्च्या कागदपत्रावरली त्याची सही कवडीमोल आहे. ही

# जनमताला विकृत वळण लागेल

आर्थिक दृष्टीनें जनता गांजलेली आहे काळाबाजारवाल्यांना पंडित नेहरूंनी देशद्रोही म्हटले आहे, पण त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं प्रभावी असें काही होत नाही. त्यामुळें सध्यां संघटित झालेले जनमत कांहीं-तरी विकृत वळण घेण्याचा संभव आहे. म्हणून सर्व दृष्टीनी कडक उपाय योजना केली पाहिजे.

दोन वर्षांपूर्वी पाकिस्ताननें आपल्या नागरिकांनी परदेशांत ठेवलेल्या गुप्त संपत्तीचें जाहीर निवेदन करावें व तसें न केल्यास ती जप्त होईल असें म्हणून एक वटहुकूम काढला आणि ६३ कोटी रुपयांचीं परदेशातील संपत्ति ताब्यात घेतली.

भारत सरकारनें असेंच केलें पाहिजे. २०० कोटींवर संपत्ति भारतांतील बड्या संस्थानिक धनिकांनीं गुप्तपणें परराष्ट्रात ठेवली आहे.

युद्धकाळ असला तरी शेती, उद्योग इत्यादि क्षेत्रांत होणारा विकासाचा कार्यक्रम कमी होता कामा नये. किंबहुना मागील महायुद्धांत लॉर्ड बेव्हरीजच्या रिपोर्टाप्रमाणें उद्याचा भारतीय समाज कसा असणार याचे चित्र लोकांपुढें उभें केले पाहिजे. अर्थात्‌च त्यामुळें सामाजिक न्याय मिळेल व जीवन अधिक सुखी होईल अशी खात्री होऊन जनता अधिक त्यागार्थ तयार होईल व अधिक हिंमतीने लढेल.

**श्री. काकासाहेब गाडगीळ.**

लाइन बेकायदेशीर आहे. ये, आपण दोघं वाटाघाटी करूया. तूं मला काही दे, मी तुला काही देतो. आपसात ह्याचा निकाल लागूं दे. मग कागदपत्र करू पक्की कमिशन नेमूं सर्व्हे करू. पिलर्स रोवूं.

मकहोमन लाइनबद्दल जेवढं मला माहित आहे, तेवढ सांगितल. लडाखबद्दल मी अभ्यास केलेला नाहीं. तेव्हा ते मला माहित नाहीं. पण तिथसुद्धा कमिशन नेमलं गेल नव्हतं, सर्व्हे झाला नव्हता. पिलर्स रोवून झाले नव्हतें. हें सगळ झालेल नसलं, तर वादाचा गुंता राहतो. शभर वर्ष काही तंटा झाला नाहीं म्हणून तो पुढंहि होणार नाही, हा युक्तिवाद नाही, हा विश्वास झाला. इंग्रजांना ठाऊक होत की, आपण केव्हाच उठन हालणार नाहीं. यावत् चन्द्रसूर्य तावत् इंग्रजी राज्य. तिबेटच्या लामाशाहीला ठाऊक होतं, कीं आपण इतिहासाची दिक्कत करत नाहीं. धर्मप्रधानच आपल्याला ही सनातन जहागिरी दिलेली आहे. तसंच चीनच्या राज्याकर्त्यांना पण वाटायचं, कीं कनफ्युशिअसची समाजव्यवस्था ज्याअर्थी अडीच हजार वर्ष टिकून राहिली त्या अर्थी आणखी अडीच हजार वर्षही ती टिकेल. क्रांतिकरता, परिवर्तनाकरता जर कुणीं कुठच वाव ठेवला नाहीं तर, एकदिवस साम्राज्य जात, सिंहासन जात, सर्वच गोष्टींचा सव्यान विचार करून सिद्धांत काढावा लागतो. नाहीतर तंटा उद्‌भवतो.

हें खटल हातबदल होऊन आपल्याला इंग्रजांच्याकडून मिळालेल आहे. अन् लाल चीनला राष्ट्रवादी चीनकडून मिळालेल आहे. आतां इंग्रजांनी आपली बाजू घ्यावी, हें स्वाभाविकच आहे. त्याचप्रमाणे फॉर्मोसा-सरकार पण पेकिंग-सरकारच्या बाजून बोलत आहे. अमेरिकन सरकारनं जेव्हा जाहीर केलं कीं, आम्ही पण मॅकमहोन लाइन मान्य करतो, तेव्हां चॅंग कै शेकच्या सरकारनं अमेरिकेचा निषेध करून अस कळवल कीं, मॅकमहोन लाइन बेकायदा आहे. या प्रश्नावर साबडया न् निळ्या दोन्ही चीनच मतैक्य आहे, हे उघड आहे. ही त्यांची वाडवडिलापासून चालत आलेली मागणी आहे. त्यांच्यापैकी कुणीच तिबेटला स्वाधीन किंवा स्वतंत्र मानायला तयारच नाही, त्यांच्या दृष्टीन तिबेट हा एक प्रदेश आहे किंवा प्रांत आहे. इतिहासाची पानं चाळली तर, अस दिसून येईल की, चीन अन् तिबेट यांचे संबंध एकेका काळांत वेगवेगळेच होते. मी आधीच सांगितलं आहे की, १९०७ सालच्या अँग्लो-रशियन कन्व्हेन्शनमध्यें तिबेट वरील चीनची सॉव्हरीनटी मान्य करण्यात आली आहे. अन् तरी-देखील १९१४ सालीं ब्रिटिश भारत अन् मांचू-अमलाखालून नुकत्याच सुटलेल्या प्रजासत्ताक चीनच्या बैठकीत तिबेटलाहि निमंत्रण पाठवल गेल आहे. त्याला तितकच मानाच आसन दिल गेल आहे याच कारण काय? कारण अस की, तिबेटवर जें होत, ते चिनी जमातीच छत्र नव्हत, ते होत मांचू सम्राटाच किंवा समाजीच छत्र. चिनी जमात जशी मांचू-अंमलापासन मुक्त झाली, तशीच तिबेटी जमात पण मांचूच्या छत्रातून मुक्त झाली. तिबेटी लोकांनी आपल्या स्वाधीनतेची घोषणा केली नाही, पण त्यांची वागणूक होती स्वाधीन जमाती सारखीच, अन् इंग्रजांनींहि हें एक प्रकारे मान्य केल होत पण म्हणून चीन सरकारन मान्य केल होत अस नाही. हे मान्य केल नव्हतं.

आतां आम्हाला मुकाबला फक्त चीनशीच तेवढा नाही, तिबेटशीहि करावा लागेल. कारण तिबेट म्हणेल, की १९१४ सालच्या बैठकीत मी एक सभासद म्हणून होतों, तेव्हां माझी सही नसली तर भारत-चीन-करार सिद्ध होऊ शकणार नाही आधीं मला स्वतंत्र करा, मग माझी सही घ्या. म्हणजे चीनची सही जशी जरूर आहे. तशीच तिबेटच्या सहीचीहि जरूरी आहे नाहीतर पंचवीस तीस वर्षांनंतर काही वेगळच कारावर यायच, कीं तिबेट आता स्वतंत्र झाला आहे, अन् तो म्हणतो आहे, की चीन-भारत करारात आपण कांहीं बांधले गेलेलों नाही, ह्या सगळ्या विवाद्य भूमीवरला आपला हक्क त्याने सोडलेला नाही, ही भूमी बऱ्या बोलाने त्याला परत केली नाही तर तोहि म्हणेल की, लढके लेंगे. त्याच्या पाठीशी कोणी एक दलित उभो राहील कदाचित् रशिया राहील. तर जें खटल हातबदल होऊन आपल्याकडे आलं आहे, ते १९१४ सालीच तीन्ही पक्षांनी

मिटवून टाकायला हवं होतं. अर्थात् लडाखचा प्रकार याहून अधिक जुना आहे. त्यांत प्रत्यक्ष-पणें ब्रिटिश सरकारची जबाबदारी नव्हती.

मग एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, की १९१४ साली तिबेटनं करारावर सही दिली, तेव्हा पूर्व सरहद्दीवर कांही भाग त्याच्या पदरात पडला होता म्हणून दक्षिण सरहद्दीवरला कांही भाग त्यानं सोडला होता. म्हणजे, चीनकडनं कांहीं त्याला परत मिळालं होतं किंवा परत मिळेल अशी आशा त्याला वाटली होती, म्हणून ब्रिटिश सरकारला कांहीं सोडून द्यायला किंवा आधीपास्नच इंग्रजानी बळकावून ठेवलेलं कांहीं सोडायला तो राजी झाला होता. आतां पुढें केव्हातरी तिबेटच्या सहीची जरूर पडली, तर तो म्हणेल, की चीनकडनं माझ्या पूर्वेकडल्या सर-हद्दीवरला भाग तुम्ही मिळवून दिलांत, तरच मी सही करीन. नाहीतर यात माझा काय फायदा? माझा फायदा म्हणजे यातनं माझ्या स्वतःकरता कांहीं भूमीवर हक्क सांगणं. जुने नकाशे माझ्या बाजूचे आहेत.

हा एक जबरा मामला आहे. बळजोरीनं ह्याचा निकाल लागला, तर तो निकाल तसा टिकणार नाही. स्टालिननं पोलंडचा कांहीं भाग काढून रशियात सामील करून टाकला होता. पोलंडला जोडून दिला होता. जर्मनीत काढलेला कांहीं भाग या भागातनं पोलिश लोकांनीं जर्मन लोकाना हांकलून लावलं होतं. हें निव्वळ बळजोरीचं समाधान आहे. ही व्यवस्था कधी ना कधी रद्द व्हायचीच जशी रद्द झाली ऑस्ट्रिया, प्रशिया अन रशिया यांनी वाटून घेतलेली पोलंडची हिस्सेदारी. इतिहासात एक-दोन शतकं म्हणजे कांही फारसा काळ नाही. तिबेट एकदिवस स्वतःचा अधिकार परत मिळवेलच. तो काय आपला राष्ट्रीय हक्क फुकाफुकी सोडून देणार आहे? त्याची पूर्व अन् दक्षिण सरहद्द मॅकमहोननं पक्की करून दिली होती. नंतर परत एकदा दोन्ही सरहद्दी पक्क्या करून द्याव्या लाग-तील, कमिशन नेमावं लागेल, सर्व्हे करावा लागेल, पिलर्स रोवावे लागतील.

हें सगळं केव्हा होईल, हें कुणालाच सांगता येण्याजोगं नाहीं. पण एक दिवस होईल. व्हायलाच हवं मॅकमहोन जिथं थांबला होता, तिथपास्नच परत सुरुवात करावी लागेल. भारताननं सही दिलेली आहे, तिबेटनं सही दिलेली आहे, चीननं सही दिलेली नाहीं. त्याची सही मिळवावी लागेल. चीन आतां लाल झाला आहे, पण म्हणून इथं कम्यु-निझमचा कांहीच प्रश्न नाही. प्रश्न आहे तो चीनच्या सॉव्हरीनटीशी मिळती-जुळती अशी तिबेटची एक स्टेटस. चीनची सॉव्हरीनटी अमान्य करून एकाच इलाख्यावर तिबेटला सॉव्हरीनस्टेटस देण्याची हिंमत १९०७ सालीं ब्रिटनला झाली नाहीं, रशियालाहि झाली नाही. मरगळलेल्या माचू राजवंशाला त्याच्या सार्वभौमत्वापास्नं वंचित करण्याची हिंमत तिबेटलाहि झाली नाही. नवीनच जाग्या झालेल्या प्रजासत्ताक चीनला वंचित करावं, हा कांही मॅकमहोन बैठकीचा उद्देश नव्हता. महायुद्धाला तोंड लागत आहे असं बघून खूप दिवसाचा एक जुना विरोध मिटवावा एव-ढाच प्रयत्न त्यानं केला होता. विरोध मुख्यतः होता, चीन अन् तिबेट याच्यामधें. चीन अन् तिबेट याच्यामधली सरहद्द नक्की करायची, हेंच मुख्य काम होतं. तिबेट अन् भारत याच्यामधल्या सरहद्दीचा मुद्दा गौण होता. तिबेट-भारताच्या सरहद्दीबद्दलहि दुमत होतं. तिबेटी लोकांना विचारा, अजुनी त्यांचं मत आपल्यापेक्षा वेगळं आहे. वेगवेगळ्या नि विरुद्ध मताचा मेळ घालायचा प्रयत्न मॅकमहोनन केला. हा प्रयत्न बऱ्याच अशीं सफळहि झाला. आता परत प्रयत्न करायला हवा.

पण परत प्रयत्न करणार कोण? अन् कसा? मॅकमहोन तर आता हयात नाही. पण शोध घेतला तर तशी लायक व्यक्ति सापडणार नाहीस नाही. त्याच्या नंतरची पायरी म्हणजे चीन अन् तिबेटला भारता-बरोबर बैठकीकरतां बोलावणं. चीनच्या नावाच निमंत्रण पेकिंग सरकारला पाठवलं तर चालेल. पण तिबेटच्या नांवाचं निमंत्रण कोणत्या सरकारला पाठवणं योग्य ठरेल? तिबेट-सरकार म्हणून आता कुणीच नाहीं. तीन वर्षांपूर्वी होतं. एवढ्यात खंड पडला आहे परदेशात राहून एक निर्वासित तिबेटी सरकार बनवायची दलाई लामाची इच्छा असली तरी, त्यानं आंतरराष्ट्रीय कायद्याला बाध येतो दलाई लामाच्या अशा निर्वासित तिबेटी सरकारला लाल चीन कधीच मान्यता देणार नाही. निळा चीनहि पण देणार नाहीं. कारण अशी मान्यता दिली, तर चीनची सॉव्हरीनटी बिघडते. अन् लाल अन् निळ्या चीनने मान्यता दिली नाहीं म्हणजे त्याच्याशी राजनैतिक संबंध असलेले देश पण ही मान्यता देणार नाहीत. भारतानं जर मान्यता दिली, तर भारत कोंडीत सांपडेल. सगळेच असं म्हणतील, की निर्वासित तिबेटी सरकार म्हणजे भारताच्या हातातलं एक खेळणं आहे. असं एखादं सरकार बनवलं गेलं, तर लाल चीन ताबडतोब भारताबरोबरचे आपले राजनैतिक संबंध तोडून टाकेल. अन् असं झालं तर मग नव्या मॅकमहोन बैठकीत कोण कोण भाग घेईल?

तेव्हां नजीकच्या भविष्यकाळांत अशा बैठ-कीची कांही शक्यता नाहीं. दूरचा भविष्यकाळ सुदूर आहे लाल चीनला लढाईत हरवलं, तर निळा चीन त्याची जागा घेईल. तो पण तिबेटला स्वातंत्र्य द्यायला नाखूष असेल. म्हणजे मग त्यालाहि लढाईत हरवावं लागेल. अन् ज्याच्या पाठीशी अमेरिका आहे त्याला हरवणं हें काय भारताचं काम आहे? म्हणजे तिबेटला फक्त एकच मरदसा आहे-गांधी-वादी सत्याग्रह. सशस्त्र विद्रोह कांहीं कामाचा नाहीं तिबेटला खोटी आशा दाखवणं बरं नाहीं. दुसऱ्याच्या मदतीच्या आशेनं त्यानं सशस्त्र बंड केलं, तर तो अगदीच वाटेला लागेल. सामूहिक गांधीवादी सत्याग्रह हीच तिबेटची एकमेव आशा आहे. असा सत्याग्रह भारतात सफळ व्हायला जवळजवळ वीस वर्षं लागलीं. तिबेटमधें त्याहिपेक्षां जास्ती दिवस लागतील.

तेव्हां तूर्त तरी भारत-चीन-तिबेट बैठकीची आशा नाहीं. आशा आहे ती भारत-चीन बैठकीची याकरितां चीनला सुबुद्धि झाली पाहिजे. अन् भारताची सूचना मान्य करून तो ८ सप्टेंबरच्या आधींच्या जागी गेला पाहिजे. हल्ला करून चीननें आपली घासाघीस करायची ताकद वाढवून घेतली आहे तो आता आपली ही जादा ताकद सोडून द्यायला राजी होईल का? तो जर राजी झाला नाहीं, तर मग भारत तरी त्याची शर्त मानायला का म्हणून होईल? मध्यस्थानीं खटपट करून कोलंबोला पंचायत भरवली होती. या पंचायतीचे प्रयत्न सफळ झाले, तर भारत अन् चीन याच्यात प्रत्यक्ष बोलणी सुरू होतील. बोलणी एकदा का सुरू झालीं, म्हणजे एकामागोमाग एक प्रश्न निघत जातील. जातां-जाता तिबेटचा प्रश्न हे येईल. अशा दहा प्रश्नांत जर सात प्रश्नाचा निकाल लागला, तर कोणताहि मुसद्दी उर-लेल्या थोडक्या प्रश्नाकरता रकाना मांडत नाहीं

# राजा शिवछत्रपति

भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफ़जलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम


सात : आग्रा : कैद आणि सुटका

आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये


राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणे २.

# सोनाराकडून कानटोचणी

" भारताच्या पंचवार्षिक योजनेत किरकोळ फरकाखेरीज कुठलीही महत्त्वाची कपात करणें ही सध्याच्या आणिबाणीच्या परिस्थितीं-तील सर्वांत हानिकारक अशी गोष्ट ठरणार आहे " असा परखड अभिप्राय केंब्रिज विद्यापीठाच्या सुप्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ मिसेस जोन रॉबिन्सन यांनी दिल्ली येथें एका भाषणप्रसंगी व्यक्त केला.

मिसेस रॉबीन्सन पुढें असेहि म्हणाल्या, " ही काहीं लवकर संपणारी आणी-बाणी नव्हे. ही बऱ्याच काळ चालणारी परिस्थिति आहे. याला तोंड देण्याचा सर्वोत्कृष्ट उपाय म्हणजे देशाची आर्थिक आघाडी भक्कम करणें हाच होय. पण दुर्दैवानें येथें भाषणाचाच जोर विशेष आहे. त्यामानानें प्रत्यक्ष कामाची गति मात्र दिसत नाही. "

आठवत नाही. तो थोडाकाळ वाट बघतो. सर्वांत कठिण प्रश्नच शेवटीं राहातात. कधी असहि होतं, की सर्वांत कठीण प्रश्नच आधीं सोडवून घ्यावे लागतात. मग बाकीचे वाट पहात राहूं शकतात. इथं सर्वात कठिण प्रश्न आहे. तिबेटच्या स्टेटसचा. इग्रजांनी आपल्या साम्राज्याला कॉमनवेल्थ असं नाव देऊन राणीला कॉमनवेल्थची सर्वोच्च अधिकारी केलं आहे. परिणामीं, भारत, पाकिस्तान, सिलोन वगैरे प्रजासत्ताकांना पण डोमिनियन स्टेटसच्या माशाला सॉव्हरीनटीच्या पाण्या-खालीं झांकून ठेवून एकाचवेळीं दोन्ही डगरी संभाळता आल्या आहेत. चिनी लोक जर असेच हुषार असते, तर त्यांनासुद्धा तिबेटला अशाच प्रकारें संतुष्ट ठेवतां आलं असतं.

अगदीं सर्वांत कठिण नसला तरी त्याच्या जवळपास जाऊन पोंचणारा आणखी एक प्रश्न म्हणजे तिबेटहून सिनकिआंगला ये-जा करण्याकरतां नवीनच बांधलेल्या सडकेचा प्रश्न. ही सडक लडाख भेदून गेली आहे. यावर भारताचा आक्षेप असणं साहजिक आहे. आक्षेप फक्त एवढ्याचकरता नाहीं, की आपली इतकी-इतकी जमीन सोडावी लागली आहे,-तर आक्षेपाला याहिपेक्षां बलवत्तर एक कारण आहे. भविष्य-काळी कधी जर रशियाशीं चीनची लढाई सुरूं झाली, तर सिनकिआंग रशियाच्या ताब्यांत जाईल. तेव्हां जर चीन ह्या सडकेनं रशियाला हाकलण्याकरतां यायला लागला तर रशिया म्हणेल की, भारता, तूं कां म्हणून चीनला स्वत:च्या भूमीवरून माझ्या-वर चाल करून येऊ देतोस ? आजपासून तूहि माझा शत्रु ! किंवा असहि होण्याची शक्यता आहे की ह्याच सडकेनं चीनची युद्धसामग्री उघड उघड सिनकिआंगच्या भागात जाईल. अन् तिथनं पुढं गुप्तपणे आझाद काश्मीरमधनं पाकिस्तानात. आप-लाच पाटा, आपलाच वरवंटा, आपल्याच दाताचा पडतो तुकडा. ही सडक हातीं ठेवा-यचा जर चीननं प्रयत्न केला, तर मिटमाट होणं भारी अवघड आहे. अन् चीननं काहीं ही सडक उगीचच्या उगीच बांधलेली नाही. त्यामागं एक मोठं कारण आहे. त्याला अशी भीत आहे, कीं फोर्मोसाहून एक दिवस आपल्यावर बहुमुखी आक्रमण होईल या भीतीनं आपल्या पूर्व नि दक्षिण भागातले कारखाने, मजूर, इंजिनियर लोकांना ते सिनकिआंग अन् तिबेटमधें पाठवतो आहे. आहे. शहरच्या शहरं रिकामीं करतो आहे. बहुतेक लोक खेडेगांवात जाताहेत. शेती करण्याकरतां. कांही लोकांना पाठवलं जात आहे डोंगरावर वस्ती करण्याकरता. तिबेट अन् सिनकिआंग म्हणजे चीनचा सैबेरिया आहे. अन् ही सडक म्हणजे या सैबेरियाचा प्राण आहे.

वाटाघाटी व्यर्थ झाल्या, की आग धुमसतां-धुमसता पेट घेते. आग घराच्या कुणीकडल्या छपराला पहिल्यांदा लागते. हा एक धक्का असतो. जपानी लोक अचानक पर्ल हार्बरवर हल्ला करतील, असं कुणाला तरी वाटलं होतं का ? पहिल्या महायुद्धाचा इतिहास मीं वाचला आहे पावलोपावली धक्का बसतो. चिन्यानी विश्वासघात केला, या सत्याच्या आधी आणखी एका सत्याकडे कुणाची फारशी नजर गेलेली दिसत नाही. वाटाघाटी गाळांत रुतून बंद पडल्या होत्या. वाटाघाटीची अडक-लेली अवस्था म्हणजे युद्धाची पूर्वावस्था. तेव्हांच आपल्याला उमजायला हवं होतं, कीं चिन्याच्या हातीं आतां कोणताच प्याद नाहीं, आता तें आक्रमणाच प्याद पुढं सारतील अन् आक्रमण करतील ते स्वत:च्या सोयीच्या भागांत करतील, आपल्या सोयीच्या भागांत करणार नाहीत. आता ठेंच खाऊन आपण हें शिकलों. आतां परत हीच चूक आपण करणार नाहीं. आपल्याला युद्ध हवं की नको, याचा विचार एकदां आधीच करून ठेवला हें बर. युद्ध नको आहे, हीच जर आपल्याला मनापासनं वाटणारी गोष्ट असेल तर मग वाटाघाटी चालवत नेल्याचें पाहिजेत, त्या बंद करून चालणार नाही. युद्ध हवं, ही जर आमच्या मनातली इच्छा असेल, तर मग कोणत्याहि धक्क्याकरतां तयार राहिलं पाहिजे. वाटाघाटींत खंड पडताक्षणीच आपल्याला उमगलं पाहिजे की, अजून एक धक्का येतो आहे.

वाटाघाटी व्यर्थंच ठरतील, असलं अव-लक्षणी बोलणं मी कधीच तोंडातनं काढणार नाही. पण दोन्ही देशाच्या तब्येती पाहतां मला एक वेगळीच काळजी लागून राहिली आहे चीन अन् भारत या दोन प्राचीन अन् शेजारी म्हणून राहणाऱ्या देशाची खरीखुरी शोकांतिका ही आहे, की ते एकमेकाला जगा-यला मदत करीत नाहीत, मग यत्नां मदत करताहेत. यांच्यात व्यापार नाही, लोकांची ये-जा नाही, विचारविनिमय नाही, सांस्कृ-तिक देवाणघेवाण खूप दिवसांपासून थंडाव-लेली आहे. अशा परिस्थितीत माणसा-माण-साचा भयंकर परिचय होतो रणांगणावर. परिचय घडवून आणते कर्मुक मन्मथाकर्तुं असं सामर्थ्य असलेली प्रकृति. भारता-भारता

मरता-मरता · माणूस माणसाला ओळखतो शिवाय या दोन्ही देशाची लोकसंख्या बेहद्द वाढली आहे. तिला परत हद्दीवर आणायचा दुसरा कोणताच मार्ग नसेल, तर प्रकृतीच दोघाच्याहि कानात कुजबुजेल, की "तें असुर आहेत. तुम्ही देव आहांत. त्याना मारलत तर तें पाप होणार नाही त्याना मारा"

रात्रदिवस मी विचार करतों आहें. माझं कर्तव्य काय ? नागरिक म्हणून माझं कर्तव्य आहे–माझ्या राष्ट्राला मदत करणं. माझी बायको जवानाच्याकरतां लोकरीचे कपडे विणते आहे, माझ्या मुली फर्स्ट-एड शिकताहेत. मी पण वर्गणी देतों आहे, टॅक्स भरतों आहे. वेळ आली तर सिव्हिल डिफेन्समध्यें जायला राजी आहें. पण लेखक किंवा कलाकार म्हणून माझी स्वतःचीहि एक योगसाधना आहेच की. सृष्टीच्या योगें स्त्रष्टयाशीं अन् अन् त्याच्या सृष्टीशी योग साधण. मला योगभ्रष्ट करून कुणाला काय फायदा ? मी जर माझ्या साधनेंत निवांत, निष्कंप ज्योतीसारखा अतंद्र राहिलों, तर कुणाच काय अन् कितीसं नुकसान होणार आहे ? मीहि पण एक आघाडी सभाळतों आहें. संस्कृतीची आघाडी. विशुद्ध संगीत, विशुद्ध सौंदर्य, विशुद्ध सत्य, विशुद्ध प्रेम या सर्व सूत्रातून प्रतिकारशक्ति खेंचून घेता येते. ज्या कामात मी हात घातला आहे, तेंहि एक करण्याजोगं काम आहे. त्याच्याकरतां मी उपजीविकेचा त्याग केला आहे. आता जर त्याचाहि मी त्याग केला, तर माझ्या आयुष्यात राहलं तें काय ?

कवि किंवा कलाकार म्हणजे जणू गरोदर स्त्री अतिशय काळजीपूर्वक, अतिशय सावधपणें त्याला आपल्या गर्भाच्या सभाळ करावा लागतो हीच त्याची देशभक्ति. देशाची फक्त माति म्हणजेच काय देश ? देशाचा आदर्श, देशाच ध्यान, देशाच स्वप्न. देशाचा रस, देशाच रूप–हें सबदेखील देशच आहे मृण्मय भारतासारखीच चिन्मय भारताचहि रक्षण करायला हवं. ज्याच काम त्यानं केलं नाही, तर हें काम कोण करेल? सगळयाना सगळया कामाकरता हाक देऊं नये. देशमातेची चाळीस कोटी संतानं आहेत काल अन् लायकीनुसार काम वाटून दिलं म्हणजे झालं. मग कशाकरतां माणसाची चणचण भासणार नाही. मलाहि असं काही लिहावं लागणार नाही, ज्याच्याकरतां माझी सृष्टि झाली नव्हती, अन् जी माझी सृष्टि नव्हे. मी जें लिहितों आहे, तेंच मला ठीक लिहिता आलं, तर त्यातनंसुद्धां देशाला प्रतिकारशक्ति मिळेल.

या निमित्तानं एक गोष्ट सांगतों. पॅरिसमध्यें माझा एक मित्र होता. बंगाली. माझं पहिलं प्रकाशित पुस्तक 'तारुण्य' १९२८ की १९२९ साली मीं त्याला भेट म्हणून दिलं होतं. त्यानंतर मी इकडे परत आलों. तो राहला तिथच. त्याची काही खबर कळावी असं खूपदा वाटल होत, पण कुठनंच काहीं पत्ता लागला नाहीं. त्या बेपत्ता मित्राची दुष्टभेट घडली कलकत्याला विनय सरकाराच्या घरी १९४७ साली. मीं त्याला ओळखलं नाहीं, त्यानंच मला ओळखलं. ओळख करून दिली आपल्या बायकोशीं. ऑस्ट्रियन काउंटेस. महायुद्धाच्या वेळी ती दोघ होतीं हॉलंडमध्यें. तेव्हा काळा आदमी म्हणून मित्राला कॉन्सेंट्रेशन कॅपमध्यें पाठविण्यात आलं. त्याच्या बायकोला अशी धमकी देण्यांत आली, का नवऱ्याला तू घटस्फोट दे, नाहीतर त्याच्या जिवावर बेतेल. नवऱ्याच मत घेऊन बायकोन घटस्फोट घेतला. पण ती जवळच एका ठिकाणी राहली.

'त्या दुर्दिनांत,' माझा मित्र मला म्हणाला, 'तुमच्या पुस्तकानं माझ्या मनांत हिंमत आणली. मला जिवत राहायला मदत केली. नाझीच्या तावडीत जितकी वर्षं होतो, तितकीं वर्षं तुमचं पुस्तक माझं सोबती होतं, अन् तुमचे शब्द माझे सहाय्यक होते.'

मी थक्कच झालों. इतका मोठा पुरस्कार मला कधी कुणीं दिला नव्हता. माझ्याहि मनांतली हिंमत वाढली. माझ्या मित्रान मला जिवंत राहायला मदत केली. देशाची फाळणी झालेली, हिंदु-मुसलमान लाखावारी मरत होते, पळत होते, गांधीजीच स्वप्न मोडलं होतं, प्राणहि गेला काही दिवसानी. तेव्हां कुणाला जगावसं वाटत होतं ? अन् कशाकरता ? तरी मला जगावं लागलं. माझा अर्जुनविषाद दूर झाला. मी पाहुंळ, कीं साहित्याची शक्ति अमर्याद आहे. नाझीच्या विरुद्धहि ती प्रतिकारशक्ति पुरवूं शकते. मीं जर साहित्याचं रक्षण केलं, तर ते दुसऱ्याचं रक्षण करेल.

आशिर्वाद. इति. शुभाकांक्षी.

—अन्नदाशंकरराय



## काटकसरीची कमाल

युद्धकाळ हा काटकसर काळ होय अशा घोषणा आपल्याकडे दिल्या जातात. पण याबाबत गेल्या महायुद्धांत इंग्लडने घालून दिलेल्या आदर्शाच्या जवळपाससुद्धां जाऊन पोचण्याची आपली तयारी नाही असे खेदानें म्हणावेंसें वाटतें. एकच उदाहरण–कागद निर्मितीसाठी–इंग्लडला कट-पल्प (बांबूचा लगदा) आयात करावा लागूं नये म्हणून रद्दी कागदाचा कागद उत्पादनासाठीं जास्तींत जास्त वापर होऊं लागला. त्यासाठीं रद्दी जमविण्याची रितसर मोहीमच सुरू झाली. शेवटीं टोक म्हणजे बसचें तिकीट फेकून देणें हाहि कायद्यानें गुन्हा ठरविण्यांत आला.

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसें | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री. ग. माजगांवकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | " | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | " | ०.२५ |
| विद्यालंकार | प्रभाकर इनामदार | १.३० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात बुटके | भालचंद्र भिडे | १.२५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दांडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरंदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा. रा. भागवत | १.०० |
| वडवडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङ्मयविलास | " | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट (काव्य) | बाबा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडे | रॉय किणीकर | २.५० |
| असिधारा | दे. गो. उदागुरे | ३.०० |
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो. नी. दांडेकर | १०.०० |
| आनंदवनभुवन | " | ६.०० |
| पूर्णमायचीं लेकरं | " | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दांडा नाटक | " | ०.५० |
| शितु (") | " | २.०० |
| पवनाकाठचा धोंडी (") | " | २.५० |
| उद्धव (") | मंगेश पत्की | २.०० |
| मराठ्यांचें सिंहासन (") | गो. कृ मुगशीकर | २ ०० |
| गांजलेले जीव भाग १ ते४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | " | २.५० |
| पाताळलोकची अद्भूत यात्रा | " | ३.०० |
| चिटोऱ्याचा प्रताप | " | २.०० |
| हिंमतवान जासूद | " | ६.०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपांडे | १.०० |
| जमिनीवरची माणसें | शांताराम | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, | भवानीशंकर पंडित | १ ५० |
| सत्तावनचा सेनानी | वसंत वरखेडकर | ४ ०० |
| राजपुत्र | " | २.५० |
| डोंगर माथ्यावरील दिवा | ना. रा. शेंडे | ३.०० |
| संतसमागम | म. श्री. पडीत | ३.५० |
| वसंत फार दूर नाहीं | अंबादास अग्निहोत्री | ३ ०० |
| जळातील मासा | जयवंत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलकर्णी | ४.०० |



# साहित्य विभाग

असत्य, दुर्जनता व हरतऱ्हेची कुरूपता यांचा विनाश करणें व सत्य, सौजन्य आणि सौंदर्य यांचें संस्थापन करणें हें आपलें अवतारकृत्य आहे. अर्थात् कंसादिकांना ज्याप्रमाणें कृष्णाची भीति वाटत होती त्याप्रमाणेंच दुर्जनादिकांना आपली भीति वाटली पाहिजे. दौर्जन्य कोठेंहि व कोणत्याहि क्षेत्रांत असो, तें आपणांस असह्य झालें पाहिजे. अन्याय हा सरकारचा असो किंवा संस्थानाधिपतींचा असो, तो नाहींसा करण्याकडे वाङ्मयाची प्रवृत्ति झाली पाहिजे. हें काम निर्भयपणें झालें पाहिजे. परतंत्रता कोणत्याहि क्षेत्रांतली असो, ती सामाजिक असो, धार्मिक असो, वाङ्मयात्मक असो, आपणांस ती अवंद्य असली पाहिजे व सर्वांना ती अवंद्य होईल अशी आपली वाङ्मयप्रवृत्ति पाहिजे. दास्य राजाचें असो, संस्थानिकांचें असो, रूढीचें असो किंवा पुरातन शास्त्रांचें असो, त्याचें निर्मूलन करण्यास आपण प्रवृत्त झालें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या त्रिमूर्तीचेंच ध्यान, भजन व पूजन आपण केलें पाहिजे व कृत्रिम रूढि, परंपरा, संकेत इत्यादिकांचें दास्य, वर्चस्व किंवा बंधकत्व पार झुगारून दिलें पाहिजे व झुगारून देण्यास लोकांना शिकविलें पाहिजे. हें व्रत आपण स्वीकारलें व आपली वाङ्मयात्मक तपश्चर्या या ध्येयाला अनुसरून झाली तर तुष्टि, पुष्टि व शांति यांचा लाभ आपणांस व जगास मिळून दैवी संपत्तीचें जगांत साम्राज्य होईल व उच्चतम कलाविलासांत रममाण होऊन अलौकिक अशा सात्विक आनंदाचे आपण वांटेकरी होऊं.

**वामन मल्हार जोशी**

ना. म. पटवर्धनकृत

चरित्रांतून उद्धृत



# मी तो नव्हे!

: लेखक :

## अँटन चेकॉव्ह

: अनुवादक :

वि. ग. कानिटकर

कुलकर्णीसाहेबांच्या चेहऱ्यावर, गच्च पोट भरल्यावर पसरणारी कळा पसरलेली होती. अधूनमधून त्यांना ढेकर येत होती. परंतु निरुद्योगीपणामुळें ते हताश दिसत होते. काय करायचें--वेळ कसा घालवायचा तें त्यांना कळतच नव्हतें. सारखं वाचन वाचन तरी किती करायचं ? दुपारचा सिनेमा गांठावा–तरी अजून दोन तास होते.

"साहेब, कुणीतरी मुलगी भेटायला आली आहे--" शिवाप्पानें एकदम खोलींत डोकावून वर्दी दिली.

"मुलगी ! आं---! कोण आहे—बरं ! बरं, पाठव आंत--"

मग ती आंत आली. काळसर वर्णाची चुणचुणीत--लाल कांठाचा ब्लाऊज आणि फिक्कट पातळ. तिनें हात जोडून नमस्कार केला.

" मी—मी आत्तां आले--कारण तुम्ही कदाचित् दुपारीं बाहेर जाल. मी लेले. वडील मास्तर आहेत माझे-- "

" बसा. वडील मास्तर आहेत ? कुठल्या शाळेंत— "

" शाळेंत नाहीं.--ॲसिस्टंट स्टेशन-मास्तर आहेत— "

" कुठं— ? "

" सध्यां घरीच आहेत. रिटायर होण्या-पूर्वीच्या रजेवर आहेत-- "

" काय काम आहे ? "

"मी आपल्याकडे नोकरीसंबधी विचारण्या-साठीं आलें आहे, ' खुर्चीच्या अगदी टोंकां-वर अवघडून बसलेली ती मुलगी, अडखळत-बाबरत बोलत होती. बोटात रुमाल फिरवीत होती.

" हां—तुम्हीं काय करता ? "

" कांहीं नाहीं — "

" शिकत नाहीं कां ? "

" मॅट्रिक झाले मी गेल्यावर्षी— "

" वडिलाना पेन्शन किती बसेल— "

" अजून बसायचं आहे— "

" नोकरी करण्यापेक्षां लग्न कां करीत नाहीं-- हां—हः हः ! अहो, लाजतां काय ? जमवलंय् काय कुठं ?—बर बरं— कुणाशीं ठरवलय्--काय करतो तो— ?"

" ते पोस्टांत आहेत— "

" डिपार्टमेंट चांगलं आहे—मग तुम्ही कशाला नोकरी करणार— ? "

" मला नोकरी लागली तरच आम्ही लगेच लग्न करणार आहोंत. सध्यां पगार फार कमी आहे त्यांना— "

" वा ! वा ! हें चागलं आहे. नीट बसाना. अवघडल्यासारख्या कां बसला आहात ! म्हणजे तुम्ही दोघं नोकरी करणार— ? "

" हो— ! "

" शिवाप्पा ! चहा आण दोन कप--पण किती दिवस नोकरी होणार नतर तुमची ? हां ! हः हः— ! "

कुलकर्णीसाहेबानीं केलेलें प्रेमळ स्वागत पाहून-त्या मुलीच्याहि जिवांत जीव आला. मग तिनं हळूहळू कुलकर्णीसाहेबाना आपली सगळी हकिगत सागितली. आपला भाऊ पण क्लार्क आहे, काका शाळेंत मास्तर आहेत. शिवाप्पानें चहा आणला. सकोचलेल्या अव-स्थेंतच तिनें चहाचा कप हातात घेतला. मोठ्या प्रयासानें आवाज न करतां—डचमळ-णारा कप तिनें तोंडाला लावला.

कुलकर्णीसाहेब तिच्याकडे आधाशासारखे पाहात होते. त्याचा कटाळा पार पळाला होता.

" तुम्हीं लग्न कुठं जमवलंत ? "

या प्रश्नामुळें—ती मुलगी ओशाळली. तिला मेल्याहून मेलें झालें. तरीपण लाजत लाजत तिने लग्न कसं जमवलं तें कुलकर्णी-साहेबानं सांगितलें. मग एकदम बोलणें थांब-वून तिने हातातल्या छोट्या पाकिटातून एक चिठ्ठी बाहेर काढली आणि कुलकर्णीसाहे-बांच्या हातात दिली. घड्याळानें त्याचवेळीं दोनाचे टोले दिले

कुलकर्णीसाहेब चिठ्ठी वाचू लागले. ते चिठ्ठी वाचीत असतानाच ती म्हणाली—

" मी अर्ज कधी आणून देऊं— ? "

" थावा थावा--" चिठ्ठी पुरी वाचून झाल्यावर कुलकर्णी म्हणाले—

" अहो- सगळा घोटाळा केला आहे तुम्हीं. ही चिठ्ठी ज्याना लिहिली आहे–ते कुलकर्णी इंजिनिअर निराळे. मी तो नव्हे. हे कुलकर्णी सावित्री कॅनॉल डिव्हिजनचं एक्झि-इंजिनिअर आहेत---त्याना भेटा— "

" कुठ राहातात ते-- ? " एकदम उठत ती मुलगी म्हणाली.

" ते ना ? ते तिकडे सभाजीपार्कजवळ कुठंतरी राहातात. तुम्ही असं करा--अठरा नबरच्या बसनें जा. जिमखान्यावर उतरून सरळ चालत जा--तिथं कुणालाहि त्याचं ऑफिस विचारा. ऑफिसांत त्यांचा घरचा पत्ता मिळेल--हां ! सगळा घोटाळा--हः हः ! "

ती मुलगी सावकाश-जड पावलाने खोली-बाहेर गेली. सागितलेल्या ऑफिसांत जाऊन तिनें चौकशी केली. ते कुलकर्णी बदली होऊन गेलेले होते.

● ● ●

---

You have no more right to consume happiness without producing it.

जर सुख निर्माण करण्याची ताकद तुमच्यांत नसेल तर असलेल्या सुखावरहि तुमचा अधिकार पोचत नाहीं.

बर्नार्ड शॉ



# भागलेला जीव

लेखक : दत्ता सावळे

आजीची सत्तरी उलटून गेलेली आहे. तिच्या वयाला नेमकीं किती वर्षं झालींत, हें तिचं तिलाच सांगता येत नाहीं. "पहिल्या प्लेगांत आम्ही गांवाबाहेर राहायला गेलों होतों, तेव्हांच मला न्हाण आलं होतं. तेव्हां माझं चौदावं वरीस नुकतच संपल होतं. त्यावेळीं तुझ्या आजोबाला भल्या नारळा-येवढ्याला दोन गांठी येऊनदेखील तो वांचला." अशा थाटाची तिची कालमापनाची पद्धति आहे. त्यानुसार तिनं सत्तरी ओलांडली असावी असा आपणच तर्क करायचा. पण प्रत्यक्षांत ती खूपच म्हतारी दिसते.

सत्तर कदाचित् त्याहूनहि अधिक पावसाळे जिरवलेलं तिचं शरीर आतां पार वाळून गेलेलं आहे. तडकलेल्या काचेसारखी सुरकुत्यांची गिचमीड, साऱ्या शरीरभर इतस्तत: पसरलेली आहे. तिचं एकेकाळचं तांबूस गोरे-पण पार मावळून गेलेलं आहे. एक प्रकारच्या फिकट पिवळेपणांत बुचकळून काढल्यासारखी, सरत्या संधिप्रकाशासारखी ती फिकट, निस्तेज दिसत आहे. तिचे डोळे पार थिजून गेल्यासारखे झाले आहेत. अन् मोतीबिंदूचं हिरवं-पिवळं शेवाळ त्यांवर धरलं आहे. ती एक कानानं पार बहिरी आहे. आपल्याला तिच्याशीं बोलायचं असलं तर, तिनं तें ऐकावं असं वाटत असलं तर, दुसऱ्या कानाशीं मोठ्यानं ओरडावं लागतं. तरीहि आपण बोललेलं तिला सारं उमगतंच असं नाहीं. तोंडांत दांत नाहींत. गालावरची कातडी पार वाळून गेली, आहे, त्यामुळं तिचीं गालावरचीं हाडं, त्यांखालच्या खोलगटी पडक्या विहिरी-सारख्या अधिकच भयाण, भकास दिसतात. एकेकाळीं ती देखणी असावी, अशी तिचं त्या खोबणींतून उंचावलेलं सरळ नाक कल्पना देतं. पण तिचा आजचा चेहरा भेसूर दिसतो. अलिकडे तिच्या चेहऱ्यावर, हातापायांवर अधूनमधून सूज येते, मग ती अधिकच भेसूर दिसूं लागते.

तिचा दमा तिला, तिच्यासकट साऱ्या घराला एक डोकं उठविणारी कटकट वाटते. मध्येंच, तिचं वर आलेलं छातीचं हाड दुखाय लागतं,--आणि मग शेकायच्या पिशवीपायीं, तापलेल्या विटकरीपायीं ती ओरडायला लागते.

मधल्या अधाऱ्या खोलींत तिचें आतांशा अंथरूण घातलेलं असत. उशाला वेडके टाकायला राख घालून ठेवलेला पत्र्याचा डबा, मलमूत्र विसर्जनासाठी ठेवलेली लोखंडी पाटी, शेकायची पिशवी, कधी-मधी दिसणारी औषधाची बाटली, उशाशी ठेवलेली एकुलती एक गंजलेली किल्ली, असलेली चादीची सांखळी असा सारा पसारा तिच्याभोवतीं फेर धरून असतो.

दुहेरी अथरलेलं घोंगड, त्यावरच मऊ अलवण, उशाला अशीच अलवणाची घडी, पावरायला पासोडी अन् त्या साऱ्यात पाल्यापाचोळ्यासारखी बडून जाणारी आजी !

तिच्या खोलीत गेलं की, एका विचित्र कुंद, कुबट वासान डोक गरगरायला लागतं. तिथं तिच्या शेजारी फार वेळ बसवतदेखील नाहीं. आधीं मुळी तिथं जायची टाळाटाळच सारी करतात. मग ती ओरडाय लागते. "मी साऱ्यांना आता नकोशी झालेयू. हयतभर यांच्यासाठी मेले नि मेलें, आतां माझ्याजवळसुद्धां कुणी येत नाहीत. बोलत नाहीत."

कधीं कधीं ती स्वतःशींच काहीं असंबद्ध बडबडत उठते. पासोडीच्या घडीत गुडघे, कोपरापर्यंत हात कोंबून ती भिंतीला टेकून बसते नि खूपखूप बडबडते. थोड्यावेळानें तिची तीच शात होते नि तिथून दिसणाऱ्या अंगणातल्या नळाच्या वाहत्या धारेकडे एकटक पाहात बसते. तर कधी समोरच्या कोनाड्यांतील दत्ताच्या तसबिरीशेजारी तेवत असणाऱ्या समईच्या ज्योतीत काहीं शोधीत असते. त्या मिणमिणत्या ज्योतीतून स्वतःलाच कुठें तरी खोल खोल शोधीत असते.

या अतीताच्या शोधांत तिचं मन कुठंतरी हरवून बसतं, मग तिच वेड शरीर त्याला शोधायला दरदर वणवणत असत. त्यावेळी होणारे तिचे हाल पाहवत नाहीत. पण तिचं शोधण थांबत नाही. तें गवसेनास झालं कीं, ती चाळवते, बावरून जाते आणि शेवटीं ओरडायला लागते, "अग पार्वती, अग शेकायची पिशवी कुठ आहे माझी ? हें वर आलेलं हाड कस दुखतंय् बघ. अग, कुणी ऐकताय का ? बहिरे झालात कीं, काय सारे ? मेल्या हो, मला छळताय्. देव तुम्हालाहि असंच छळेल बर."—

अन् पिशवी उशाशींच असते.

एवढं बोलल्यावर तिला चागलीच धाप लागते, अन् दमेपर्यंत खोकून, ती पालथी डोक उशाच्या अलवणावर ठेऊन शांत पडून राहते. खोकल्याची उबळ गेली, धाप कमी झाली कीं, पुन्हा तिची शोधाशोध सुरूं होते.

ती कधीं कधी ही शोधाशोध, ही धांवाधाव थांबवायचा प्रयत्न करते. मनाला चुचकारते. "मला काय करायचं हें सारं आतां. माझं सारं झाल, गेल. आतां हरीहरी म्हणत बोलावण्याची वाट पाहायची." मनाचं सात्वन करीत ती स्वतःशीच म्हणते. पण हें सारं क्षणकालच असत. पुन्हा तिचा शोधाशोधीचा प्रवास सुरूं होतो.

खूप खूप शोधलं तरी तिचं बालपण कांहीं तिच्या हाताशी लागत नाही. चार-दोन घटनांच्या कागऱ्या हाताशीं लागतात; पण त्यांच्याशी तिला खेळताच येत नाही. वैतागून, कातावून ती त्या दूर भिरकावून देते. नि तिला आणखीनच एकटं एकटं वाटायला लागतं.

"अग पार्वती, अग शिऱ्या कुठं आहे ? त्याला जरा माझ्याजवळ देतेस ? अग, तो केव्हांचा रडतोय." तो रडत असो वा नसो, ती अशा काकुळत्या, थरथरत्या शब्दांत आपली अस्वस्थ व्यथा व्यक्त करते, नि पुढ्यांत शिरूला घेऊन त्याच्या मऊसूत जावळावरून हात फिरवीत फिरवीत पुन्हा देहभान विसरून जाते.

खरं म्हणजे ती माझी सख्खी आजी नाहींच. तिला मूलबाळ असं झालंच नाहीं. ती आहे माझ्या वडिलाची आत्या ! तिनं संसार असा –तिचा स्वतःचा–कधी केलाच नाहीं. तिला तिच सासर आठवत तेंहि अगदी अधुकसंच ! ताबूस डोळे अन् राकट मिशा एवढ्याच गोष्टी तिला तिच्या नवऱ्याच्या आठवतात. सासरची एक गोष्ट मात्र ती नेहमी साऱ्याना सागते. ती सासरीं गेली तेव्हा अगदीच लहान होती. नवरा बिजवर. तेव्हां तिची सासू रोज खोबऱ्याच्या वाट्या, खारीक, दूव द्यायची. लवकर वयात यावी ही सदिच्छा ! पण कुणी जवळ नसलें तर तें दूध आजी खुशाल मोरीत ओतून द्यायची. अगदीं शिसारी येत होती म्हणे तिला त्या सक्तीच्या खुराकाची

ते नवरा नांवाचे ताबूस डोळे वेळ सापडेल तेव्हा तिच्याकडे निरखून पाहात. तेवढ्यांत दुसरं कुणी आलं नाही, तर ती रडायला सुरवात करे.

एके दिवशी अचानकच तिला झोपेंतून मध्यरात्री उठवल आणि तिची सासू तिच्या गळा पडून रडूं लागली. तिला काहीच उमजेना. झोपेंनं तर ती अगदी पेंगळल्यासारखी झाली होती. सगळीकडेच रडण्याचा आकात चालूं होता. तिच्या नवऱ्याला साप चावला होता नि ते गुंजेसारखे डोळे कायमचे मिटले होते. तिच्या नवऱ्याची घडी घालून अखेरची बाधाबांध लोक करीत होते. इतर रडतात म्हणून तीहि त्याच्याबरोबर रडली; पण भोवतीं काय घडतंय् हें पुरतं तिला त्यावेळीं उमगलं नव्हतं. अन् त्यानंतर आठ-दहा दिवसानी बैलगाडीत बसून ती जो एकदा माहेरीं आली ती परत कधी सासरी गेलीच नाहीं.

इथून तिचं सारं आयुष्य बदललं. तिचा जीवनप्रवाह शात, स्थिरपणें वाहूं लागला.

घडलेलं सारं उमजण्याच तिच, वय नव्हतं. तरी माहेरी आल्यापासून तिनं आपण होऊन कामाच्या गाड्याला स्वतःला जुपून घेतलं. पडतील ते कष्ट तिनं विनातक्रार उपसले. एवढ्या मोठ्या घरातलीं सारीं धुणी दुपारीं दोन-दोन वाजेपर्यंत तळ्यावरून धुवून आणावींत, त्यानंतर पानांत पडेल तें खावं. त्यानंतर सारीं भांडीं, दळण आहे, काडण आहे; सार ती बिनतक्रार करायची.

पण दुपारीं कामानंतर भुकेनं कासावीस झालेल्या माझ्या आजीला "कार्टी वाढीस लागेल" म्हणून तिची आई अपुरं वाढून ताट द्यायची. तिनं अधिक मागितल तर वाढायची नाही. त्यामुळं भुकेनं वेडीपिशी झालेली माझी आजी, त्या गुंगीत सारी भूक विसरण्याकरिता आणखीनच पिसाटासारखी कष्टायची.

आज तिला त्या भुकेची आठवण झाली कीं ती अस्वस्थ होते. कासावीस होऊन अगदीं गुदमरलेल्या आवाजांत ती आईला म्हणते, "पार्वती, अग, तिखटामिठाचा साजा करतेस थोडासा ? खाऊसा वाटतोय ग मला. करशील तर असटसाच कर हं थोडा. मोकळा फळफळीत जात नाही मला. अगदीं गिळवत नाही." तिच्या बोलण्यात एक गुदमरलेली काकूळत असते. क्वचित आम्हालाहि ती जाणवते.

—पण समोर ठेवलेल्या गरम साज्याच्या वाफेकडे ती नुसती बघत बसते. थोडा चाळा करावा म्हणून ती बोट लावायला जाते नि

तिच्या सुरकुतल्या बोटांना त्या गरम, असट सांज्याचा चटका बसतो. पुन्हां ती ओरडाय लागते,

"दत्त्या, शिन्या कुठं अहात मेल्यांनो! या इकडं" अशी ती ओरडली कीं, मी हल्ली तिच्याकडे दुर्लक्ष करतो. पण लहान असताना अशा वेळी त्या ताटलीतला सारा सांजा मीच फस्त करीत होतों. मी तिच्या ताटलींतला साजा खाल्ला कीं, आई मला मारायची. तिला माझ्या हावरेपणाची चीड यायची. "थोडक्यात कस तें समाधान नाहीच. दिलं तरी मेल्याला दुसऱ्याच लागतं" असं काहीसं म्हणत ती दोन-चार रट्टे पाठीत घालायची.

आजीला या गोष्टीचा फार राग यायचा. डोळयात पाणी आणून, आमचा कड घेऊन ती मग आईशी भांडायला उठायची.

"मेल्यानों नवसासायासांनी इतरांना मुलं होत नाहीत. तुम्हाला देवानीं न मागतां, न संवरतां दिलीं, म्हणून असा त्यांचा सूड घेतोय काय? अगदी मारावसं वाटलं असेल, तर खुशाल भिंतीवर हात बडवून घ्यावेत. सोन्यासारख्या पोरांना खायपाई मारता, हाताला फोड येतील मेल्यांनों! खायचींच. मागायचीच. पोरं आहेत ती! अग, तुम्ही येवढया मोठ्या झालांत, तरी पोरांना सोडून चोरून खाता. नि त्यांना कशाला मारता?"

हल्ली माझी जागा शिरूनं घेतली आहे नि पूर्वींसारखा मी येत नाहीं म्हणून ती माझ्यावर सतापते, कातावते. तिला वाटते अजूनहि तिनं हाक मारल्याबरोबर शिरूबरोबर मीहि याव, ताटलींतला साजा खावा!

गेल्या तीन पिढ्या आमच्या वंशवेलीची निगराणी तिनं केली आहे. तिच्या आईचीं, भावजयीची, भावाच्या मुलीची बहिणीचीं, बहिणीच्या मुलीचीं नि अलिकडे सुना-नातसुनाची बाळतपणं करताकरतां तिची हयात गेली. आश्रित म्हणून ती आमच्या घरी आली; पण एखाद्या कर्त्या पुरुषाची प्रतिष्टा तिन इथं कमावली, उपभोगिली. घरात एखाद नव भांडं आणण्यापासून ते मुलामुलीच्या लग्नापयत तिच्या सल्ल्याशिवाय आमच्या घरच पान हालत नव्हत. तिचा शब्द म्हणजे अखेरचा!

हें सार तिला आठवत नि मग आजच्या पांगळेपणाची तिला चीड येते. आजच्या उपेक्षेचो तिला खत वाटते. मग कुठतरी पाहात ती बडबडू लागते,

"मी अशी बेवारशी! मूल नाहीं. बाळ नाहीं. पार्वती पण, तू अगदी पोरीसारखं करतेस हो माझं. अग, कोण कुणाचं करतं येवढ? देवाच्या दरबारात सारं रुजू होईल बर तुझं! होईल बरं, अगदीं नक्षत्रासारखी पोरगी होईल तुला. ती झाली म्हणजे माझी मोहीर मोडून काहींतरी करून घालणार आहे तिच्या अंगावर. अग, तें या घरच लेकीच धन आहे. तिच तिच्याकडं जाव. लेकीशिवाय ससार खरा नव्हे बघ."

माझे वडील घरात असले म्हणजे कधीं आजी त्याना आपल्याजवळ बोलावून घेते. त्याचा हात हातात घेऊन त्यावरून आपले शुष्क हात फिरवीत, त्यांच्या चेहऱ्याकडे रिकाम्या नजरेनं पाहात बसते. अगदीं एकटक "शकऱ्या, किती वाळलास रे!" ती नेहमीच्या काळजीत म्हणते. तिला आपलं प्रामाणिकपणें वाटतें की, वडिलांची प्रकृति नेहमी खगतेच. "तो साऱ्यांसाठी राबतो. आपल्याला मात्र त्याच्यासाठी कांहीं करतां येत नाहीं" म्हणून तिला अधिकच वाईट वाटतं.

असं तिचं बोलणं ऐकलं की, वडलांना संकोचल्यासारखं होतं. ते अपराधी वृत्तीनें तिच्या कपाळावर हात ठेवून, तिच्या प्रकृतीची विचारपूस करतात. कधीकधीं स्वस्थ बसून राहतात. "शंकर, मला येवढं बरं वाटलं की, दत्त्याला माडीवर घेणार आहे माझ्या, अरे, किती दिवस राहिलेत माझे? आहे तोंवर माझी आपली "विस्टेट" तेवढी दत्त्याला मिळालेली पाहूदे. नाहीतर सासरची सारीं गिळायला तयार आहेतच कीं!" तिच्या नवऱ्याचा चार-सहा एकर जमिनीचा एक तुकडा आहे. चार खण पडिक इमला आहे. अन् तिला हें सारं शकऱ्याच्या घरांत यावसं वाटतं.

नेहमींच्या स्वरांत वडील तिची समजूत घालण्याचा प्रयत्न करीत म्हणतात" पुरे झाल कीं आतां हें सारं. तुझी इस्टेट, घर-दार! आतां देवाचं नांव घे. हरी हरी म्हण. तेच बरोबर येणार आहे. बाकी सारं काही बरोबर येणार नाहीं तुझ्या–" म्हाताऱ्या माणसानी असच वागाव हा त्यांचा आदर्श. इतरानाहि जवळजवळ तसच वाटतं नि हें किंवा असलीच बोलणीं ऐकलीं कीं, तिला वडिलांनीं दिलेल्या तांब्याच्या तारेंत गांठवलेल्या चंदनी माळेची आठवण होते. ती शोधायपायीं इकडे तिकडे चांचपडू लागते. हाती लागली की, दोन–चार मणी अधिऱ्या अस्वस्थतेनं ओढते नि पाचव्या–सहाव्या मण्यावरच तिची बोटं थबकतात. अडून बसतात. शेजारीं बसलेल्या माणसाच्या चेहऱ्याकडे ती मग अधिकच उदास, भकास नजरेनें पाहायला लागते. वडील तिथें असले तर ते चिडतात. नि तिथून उठून म्हातारीला शिव्या देत दुसरीकडे निघून जातात.

शेजारी–पाजारी, तिच्याहून लहान पण साठी उलटलेला आजीचा काळ थोडाबहुत पाहिलेल्या एक–दोन म्हाताऱ्या आहेत. त्या तिच्याकडे बसायला आल्या म्हणजे आजीला बरं वाटतं. पुराणाला, देवाला जाताना त्या उभ्याउभ्या टेकून जातात. त्यातली एखादी न राहवून म्हणते, "आते, पुरे झाली कीं ससाराची ओढ, या वयांत सारा संसारीचा मायाजाळ सोडायचा असतो बरं! अग, जेवढं गुतवून घेशील तेवढी तेवढी गुतत जाशील. कुणाचीं लेकरं? कुणाचीं बाळं! ज्याचा ससार ते बघतील खुशाल. आपण कशाला उगीच गुंतवून घ्यावं. स्वतःचं ना मूल ना बाळ, कसा खुशाल देव देव करावा. पंढरपुरी राहावं, गाणगापुरी राहावं. जमेल तेवढा परमार्थ गांठीशी बांधावा. जन्मभर मेलीं उष्टी खरकटी नि बाळंतपणच केलीसच की!"

आजी हें सार तटस्थपणें ऐकते. उदासवाण हसते. डोळे मिटून घेते अन् त्यांतून, एखाद्या केळीच्या पानावरून दवाचे थेंब घरंगळावेत, तसे चार–दोन अश्रु तिच्या सुरकुतल्या गालावरून धावत धावत खालच्या पासोडीवर पडून जिरून जातात. हयातींत ती कधी देवाला गेली नाही. पुराणाला नाहीं. पोथीला नाहीं. येवढया जवळ पढरपूर आहे पण तिथंहि ती बळवळ एकदा गेली होती.

"बने" खोल दडपलेल्या आवाजांत, गाभाऱ्यांतून बोलावं तशी ती बोलूं लागते.

"अग, जन्मात कधी वाटलं नव्हतं, शंकऱ्या रांकेला लागेल. त्याचा ससार उभा राहिलेला मी पाहीन. त्याचा बाप मेला तेव्हा ही दोघं अगदीं लहान होतीं. शकऱ्या तर अवघ्या दोन वर्षांचा होता. त्याची आई तर बिचारी आधीच भरल्या कपाळानं गेली होती. तिनं जातांना माझ्या ओटयांत ह्या बाळांना घातलं नि डोळे मिटले. त्यानंतर त्याचा बाप गेला, भावजईनं खूप छळल, भावानं सारं लुबाडलं, कांहीं शिकवल नाहीं. मी कसं

त्यांना सभाळलं असंल माझं मला ठाऊक !

"पण बने, शंकन्यानं नशीब काढलन् बर का! खूप कष्ट केले. खूप सोसलं. आतां काय, संसार उभारला, दोन सोन्यासारखीं मुलं झालीं. एक मुलगी झाली की झालं! सपलच माझं बघायच—!"

येऊन बसलेल्या बायकाना हें ऐकवत नाही. आजीच्या ह्या आसक्तीची त्यांना कीव येते. तोंडावरचे काळजीचे आध्यत्मिक ओघळ पदरानं पुसत मग त्या लगबगीनं उठतात. उशीर झालेला असतो. पुराण सुरुं होणार असत. सीतेच्या डोहाळ जेवणाचा अध्याय सुरूं असतो.

पुन्हा आजी एकटी राहते. करकरीत तिन्हीसाजेला तिची अधिकच घालमेल होते. तिची कासावीशी वाढते नि आजून दिवे का लावले नाहींत म्हणून ती ओरडायला लागते. आम्ही उबऱ्यावर बसलों असलों, तर ओरडते "उठा मेल्यानो उंबऱ्यावरून, बसले दळभद्रे नेमके तिन्हीसाजेला उंबऱ्यावर ! अरे, लक्ष्मी येते यावेळी घरीं. वाट नका आडवूं तिची." आम्ही लहरीनुसार कधी उठतों, कधीं उठत नाहीं.

हल्लीं पूजेनंतर तिला मी रोज तीर्थ आणून देतों. तें कधी सपक आहे म्हणून तर कधीं पांचट आहे म्हणून ओरडते. तुळशीपत्र चुकून आलं तर तें तिखट आहे म्हणून कुरकुरते. नैवेद्याचं दूध दिलं तर तें मला प्यायला लावते. अगदीं नको म्हटलं तरी ! आणि समाधानानं माझ्या पाठीवरून हात फिरवीत ती स्वतःला विसरून पुन्हा कुठं पाहात बसते.

तिला तृप्ति खरीच वाटत नाही. हें निवांतपण तिला खायला उठत. तिला आयुष्यभर उपसलेले कष्ट आठवतात अन् तेच खरे वाटतात.

कधीकधीं हें सारंच असह्य होऊन कीं काय ती ओरडूं लागते. "नकारे मेल्यानों, माझा असा छळ करू. माझ्या भागीच्या पोरीचं बाळंतपण आहे. जाऊं द्या मला तिच्याकडं ! पहिलटकरीण आहे. तिच्या आईला, बहिणीना साऱ्याना बाळंतपणं जड गेलीत. मला माहीत आहेत साऱ्याच्या खोडी. मला सोडा रेऽ. इथ बांधून नका ठेवू. पोर जाईल बरं अशानं ! तिच्याकडं मला नेऊन पोंहचवा. आठवा सरला ह्या भादव्यांत तिचा..." अन् हिशोब तिला चकवतो "कितवा महिना ?" तिचा तिलाच हिशोब लागत नाहीं. कधीं म्हणते "सातवा सुरूं आहे" तर कधीं म्हणते "दिवस भरले पोरीचे."

ही सारी तडफड आम्हाला पाहवत नाही. तिची व्यथा कमी करावीशी वाटते. तिची समजूत घालतो. तिला हलवण्यासारख्या अवस्थेंत ती नाहीं, हें पटवून देण्याचा प्रयत्न करतो नि सारं निष्फळ झाल्यावर, सारे भोंवतीं जमून तिची कीव करतो.

कमी–जास्त झालं तर वाटतं, तिची अखेर जवळ आलीयू. उगीचच मन गहिंवरून येतं. आमच्या डोळ्यांतले अश्रू पाहून ती बोलूं लागते. "अरे, मी एवढ्यात मरत नाहीं. काहीं रडू नका. शंकऱ्याची पोरगी पाहिल्याशिवाय, दत्याला माडीवर घेतल्याशिवाय मी काही मरत नाहीं." ती एकाएकी गप्प बसते मग आमची धावाधांव सुरू होते. कुणी तुळशीपत्र आणायला धांवतो. कुणी गगाजळ तोंडात घालूं लागतो. कुणी रामरक्षा तोंडाने म्हणतो, आई आजीला राम म्हणायला सांगते. तिच्या हातीं कुणी माळ सारते, तिला ती ओढायला लावून पुण्यसंचयाची सक्ति आम्ही सारे तिच्यावर करतों. सारं मुकाट्यानं ती सहन करते नि पुटपुटते "अरे, जेवलात कां सारे ? मला कांहीं होत नाहीं. जेवा खुशाल तुम्ही !"


●●●

---

**I proclaim that might is right,**
**justice, the interest of the strongs.**

**बळी तो कान पिळी हें मी ओरडून सांगतों.**
**कारण, न्याय नेहमीं बळींच्याकडे झुकतो.**

**— प्लेटो**



# पाण्डव

भालचंद्र पत्की

काळोखांतुनी या दगडांच्या
उद्यां झरावें अमृत–सिंचन,
निराशेंतुनि आज मनाच्या
उद्यां हंसावें प्रकाश–नर्तन;

युगायुगाची, वीण असे ही
नैराश्याची अन् आशेची,
उद्यां उमलत्या काळोखानें––
या फुलवावें,

क्षितिजावरती सुवर्ण शतदल;
ग्रीष्म–दूत हे
या दुःशासनी आवेगानें,
जल–लहरींचें

भाव सुगंधित तलम वस्त्र हें,
लाज गुलाबी विवर्ण करण्या—
आहे खेचित;
हिरवें फुलतें, स्वप्न उमलतें

वसुंधरेचें
क्षणाक्षणाला आहे जाळित.
मुक्या मनानें सारे पाण्डव
असह्यतेच्या कर–तालिकेवर

टेकवून झुकलेली गर्दन
बसले आहे अश्रू ढाळित.
भाव दाटले मनांत एकच,
काळोखांतुनि या दगडांच्या

उद्यां झरावें अमृत सिंचन,
निराशेंतुनि आज मनाच्या
उद्यां हसावें प्रकाश–नर्तन...!
या लुटलेल्या स्वप्न कणांनीं

भग्न मनाच्या स्फुल्लिगांनीं
ओली आशा,
पट तेजाचा त्यांतच गुंफुनी
केला आहे हा रथ भीषण

नभी कोरडचा तो दुर्योधन
तिथेंच असता–
क्रांतीचें केलें रण कंदन.
सूड गर्जना करीत उठला

वादळ वाताचा रथ घेउन,
खड्ग चमकलें स्वप्न-कणांचें
धुळीत गेला अन् दुःशासन !
ओघळलेले विजयाचे कण

धांवत आले.
खिन्नमनाच्या जललहरींच्या
दुखः पिणाऱ्या वसुंधरेच्या
कुशींत दडले.

मुखांत त्यांच्या गीत गोड हें
काळोखांतुनि या दगडांच्या
सतत झरावें अमृत गायन
निराशेंतुनि आज मनाच्या
असें हंसावें प्रकाश–नर्तन...




## माझी सोनकेळ

माझ्या दारीं सोनकेळ
लगडली दंवानं
थेंब टपटप झरे
बाळांच्या कीं अंगावर.

उन्हांत न्हाहली
कशी बेहोष होऊन
जांभळें केळफुली
तिचें थरारलें स्वप्न.

पहांटेच्या गूढ क्षणीं
केळ कांपतें वाऱ्यांत
अन् लाटालाटा पसरती—
धुक्याच्या सागरांत.

माझी केळ भाबडी,
मनीं उगाच हांसते
इवल्याश्या अंकुराचें
बाळलेणें निरखिते.

सोन्याच्या रे पावलांनों,
नवा येऊं धिटाईनं
माझ्या केळीचं सानुलं
झोंपे--
तिला बिलगुन.

—सुमन करमरकर

## पायरी

एका थेंबाचा भुकेला
अर्धी पथारी मढचाला
जिणें तरी केवढें गा,
उगा आडोसा मनाला

किती पाहिले आधार
रिती कावड भरेल
तुझ्या स्नेहल सरीनें
माझें सरण विझेल !

तुला सांगातीं घेऊन
आग प्यायलों विराट
शिळ्या उष्टावणासाठीं
रोज चोखाळली वाट

देवा, वारीला निघालों
माथी पापाची शिदोरी
आतां तरी विठ्ठला गा,
माझी राखजो पायरी

केशव बोबडे


## रंग तुझा निम-गोरा

अंगणांत येतां स्वारी
धुंद शहारे मोगरा;
केतकिला मागें सारीं
रंग तुझा निमगोरा, !

जवळी तूं येतां
लाजे वेडी अबोली;
तुज हसतां पाहून
टाळ्या पिटी रुदाफुली ॥

भगवंत भाटे

# धा हजाराची युगत



" त्येच्या बायली, आता कशी उडत्यात बघूं कागदं " असें म्हणत दाजीबा इनामदारांनीं उजव्या मांडीवर एक जोराची थाप मारली आणि पुढें सरकून बटवा रिकामा करीत हजारांचें एक अशी दहा बंडलें त्यांनीं त्या कागदांवर ठेवलीं. कुलकर्णी वकिलांच्या म्हणण्याचा रोख त्यांच्या तेव्हांच ध्यानीं आला होता. रिकामा बटवा बांधतां, बांधतां एकवार त्या बंडलां-कडे दृष्टिक्षेप करीत त्यांनीं कोटाच्या गुंड्या आवळल्या आणि संवयीप्रमाणें खांक-रून वकिलांकडे कान लावले.

"छे, छे, छे ! हें काय भलतंच इनाम-दार ! मीं आपलं सहज गंमतीनं म्हटलं. उचला, उचला त्या नोटा. आत्तां मी तुमचा एक पैसाहि घेणार नाहीं. वरच्या कोर्टाची केस आहे. जिद्द करून पाहूं. देव पावला आणि झाला तुमच्यासारखा निकाल तर मग काय द्यायचं तें द्या ? कांहीं घाई नाहीं." दादासाहेब कुळकर्णीनीं वकिली सुतोवाच् केलें.

"दादासाव, तुमचं नांव ऐकून आलों तेवढं न्हाइ नका म्हनूं. समदे हरलेत. आतां तुमच्या बिगर कुनाच्यान व्हायचं न्हाइ. पैका ! त्येची काळजी तुम्हांस नग. म्या खंबीर हाय. पन कनचीबी युगत लढवा आन तेवढा फांस सोडवा पोराच्या गळचा. लय उपकार हुतील. जिता तर खरं, मग काय मागताल तिवढं मोजीन," दाजीबा इनामदार काकुळतीला आले होते.

दादासाहेबांनीं पैसे परत नेण्याचा आग्रह धरल्यामुळें दाजीबांचा नाइलाज झाला. त्यांनीं त्या सर्व नोटा पुनः...बटव्यांत नीट बांधल्या, तो कोटाच्या आंतील लांबोड्या खिशांत ठेवला, गुंड्या नीट आवळल्या आणि चहा लागलेल्या मिशा उपरण्याच्या सोग्यानें पुसत ते जाण्यासाठीं उठले.

"उद्यां नक्की करूं म्हणतों. जरा सका-ळींच या म्हणजे झालं. आतां मलाहि वेळ झालाय्. आणि तुमची केसहि गुंतागुंताची दिसते. निवांत, नीट पाह्यला हवी." दादा-साहेबांनीं इनामदारांस निरोप दिला.

'आपली युक्ति तर नामी लागू पडली. इनामदारांची ताकद कळली एकदांची. आतां केसचं काय एवढं कठीण नाहीं. बारकाइनं पाह्यला हवी खरं; पण आतां नको, रात्रींच निवांत पाहूं झालं' असा विचार करीत दादासाहेबांनीं केसचे सर्व कागदपत्र आपल्या खास कपाटांत ठेवून दिले; त्या दिवशींच्या महत्त्वाच्या केसेस् आपल्या बॅगेत ठेवल्या आणि बाकीच्या कारकुनास समजावून देऊन ते बग्गींत बसून कोर्टांत निघाले.

वडिलोपार्जित कुलकर्णी वतन चालत आल्यामुळें दादासाहेब कुळकर्ण्यांची सांपत्तिक स्थिति मुळचीच चागली होती. जिल्ह्याच्या मुख्य शहरीं त्याचा एक चौसोपी वाडा होता. सर्व सुखसोयीत त्याचें शिक्षण यथास्थित पार पडले होतें. बी. ए. आणि एल्. एल्बी. या दोन्ही परीक्षा प्रथम श्रेणींत उत्तीर्ण झाल्यावर त्यानी सुरुवातीची वर्षे आपल्या गांवी व नतर काही वर्षे पुण्यास

## ग. ना. वालावलकर.

वकिली केली. पुढें पुणें सोडून ते मुंबईस स्थायिक झाले. आणि तेथें थोडयाच दिवसांत चांगलें नांव मिळवून ॲड्व्होकेटची सनदहि मिळवली. परतु दोन मुलानतर पत्नीच्या सुरू झालेल्या वारंवारच्या आजाराला वैतागून त्यानी मुबई सोडली आणि ते परत आपल्या गावी आले. त्यानीं आतां गांवींच स्थिर होण्याचा विचार केला. घराची डागडुजी केली, वर एक मजला उठविला, नक्षी सामान-सुमानानें सजावट केली आणि वेळ घालविण्यासाठी म्हणून प्रॅक्टिसहि सुरु केली. पण त्याचें नांव त्याना स्वस्थ बसू देईना. प्रॅक्टिस अपेक्षेबाहेर वाढूं लागली. एव्हाना दादासाहेब कुळकर्णी एक हुशार, बुद्धिमान, कायद्याचें अद्ययावत् ज्ञान असलेले, कसलेले कायदेपडित म्हणून सगळीकडे मान्यता पावले होते. विशेषत: फौजदारी कज्जांत त्याचा हात धरणारा कोणी नव्हता. आपल्या तल्लख बुद्धीनें, बारीक सारीक कलमाच्या अचूक ज्ञानानें, धारदार, ओघवत्या वाणीनें त्यानीं कित्येक अवघड खटले जिंकले होते. त्यांची फी भारी असली तरी अशिलाची ताकदहि ते अजमावीत असत.

रात्रीचें जेवण आटोपल्यावर आज इतर गप्पात वेळ न काढता दादासाहेब लवकरच आपल्या खोलीत जाऊन बसले. त्यानी कपाटांतून सकाळचे दाजीबा इनामदाराच्या मुलाच्या खटल्याचे सर्व कागद काढले आणि शांतपणे वाचण्यास सुरवात केली. पचनामे, साक्षीपुरावे, जज्‌मेन्टस् इत्यादि सर्व कागदांच्या नकला त्यांनीं अत्यत काळजीपूर्वक वाचल्या. डब्यांतला जर्दा सपला होता तो नोकरास आणण्यास सांगून दादासाहेबानीं चष्मा काढून ठेवला व जरा स्वस्थ विचार करावा म्हणून ते आरामखुर्चीत पडले. ताड्कन उठले, काहीं कागद पुन: वाचले आणि खोलीत येरझारा घालू लागले. जर्दा घेऊन आलेल्या नोकराकडून तो घेत त्याला म्हणाले, " अरे केशव, एक काम आहे बघ. उद्याच्या उद्या आपल्या जान्या कातकऱ्याची गाठ घेऊन त्याला रात्रीच माझ्याकडे घेऊन यायला पाहिजे. फार जरूरीच काम आहे म्हणावं. "

दाजीबा इनामदारांच्या जीवाला घोर लागला होता. त्यांना मुळीच चैन पडत नव्हतें. सर्व बाजूनी शिकस्त करूनहि निकाल उलटच लागला होता आणि त्याचा एकुलता एक मुलगा लवकरच फासावर चढणार होता. अखेरचा यत्न म्हणून हायकोर्टांत अपील गुदरले होतें. आणि बऱ्याच जणानी सुचविल्यामुळें त्यानी दादासाहेब कुळकर्ण्यांकडे धाव घेतली होती. ते एका दोस्ताच्या घरी उतरले होते. सकाळीच उठून स्नानादि कार्यक्रम आटोपून दाजीबानीं मारुतीपुढें नारळ ठेवून बोल केला व वकीलसाहेबाच्या घराचा रस्ता धरला.

" या, या इनामदार. बसा. तुमचीच वाट पाहतोंय. म्हटलं वर्दळ सुरु व्हायच्या आधी तुमच म्हणणं नीट ऐकून घ्यावं. कागदपत्र पाहिलेत मी. पण तुम्ही सागाच एकदां, " दादासाहेबानीं इनामदारांचें स्वागत करीत म्हटलें.

" कुणी आल तर खालीच थांबवून घे बरं का रे केशव " त्यानी चहाचे कप घेऊन जाणाऱ्या नोकरास इशारिले आणि दोघेहि माडीवरच्या खोलीत गेले.

इनामदारानीं घसा खांकरला आणि थोडयाशा खालच्या आवाजात ते बोलूं लागले...

" ...काय सांगाव दादासाव, आमच्या इनामदाराच्या कितीक पिढया झाल्या, कितीक करती मानस होऊन गेली. रगड पैका आन् ताकद याच्या गुरमीत कुनी काय येडवाकडं केलंबी असल; कुनी फडात कडं, पागोटं, फेटल बी असल. पन अस इपरीत परराग आला न्हव्हता आजपत्तर. आज आल्या कुळाला बट्टा लागाया आला. मला तर खाड दावायला जागा ऱ्हायली नाहीं. माझ्या वडलांना आम्ही दोघंच. आम्ही वयांत आलों तसं आमचं लगीन-कार्य त्यानींच करून दिलं. आपल्या पश्चात वाद, भांडणं नको म्हणून दोघा भावात इष्टकीचं वाटं करून दिलं. आम्ही ऱ्हायलो इभक्त. पण भावाभावांत घुसफूस न्हाइ, का वादतंटा न्हाइ. दोघांचं कस बघा सुतावानी सरळ. तीन वर्सं लोटलीं. पन घरांत पाळणा हालायचं लक्षान दिसेना, माझ्या न्हाई आन् मोठ्या भावाच्या बी. लय वदु-डागतर केले, देवदेवस्की केली, पण उपेग झाला न्हाई. दवापाणी कराया म्हणून भाऊ मुबयस गेला. तिकडं त्यानं काय केलं काय नु पण कायशी याधी होऊन तो त्यांतच खलास झाला. पुढल्या सालीं मी दुसरं माणूस घरांत आनलं. आन् वरीसभरांत वशाला दिवा लागला. इनामदाराचं पोरगं आन् नवनवसानं जलमलेलं एकुलतं एक, त्याला कसची वाणदुण ? परतेकाच्या लाडांत पोरगं घेफारून वाढलं. हा, हां, म्हणतां वर्सं लोटलीं मनाला लागेल तसं खा-प्यायाचं, तालीम करायची. आन् गांवात हिंडायच मोकाट, वळुवानी हाच उद्येग व्हता. म्हनतां, म्हनतां, गांवांतल्या उण्णाड आणि टवाळ कार्टयांची संगत जडली. जवानीची भर, तालमीची रग आन् सग खट्याळ पोरं. एकेक परताप गाजू लागले. काना-कानापासून माझ्यापर्यंत कागाळ्या आल्या. परथम धाकल वय म्हणून बघतलं न्हाइ. पन लक्षान जरा ऱ्यारं दिसाया लागलं तस मी बी आवरण्याच्या लय यत्न केला. चारदां कानगोष्टी सागतल्या, दोनदां खडसावलं. चारदां कान बी पिरगाळला, पण उपेग नव्हता. कनचीच मात्रा लागू पडंना. पोरगा नादात गुतला गेला, सगतीत फितला गेला. संगतीच कामच मोठं हरामी बघा ! कनची बी संगत ऱ्हाईना, एकदां का लागली की तीच ग्वाड लागती. मग तिन वाटुळं केलं तरी डोळं उघडत न्हाईत. इनामदार, इनामदार, म्हनत दोस्त लोक याला चण्याच्या झाडावर चढवायचे. याला म्होरक्या करून नशेच्या नादांत याच्यापून पैका उकळायचे; याला म्होरं करून कायबी काम उरकून घ्यायचे. पुढ मीच त्याच्या हाती पैका द्याचा बद केला. आन् तेशा समद्यांच्याच नाडया आखडल्या. आमच्याकडे बघन परथम चार जणानीं हातउसनं दिल. पन पुढ त्येबी बद करून टाकलं. करायला गेलों गणपति आन् झालं माकाड. पैशाची तगी झाली तशी

दोस्तांपैकी एकाच्या टाळक्यातून शकल निघाली. याला असंच एकदां म्होरं केलं आन् टवाळानीं सगुणाबायकडे–आमच्या भावजय-कडे नजर वळवली. चार, सा दिसांतच इतका प्रकार केला, काय घावलं तेवढं घेतलं, आन् दोस्त लोक पशार झालं. नशेच्या नादापायीं पोरगा मात्तर अडकला गेला. पुढचं तुमच्यापाशी हायेच. दादासाब, आपल्या चुलतीला तो आईपून मानीत व्हता. तवा तो इतकं करनार न्हाइ अशी माझी खात्री हाये पन् कायद्याम्होरं आमचा विलाज चालंना, डोस्कं काम करीना. पोरगा तर फांसावर चढलच पन पन मला बी इख खावं वाटाया लागल. घरच्या माणसाचं हाल तर डोळयांनीं पघवनात. म्हणून पाय धरतो. कीं काय बी युगत लढवा, वाट्टल ती जिगर करा आन् यवढा फास सुटतोय का बघा. तुमचं उपकार सहीसही फेडीन." पाणावलेले डोळे उपरण्याने पुसत इनामदार शांत झाले.

"तुमची सर्व तयारी आहे किंवा नाही तेवढं सांगा. पुढचं मी पाहतों. पोरगा फांसावर जाणार म्हणता ना? मग मी सांगतो एवढं करून पाहायला काय हरकत आहे?" असें म्हणत दादासाहेबानीं इनामदाराच्या कानाशीं गोष्ट केली.

"चालल, बेशक चाललं!" इनामदारांनीं मांडीवर थाप मारली आणि मिशांवर हात फिरवीत ते जरा ताठून बसले. "मी सांगतो त्येला. बाकी समदं तुम्हीच बघा. माझी विच्छा नको आन् परानगी नको. होतो पुढं मी" इनामदार निघाले.

दाजीबा इनामदाराना पुनः एकदा आशा वाटू लागली होती. भर उन्हाळयाच्या महिन्यात पार आटून गेलेल्या विहिरींत आपसुक एकादा झरा सापडावा तसें त्यांना झाले होतें. त्यानी त्याच दिवशी मुक्काम हालविला आणि दुसऱ्या दिवशीं तुरुंगांत जाऊन मुलाची गांठ घेतली.

दादासाहेब कुळकर्ण्यांनी आपल्या कामाची आवराआवर केली आणि ते पुढील कामास निघाले. एक दिवस मध्यें थांबून इनामदाराच्या मुलाची तुरुंगांतील भेट घेण्याचें काम मात्र त्यांनीं पूर्ण सावधगिरीनें पार पार पाडलें.

चार दिवसानीं कोर्टात खटला उभा राहिला. सरकारतर्फे बाजू मांडली गेली आणि दिलेली शिक्षा योग्यच आहे असे ठरविण्यांत आलें. कांहीं महत्त्वाचे साक्षीदार तपासण्याचें आणि तांत्रिक पुरावा दाखविण्याचें काम संपल्यावर दादासाहेबानीं तयारीसाठीं एक दिवसाची मुदत घेतली आणि तिसऱ्या दिवशी बचावाच्या भाषणास सुरुवात केली. त्याचा आवाज अजून स्पष्ट व ठाव घेणारा होता. आवाजातील चढउतार चित्तवेधक होता. मुद्दा ठसविण्याची शैली मार्मिक होती. कोर्टास अभिवादन करून भाषणास प्रारंभ करताच सगळीकडे शांतता झाली. इनामदारांच्या कुळाची परंपरागत प्रतिष्ठा, त्यांच्या घराण्यातील कर्त्या माणसांचा धावता इतिहास, गांवांतील त्यांचें स्थान, गांवच्या विकास कार्यासाठीं त्यानी केलेलें उदार मदतकार्य इत्यादि मुद्दे मोठ्या कौशल्यानें मांडून ते म्हणाले...

"दाजीबा इनामदारांची गांवांतील प्रतिष्ठा आणि त्याना प्राप्त झालेलें वाढतें वैभव ही दुःसह होऊन कोणीतरी त्याना बदनाम करण्याच्या हेतूनें त्यांच्याविरुद्ध हें कुभांड रचून त्यांच्या मुलास यात नाहक गोंवले असून त्यालाच मुख्य आरोपी करण्याचें कारस्थान केले आहे. नरडीचे चावे घेतले आणि त्या कारणाने सगुणाबाईस मृत्यू आला. ही वस्तुस्थिति असली तरी त्याबाबत आमच्या अशिलास जे दोषी ठरविण्यांत आले आहे तें किती निराधार व अपुऱ्या चौकशीचें आहे हें मी मे. कोर्टाच्या नजरेस आणूं इच्छितों. आमचा अशिल याप्रकारें गुन्हा करणें मुळांतच शक्य नाहीं. कारण एकदा गांवच्या उरुसात बैलगाड्यांच्या शर्यतीत भाग घेतलेला असतां भर वेगांतच त्या गाडीचें बैल उधळले गेले, गाडी साफ उलटीपालटी झाली आणि त्या अपघातांत जोरानें दूर फेंकले जाऊन त्याच्या दांताना जबर इजा पोहोंचली होती. डॉक्टराच्या सल्ल्यावरून त्याच वेळीं त्याचे खालचे वरचे दांत काढलेले आहेत. कोर्टानें हीं परिस्थिति समक्ष पाहून खात्री करावी.

कोर्टाच्या हुकुमावरून आरोपीस आणून तोंड उघडण्यास सांगितलें. तों खरेंच! सरकारी वकीलादि फिर्यादी मडळी त्याचे दात त्यांच्या घशात गेल्यामुळें आ वासून पाहत राहिली. आरोपीची माणसें हलकेंच दांत दाखवून गालातल्यागालात हसू लागली. पोलिसमंडळी एकमेकावर दात खाऊं लागली. "केसचे कागदपत्र तयार करण्यात बराच अपुरेपणा राहिला आहे. ते तयार करताना वस्तुस्थितीशीं ते पूर्णतः पडताळलेले नाहींत"... इत्यादि शेरे देऊन कोर्टानें आरोपीच्या वकिलाचा बचाव ग्राह्य धरून आरोपीस निर्दोष सोडून दिल्याचें निकालपत्र जाहीर केलें.

जीवावरचें शेपटावर निभावलें होतें. दाजीबा इनामदाराच्या मुलाच्या गळ्यामोवतीचा फांस सुटला होता. जान्या कातकऱ्याची दंतमुळी अचूक उपकारी झाल्यानें त्याला शभराची नोट व पागोटें मिळालें होतें आणि दादासाहेब कुळकर्ण्यांची सफल झालेली 'युगत' दाजीबा इनामदाराचा रिकामा होत असलेला 'घा हजराचा' बटवा एकटक पाहात होती.

• • •

---

'सुरेश भट' यांच्या 'आकाशगंगे'चा तिसरा स्पंद कांहीं अपरिहार्य कारणास्तव या अंकांत प्रसिद्ध होऊं शकला नाहीं. यापुढें स्पंद क्रमशः दर अंकांत न देतां लेखकाच्या सोयीप्रमाणें ते अधूनमधून देण्याचें योजिलें आहे.

— संपादक

# ‘ व्रती ’ आणि अरविंद गोखले.

: समीक्षक :
प्रा. भीमराव कुलकर्णी

१९४५ च्या दरम्यान मराठी कथेला एक नवे बळ आलें. श्री. अरविंद गोखल्याचा सुरुवातीपासूनच ह्या कार्यामध्यें फार मोठा वाटा आहे. गेल्या दीड–दोन तपात या कथेनें मोठा जोम धरला. त्यामध्यें नव्या–जुन्यांची धुमश्चक्री झाली. नव्यानीं आपण फारच नवें साधल्याचा आग्रह धरला व काही जाणकार टीकाकारां-नीहि मुक्त हस्तानें त्याच्या पदरी हें माप टाकून दिलें आणि लवकरच ही नवी कथाहि ठराविक साच्यातून फिरू लागल्यानंतर ज्यानीं नव्याचा खूप उदोउदो केला, त्यांनीच हे ‘ नवीन ’ आतां नवीन राहिलें नसल्याची घोषणा केली.

या सर्व वादावादीत आणि नवीन शिक्क्यांचे टिळेटोप लावून मिरविण्याच्या भाऊगर्दीत गोखल्यानीं मात्र सातत्यानें व निष्ठेनें आपले कथालेखन चालू ठेविलें आहे. प्रसिद्ध फ्रेंच लेखक मोपांसासारखे ते केवळ कथा–वाङमयाशी एकनिष्ठ राहणारे स्थिर लेखक होत. लघुकथा लेखनाची त्याची सारी तपश्चर्या ही एकलव्यासारखी. आपण होऊन त्यांनीं कधीं कुणाला मार्ग पुसला नाहीं. तसेंच लेखनातील पाश्चात्य प्रयोगांना ते कुणाच्या सांगण्यानुसार बळी पडले नाहीत नव्या जुन्याच्या कुठल्याहि धाग्यादोऱ्याना न चिकटतां एकलव्याच्या निष्ठेने त्याना म्हणूनच स्वयसिद्ध प्रतिष्ठा प्राप्त करून घेतां आली.

‘ व्रती ’ हा त्यांचा यावर्षी प्रसिद्ध झालेला सोळावा कथासंग्रह असें म्हटले जातें. अर्थात्च तो कितवा सग्रह याला येथें अर्थातच मुळीं महत्त्व नाहीं. महत्त्व मात्र एका गोष्टीचें की, या सर्व कालखडां-तून इतक्या विपुल प्रमाणात कथा–लेखन करून आणि उलट–सुलट मतामतातराच्या अनेक स्थित्यतरातून जाऊनहि कथालेखनाच्या-सबधींचा त्याचा उत्साह अद्यापहि मावळला नाही या गोष्टीचे म्हणजे कशाहि प्रकारच्या टीकेचे श्री. गोखल्याच्या प्रतिभेनें फारसें सोयरसुतक पाळले नाहीं, ही गोष्ट प्रामुख्यानें या ठिकाणी लक्षात येतें.

आणि म्हणूनच सोळावा म्हणून समजल्या जाणाऱ्या या कथा-सग्रहातील कथा वाचताना अगदी सुरुवातीची ‘ कोंकराची कथा ’ आणि नवकथेच्या जमान्यात जिची खूप चर्चा झाली ती ‘ मंजुळा ’ या कथा आठवल्याखेरीज राहात नाहीत. मध्यमवर्गियाचें भावविश्व गोखले यांच्या कथांतून केळीच्या सोटाप्रमाणें अनेक पदरी परंतु नितळ स्वरूपात नेहमीच प्रगट होतें. मध्यमवर्गियांच्या जीवनांतील नाट्य, गूढता किंवा परस्पर सवंधांतील तीव्रता ही कांहीं अशीं बोथट, ओशट आणि एका विशिष्ट पातळींतच रेंगाळत राहातें. ह्या जीवनातील गुंतागुतीचे धागे आपल्या अनेक कथांतून गोखल्यांनी म्हणूनच जुन्या कथेपेक्षां अधिक अंतर्मुख होऊन आणि नव्या कथे-प्रमाणें केवळ प्रतिमाच्या चिवडाचिवडीतून निवडण्याच्या चिकित्सक वृत्तीचा अतिरेक होऊ न देतां, आपल्या कथेंतून पकडले आहेत. नव-कथेच्या या जमान्यात जुन्या–नव्याना भुरळ पाडणारी आणि अति-नव्याना नाकं मुरडण्याऱ्याना जागा ठेवणारी अशीच गोखल्याची कथा यामुळेंच ठरते.

## प्रतिभासाधनी कथा

एक-दीड तपाच्या तपश्चर्येमुळें गोखल्याच्या लेखनांत आत्मविश्वास वाढलेला दिसून आला तरी गोखल्याच्या कथेवरचे हे नवे–जुने सस्कार अजूनहि चागलेच पक्के आहेत, ही गोष्ट हा सग्रह वाचून वाचकांच्या मनावर ठसेल. १९४५ पूर्वी ‘ प्रतिभासाधनी ’ कथेने मराठी कथा-वाङमयात फार मोठें अधिराज्य गाजविलें. ही प्रतिभासाधनी कथा अद्यापहि फार मोठमोठ्या लेखकापासून सुटत नाही. त्याचें कारण अगदीं सरळ आहे. वाङमयातील एका फार मोठ्या अशा परिणाम-ऐक्याच्या कसोटीचा प्रतिभासाधनी कथेंत एक प्रकारच्या अवास्तवतेनें उपयोग करून घेतला गेला. कथेचा शेवट परिणामकारी असावा, या प्रतिभासाधनी कथेंतील दंडकाबद्दल फारसा आक्षेप नाही परतु कथेचा शेवटचा परिणाम साधण्याची पद्धत मात्र या कथेने फारच विचित्रप्रकारें लेखकांच्या मनावर ठसविली. त्यामुळें कथावाङमयांत लेखक शेवट अगोदर निश्चित करून उलटा क्रम कागदावर उतरवूं लागले. गोखल्यानी या कथेचे इतके बटबटीत आणि स्थूल अनुकरण कधीच केलें नाहीं मात्र याचा प्रभावहि गोखल्याच्या कथेवरचा सुटला नाहीं. ‘ अपरिमिता ’, ‘ मादी ’ या दोन कथांचीं उदाहरणें पुरेशीं

आहेत. पुण्याच्या महापुरानंतरच्या दुसऱ्या दिवशी घडलेल्या घटनेचा आधार घेऊन गोखल्यांनी ही कथा लिहिली. पुण्यामध्यें घडलेल्या या घटनेवर अनेक लेखकांची दिवाळी साजरी होईल, असें भाकित तत्काळ करण्यात आले होते. गोखल्यासारख्या लेखकहि या झपाट्यांत सापडल्यानंतर काही फार निराळें अपेक्षित होते. मात्र गोखल्याकडून हुकमी प्रतिभासाधनी कथा निर्माण झाली व वाचकाचा विरस झाला, एवढेंच.

'मादी' या कथेचेंहि असेच झाले आहे. ह्या कथेची सुरुवातच थोडीशी गूढ, अगम्य अशा भावनांची तार छेडीत झाली. आणि ह्या अगम्यतेच्या रस्त्यावरून चालता चालतां ही काळूची चित्तरकथा आपल्या जीवाचा थरकाप उडविणार अशा नाजूक ठिकाणावर ती आली. त्याचक्षणी अचानक त्या बाईने त्या माकडाला मागणी घातली आणि कथानकाची गाडी प्रतिभासाधनी रूळावर जाऊन एकदम त्यांतली सगळी गूढता लोपली. आतां ही गाडी ठराविक मार्गानें कुठले स्टेशन गाठणार हें फारसें सांगण्याची गरजच राहिली नाहीं.

ज्याला आपण खरीखुरी नवकथा म्हणू, तिचे स्वरूप पोटात पाय असणाऱ्या सापाप्रमाणे असतें. बाहेरून जरी त्याचे पाय दिसले नाहींत तरी त्या असख्य दडलेल्या पायाच्या सहाय्यानें नागमोडी वळणें घेत तो सर्प उन्हामध्यें भय निर्माण करीत आपल्यासमोरून निघून जातो आणि तो निघून गेल्यावर समोरच्या धुळीत उमटलेल्या खुणांवरून त्याची गति आपल्या मनांत कायमची ठाण माडून बसते.

प्रसिद्ध झालेल्या बहुतेक संग्रहातून दोन-तीन अशा प्रकारच्या गोखल्यांच्या कथा नेहमीच आढळतात. या सग्रहातील 'अडुळसा आणि 'व्रती' या त्या दोन कथा होत. ( त्यातहि एक गोष्ट ही की, गोखल्याच्या नायिकाप्रधान कथाच अधिक पीळदार असतात. )

'अडुळसा' आणि 'व्रती' या कथेंतील दोन्ही नायिका मुळांतूनच व्यभिचारी वृत्तीच्या आहेत. परंतु त्याच्याकडे पाहाण्याचा लेखकाचा दृष्टिकोन मात्र भिन्न आहे. आपण करीत असलेल्या कृत्याबद्दल कसलीहि खंत न बाळगणारी 'सीता' आणि आपण केलेल्या व्याभिचाराची घृणा वाटणारी माधुरी याच्याकडे पाहाताना लेखकानें पहिल्या कथेंत नीति-अनीतीच्या कल्पनेचा वारादेखील स्वत:ला लागू न देता अतिशय थडपणें तिच्या मनातील दडलेले पाय रंगविले आहेत. खरोखर ही अडुळसा कथेच्या अगदीं शेवटच्या भागापर्यंत वाचकांच्या मनांत चांगली ढास निर्माण करते परंतु शाहूच्या पत्नीला मूल होणार या कल्पनेनें ती जी हादरते त्यामुळेंच सदादित तापलेला थडपणा नाहींसा होऊन वाचक नि:श्वास टाकतो. 'नागमोड' ह्या सामान्य कथेंतील लेखकाचा थंडपणा असाच वाचकांना अस्वस्थ करतो. या उलट 'व्रती' मधलीचें व्रत ह्या जगाच्या काळ्या नीतिमुळें पुन्हा कसे धोक्यात येऊं पाहात आहे हें सांगताना लेखक आत्मीयतेने तिची तगमग व्यक्त करतो, त्यावेळी नकळत सहानुभूतीचा सूक्ष्म धागा पकडून वाचक तरगत असतो. एक प्रकारच्या सहजप्रेरणेच्या स्वरूपात या कथा अवतरतात

या दोन कथानंतर आपल्या कथालेखनाच्या हुकमी लेखणीच्या बळावर लेखक वाचनीय कथा सादर करतो असे म्हणता येतील अशा बाकीच्या सगळ्या कथा. 'हातचा हरि' या कथेचा आशय कुठल्याहि शाळकरी प्रणयकथेच्या आवाक्यातला. परंतु गोखल्यांनी त्यातहि चांगलीच रसवत्ता निर्माण केली आहे. ती सुमित्रेची डायरी आपल्यासमोर कौशल्याने उलगडण्याचें नावीन्य साधून. पौगंडावस्थेंतील कुमारिकेच्या मनातील 'फणा' हि दोन परस्पर विरुद्ध मनोवस्थेच्या पार्श्वभूमीवर त्यानीं अतिशय आकर्षकपणे उभा केला आहे. या कथासग्रहातील 'उभा जन्म उन्हांत' या कथेचा नव्या लेखकानीं चांगला अभ्यास केला पाहिजे. एक अत्यंत क्षीण विषय घेऊन काहींशा विस्कळित वाटणाऱ्या उभा-आडव्या धाग्यांतून ही दीर्घकथा विणलेली आहे. खरोखर फारसा समृद्ध आशय नसतांना सिद्धहस्त लेखक एखादी कथा किती परिणामकारक हाताळू शकतो याचें हे एक उत्तम उदाहरण. खरोखर या कथेंतील राजाच्या भावना अतिशय उबवलेल्या आणि म्हणूनच अवास्तव आहेत. परंतु या फसव्या खोट्या भावनेवर लेखकानें इमारत मात्र मोठी आकर्षक उभी केली आहे. म्हणून संबंध कथा शेवटपर्यंत वाचक वाचत राहिला तरी त्याच्या मनावर कसलीच रेषा ही कथा शेवटी उमटवून जात नाहीं.

## सौम्य आणि संयत

या कथांतील सर्व कथा वाचल्यानंतर आणखी एक गोष्ट प्रामुख्यानें जाणवते. ती ही की, गोखल्याच्या कथेंतील जाणिवा-नेणिवांच्या प्रक्रिया या अतिशय सौम्य आणि सयत अशाच आहेत. जीवनातले कुठलेंच नाटक त्यांच्या कथांतून अतिशय तीव्रतेनें येत नाही. जीवननाट्यामध्येंहि कित्येक वेळां कल्पिताहून अद्भूत, भडक घटना प्रत्यहि घडत असतात. गोखल्यांच्या शात, सय, संयम वृत्तीला त्याचें फारसें आव्हान नाही.


मात्र हळूहळू नाजूक बोचकारे काढणारा एकप्रकारचा थंड उपहास गोखल्याच्या कथांना चांगलाच मानवू लागला आहे. फारसं भाष्य न करतां, कोट्याची कास न धरणारा हा उपहास त्यांच्या कथांत काहीवेळां मनात नाजूक ठिकाण लक्षात राहातील असे बोचकारे काढून जातो. 'आम्ही' ही कथा गोखल्याच्या नेहमीच्या कथापेक्षां निराळी, उठून दिसणारी व प्रभावी उपहास–कथा आहे.

मला वाटते, आपल्या कथेचा शेवट धक्का देणारी असावी अशी वृत्ति न बाळगणारी, परंतु आपल्या कथेचा शेवट वाचकाचें चित्त विचलित करणारी, थडपणें मध्यमवर्गीय स्त्रीच्या अंत:करणाचा नाजूकतेनें व कुशलतेनें वेध घेणारी आणि क्वचित् शांत सौम्य उपहासाने खुलून दिसणारी सयमित कथा ही गोखल्याची शक्ति आहे.

त्यामध्यें येणारी मुग्धता व काव्यात्मता यावर मराठी वाचक फिदा असतो.

याखेरीज बाकीच्या कथा म्हणजे दिवाळीतले धाऊक दारूकाम वाटतें !

●●●



## : द्राक्षवेल :

वास्तविक द्राक्षवेल हा एक मोत्याच्या कर्णफुलांचा प्रकार आहे. आणि त्याचें चित्र सग्रहावर देण्यात औचित्य व नाविन्यहि दिसतें असतें. श्री. वालावलकरांचा हा कवितासग्रह पुस्तकांच्या जगांत नव्यानेंच प्रवेश करीत आहे. या कविता अनेक नियत कालिकांतून पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या असल्यामुळें वाचकाच्या अवलोकनांत आलेल्या आहेतच. काव्याचें मूल्यमापन हा व्यक्तीचा प्रश्न नाही. काळ आणि समष्टिच तो सोडवू शकेल-च साहित्यांतील यांच्या स्थानाचा त्यांच्याकडूनच निर्णयहि होईल. मात्र रसग्रहण हें रसिकांचें कर्तव्य आहे.

या संग्रहांत वेगवेगळ्या विषयांवर व आशयांवरहि ५५ कविता आहेत. बहुतेक कवितांतून ओघवती वाणी आहे. सामाजिक सहानुभूति आहे आणि थोडीबहुत जीवनाची अनुभूतीहि आहे. मात्र पहिल्याच द्राक्षवेल या कवितेंत कवीनीं आंबट द्राक्षाचें प्रतीक कां उभें केलें आहें हें मात्र कळत नाहीं. कदाचित कांही अर्थ-अगम्य कवितांबद्दल हा उल्लेख असल्यास न कळे !

एकंदरीत या कविता जुन्या वळणाच्या म्हणजेच कमळं, चंद्र, भमर तोंडली इत्यादी सकेतांपासून अलिप्त आहेत. आणि नव्या हिडीस अर्थशून्य प्रतिमाचीहि यांत उणीवच दिसते. गिधाडें नाहींत, कुजके उंदीर नाहींत, आतडीं नाहीत आणि गूढ अगम्य आशयहि नाहीं. आहे तें सर्व उघडें (नागडें नव्हें) सामाजिक आणि नैसर्गिक सत्य !

कवितांचें एकंदर वळण प्रसादयुक्त, अर्थगम्य आणि भोळेंभाबडें, त्यांच्याच शब्दात सागायचें म्हणजे सुदाम्याच्या पोटलीचेंच आहे. *अर्थात त्यात वृत्ति हेलावून टाकण्यासारखें काही नाहीं हें त्याचेंच मत* आहे.

एकदरीत संग्रह वाचनीय व संग्राह्य आहे.

सौ. इंदिरा तेलंग

**द्राक्षवेल**

कवि :– सी. पु. वालावलकर

प्रकाशक : कोंकण वैभव, २/४ टोपीवाला लेन, मुबई २०.

मूल्य दीड रुपाया.

• •

### इतिहासांतील नवलकथा

ले. म. वि. सोवनी : प्रकाशक, अनाथ विद्यार्थी गृह प्रकाशन, पुणें २. पृष्ठें ३६. किं. ७५. न. पं.

पेशवाईंतल्या या कथा मुलाना आकर्षक आहेत. प्रत्येक कथेचा पसारा अगदीं आटोपता आहे. पाल्हाळ नसल्यामुळें झटपट वाचून संपतात. मुलाना आवडतील असा विश्वास वाटतो.

• •

## : भागवत धर्म आणि ईश्वरसाक्षात्कार :

लेखक व प्रकाशक :—

ह. भ. प. नामदेव फकिराजी गणगणे.

शेगांव. जि. बुलढाणा. मूल्य एक रुपाया.

या पुस्तकांत वेद, उपनिषदें, आरण्यकें, दर्शने, स्मृति, पुराणें, महा*भारत इत्यादि ग्रंथाचा धांवता परिचय देण्यात आला असून*, प्राचीन, अर्वाचीन संतांचीं चरित्रेंहि थोडक्यांत दिलेली आहेत. भागवत धर्माच्या कक्षा स्पष्ट करण्यासाठीं लेखकानें हें परिश्रमपूर्वक सकलन केलेलें आहे. माहिती उपयुक्त आहे व सदर्भग्रथ म्हणून उपयोगी ठरेल. पुस्तकाची छपाई व रूप मात्र सत्र नाही.

• •

### भारताचे मानकरी : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

ले. दत्ता श्री. टोळ, बी. ए. बी. कॉम्. प्रकाशक अ. ज. प्रभु, विदर्भ मराठवाडा बुक कपनी, १३२० शुक्रवार पेठ, बाजीराव रोड, पुणें २. पृष्ठें ३६ किं. ७५ न. पै.

लहान मुलांना भारतांतील थोर पुढाऱ्यांची माहिती व्हावी या उद्देशानें सरळ, सोप्या भाषेत लिहिलेलं डॉ. आंबेडकरांचं हें चरित्र मुलांच्या ज्ञानांत निश्चित भर घालील. मुलांच्या पुस्तक संग्रहांत याला स्थान मिळायला हवें.

• •

## : शक्तिकेतु :

(खंडकाव्य)

कवि : गं. रा. पाठक.

प्रकाशक : गं. रा. पाठक, ३ सदाशिव, पुणें २.

मूल्य : एक रुपया.

भीम आणि त्याचा सुमतिपुत्र शक्तिकेतु यांच्या दैवगतीनें झालेल्या युद्धप्रसगावर हे खंडकाव्य कवीनें गुंफलें आहे. पुत्राची हत्या पित्याकडून व्हावी या घटनेचें प्रचड दु.ख कवीने अचूक शब्दात टिपलें आहे. इतकेंच नव्हे, तर या घटनेला त्यानी दिलेला सामाजिक आशय—

या भूमीचें दैवच हें कीं, आप्तांचा आप्तांनीं
घात करावा आणि रडावें नंतर त्यांना स्मरुनी

कुणालाहि पटेल असाच आहे.

श्रीकृष्णाची काव्यात आलेली *व्यक्तिरेखा* आणि उक्ति अत्यंत रम्य आहे. श्री. के. ना. वाटवे यानी अभिप्रायांत या काव्याविषयीं जें कवतिक लिहिलें आहे त्याचा प्रत्यय काव्यवाचनानें पुरेपूर येतो. भारतीय पुराणातील अशा अनेक प्रसगांवर श्री. पाठक यानी काव्यरचना केली तर वाचक तिचें स्वागतच करतील.

• • •

" चीनची क्रांति घ्या, स्पेनमधील उठाव घ्या किंवा युगोस्लाव्हियांतील क्रांति घ्या. या प्रत्येक वेळीं ऐन वेळेस रशियानें क्रांतीला यत्किंचितहि हातभार लावलेला नाहीं असें लक्षांत येईल. यावरून असा प्रवाद निघाला कीं, स्टॅलिनला या क्रांत्या मान्य नव्हत्या. परंतु हें सर्वस्वीं खरें नाहीं. ज्या ज्या वेळीं एखादी क्रांति ही रशियाच्या दृष्टीनें हिताची नव्हती त्या त्या वेळीं स्टॅलिननें त्या त्या क्रांतीला पाठिंबा दिलेला नाहीं. जर मॉस्कोबाहेर चळवळीचें किंवा क्रांतीचें केंद्र गेलें तर त्या त्या क्रांतीवर वचक राहाणें कठिण, ही गोष्ट स्टॅलीन समजून होता. असें झालें तर कम्युनिस्ट जगांत रशियाचें जें अढळ स्थान आहे त्याला धक्का बसेल या भीतिपोटीं व स्वार्थी हेतूनें स्टॅलीन अशा वेळीं स्वस्थ बसे. म्हणूनच जोंपर्यंत क्रांतीचीं सूत्रें मॉस्कोला टिकून असत तोंपर्यंतच रशियाचा उघड पाठिंबा क्रांतीला लाभत असे. मला वाटतें, आजदेखील रशियाच्या या धोरणांत बदल झालेला नाहीं. "

असे कितीतरी मौलिक विचार जिलास निवेदनाच्या ओघांत सहज सांगून टाकतो.

मेलोव्हिन जिलास याच्या

Conversations with Stalin

या पुस्तकाचा प्रदीर्घ परिचय

— लेखांक दुसरा —

रा. म. शास्त्री

# मी पाहिलेला



# लाल हुकुमशहा



**१९४४** च्या उन्हाळ्यांत लाल सैन्यानें बेलग्रेड मुक्त केलें. युगोस्लाव्हियाची राजधानी जर्मनांनीं खालीं केली. या यशाच्या उन्मादांत लाल सैन्यांतील अधिकाऱ्यांनीं आणि रशियन कम्युनिस्ट पार्टीतील कांहीं म्होरक्यांनीं युगोस्लायाच्या सैन्यावर व लोकांवर बरेच अत्याचार केले. त्यामुळें युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पक्षाची स्थिति मोठी दयनीय झाली.

टिटो यावेळीं रुमानियांतून-मास्कोला गेलेला होता. स्टॅलिनची गांठ घेऊन तो परत येतांच लाल सैन्यानें केलेल्या अत्याचारांना तोंड फुटण्याची वेळ आली.

टिटोच्या घरीं जी याबाबत बैठक झाली तिला जिलास, कारडेलज् व रँकोविक असे तिघे हजर होते. हे चौघे हेच युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पार्टीचे सूत्रधार आतां शिल्लक उरले होते. सोविएट लष्करी शिष्टमंडळाचे प्रमुख जनरल कोरनेइव्ह यांच्या कानांवर चौघांनीं मिळून तक्रारी घालाव्यात व त्यावेळीं तक्रारीचें गांभीर्य ध्यानांत यावें म्हणून युगोस्लाव्ह सैन्याचें जनरल पेको व जनरल कोकामॉपोविक् यांनाहि हजर ठेवावें असें ठरलें.

या तक्रारींची काय वासलात लागली ती सांगतांना जिलास म्हणतो--

"अत्यंत मृदु व सभ्य शब्दांत टिटोनें आपलें गाऱ्हाणें कोरनेइव्ह-पुढें मांडलें. परंतु कोरनेइव्हनें याचा क्षणभरहि विचार न करतां उद्धटपणें या तक्रारी खोट्या आहेत म्हणून दटावलें. आम्हीं एक (Comrade of Communist) कम्युनिस्टभाई म्हणून त्याच्याशीं बोलूं इच्छित असतांना तो मोठ्यानें गरजला, "सोविएट सरकारच्या वतीनें आमच्या लाल सैन्याविरुद्ध असे भयंकर आरोप करणाऱ्यांचा मी धिक्कार करतों--" त्याला समजवण्याचें सर्व प्रयत्न विफल ठरले. पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या राष्ट्राला मुक्त करणारे आपण मोठे उपकारकर्ते आहोंत अशा थाटांत तो गुरगुरत राहिला. अखेर न राहवून मी म्हणालों--

"एक गोष्ट लक्षांत घ्यावयास हवी कीं, आपले शत्रू या घटनांचा आमच्या विरुद्ध उपयोग करीत आहेत. इथें जे इंग्लिश सैन्याधिकारी होते त्यांची सभ्य वागणूक कुठें आणि लाल सैन्याचे हे चाळे कुठें असें लोक म्हणतात......"

कोरनेइव्ह यावर कसलेंहि तारतम्य न राखतां म्हणाला,--"हा लाल सैन्याचा धडधडीत अपमान आहे. मी याचा निषेध करतो. आमच्या सैन्याची भांडवलदार देशांच्या सैन्याशी कसली तुलना करतां--!"

या संबंधांत आम्हीं जी माहिती गोळा केली होती, तीनुसार लोकांनीं केलेल्या तक्रारीच्या नोंदीनुसार १२१ बलात्काराचे प्रकार १११ बलात्कार व नंतर खुनांचे प्रकार आणि १२०४ लुटालूट व हल्ल्यांचे प्रकार लाल सैन्यानें केल्याचें आढळून आलें. युगोस्लाव्हियांत रशियन सैन्य फक्त एकाच दिशेनें आलें ही गोष्ट लक्षांत घेतली तर हें गुन्ह्याचें प्रमाण फारच होतें--"

जिलासनें लाल सैन्यानें केलेल्या अत्याचाराचा उल्लेख कोरनेइव्हच्या तोंडावर केल्यामुळें एकच भडका उडाला. युगोस्लाव्ह पार्टीमधील जिलासच्या सहकाऱ्यांनींहि जिलासला दोष देण्यास सुरुवात केली. आपण एकटे पडत आहोंत याची जाणीव जिलासला होऊं लागली. या अनुभवांसंबंधीं जिलास लिहितो—

"मला माझे सहकारी दोष देऊं लागले; सोविएट अधिकाऱ्यांनीं माझ्या आरोपांतून पराचा कावळा उभा केला म्हणून मी एकटा पडत चालल्याची जाणीव मला होत होती असें मला वाटत नाहीं. तर

माझ्या अंतःकरणात जें विचारमंथन उठले होतें—उठू पाहात होतें त्याचा तो परिणाम होता. ज्या उच्च तत्त्वाच्या वल्गना ऐकल्या होत्या व जें प्रत्यक्ष घडत होते त्यांतील परस्परविरोध मला डाचू लागला होता. अशी पाळी जें जें कम्युनिझमच्या बाह्य आकर्षणामुळें तिकडे खेंचले जातात अशा सर्वांवर येत असली पाहिजे. घडलेल्या अत्याचारांकडे रशियन अधिकारी ज्या उपेक्षेने पाहात होतें ती लक्षांत आणली की माझी परिस्थिती इकडे आड न तिकडे विहिर अशी होत होती."

आपल्याच बांधवांवर केल्या गेलेल्या अत्याचाराची दाद लावून घेणें हें युगोस्लाव्हियाचा एक नेता म्हणून जिलासचें कर्तव्य होतें. परंतु ज्यानीं अत्याचार केले त्या लाल सैन्याधिकाऱ्यांनी उलट त्या अत्याचाराचें समर्थन सुरू केलें होतें.

## अत्याचारांचें समर्थन !

१९४४-४५ च्या हिवाळ्यांत एक भलें मोठें सरकारी शिष्टमंडळ युगोस्लाव्हियाने मॉस्कोला पाठविले, त्यांत जिलासची त्यावेळची पत्नी मित्रा मित्रोविक (Mitra–Mitrovic) ही होती. तिच्याकडून रशियांत शिष्टमंडळाला आलेले अनुभव जिलासला कळले. ही हकिगत जिलासनें आपल्या शब्दांत परंतु पत्नीनें सांगितली तशी लिहिली आहे. जिलास लिहितो—

"स्टॅलिननें या सर्व शिष्टमंडळाला क्रेमलिनमध्यें नेहमींप्रमाणें खाना दिला. खान्यानंतर मात्र शेक्सपिअरच्या एखाद्या नाटकात शोभावा असा नाट्यपूर्ण प्रसंग त्यानें करून दाखविला. त्यानें युगोस्लाव्ह सैन्यावर व त्याच्या नियंत्रण कार्यावर तोंडसुख घेतलें. फक्त त्यानें माझ्याच नांवाने उल्लेख केला. काय उल्लेख केला? तो डोळ्यांत अश्रू आणून लाल सैन्याने भोगलेल्या कष्टांचे वर्णन करून गरजला—

"असे हें आमचें शूर सैन्य ! याचा अपमान जिलाससारख्या माणसाने करावा—! ज्याला मी इतक्या सन्मानानें भेट दिली, त्यानें लाल सैन्यावर शिंतोडे उडवावे ! ! या सैन्यानें तुमच्याकरता रक्त सांडले...त्याच हें चीज ! ! हा जिलास स्वतःला लेखक म्हणवतो—त्याला माणसाचे दुःख, यातना, आणि मानवी अंतःकरण याची ओळख तरी आहे का? त्याला एवढी साधी गोष्ट समजत नाही की, ज्या सैनिकांनीं हजारो किलोमीटर्सचे अंतर रक्ताच्या सड्यांत, मृत्यूच्या दाढेंत आणि आगीच्या वर्षावात तोडले त्यानें एखाद्या तरुण स्त्रीचा हव्यास धरला तर त्यात राळ उडवण्यासारखं काय आहे?"

मोलोटोव्हनें सौम्य शब्दात स्टॅलिनला चिथावणी द्यावी आणि त्यानें शिष्टमंडळाला अद्वातद्वा बोलावे असा प्रकार सुरु झाला. अखेर स्टॅलिननें या सगळ्या प्रकारावर कळस चढवला. त्याने माझ्या बायकोचें चुंबन घेऊन म्हटलें— "मी ज्या भावनेने चुंबन घेतलें त्याचा विपर्यास मी जिलासच्या बायकोवर बलात्कार केला असं कुणी कृपया ओरडत उठूं नये."

स्टॅलिननें आपल्या बोलण्यांत पक्षांचा, कम्युनिझमचा, मार्क्सवादाचा कशाकशाचा उल्लेख केला नाहीं. तो बोलला स्ला हांसबंवों. स्लाव्ह वंशाचा रशियन लोकांशीं किती घनिष्ट संबंध आहे; आणि या रशियन सैन्यानें काय पराक्रम केला या दोन गोष्टींशिवाय बोलायला त्याला विषय नव्हता.

हें सर्व पत्नीकडून ऐकतांना मी अक्षरशः हावरलों. विस्मूढ झालों."

जिलासला धक्का बसण्याचें कारण उघड होतें. वरवर जागतिक गप्पा मारायच्या आणि अंतर्यामात विवक्षित वंशाच्या ऐश्वर्याचीं स्वप्ने पाहावयाची, जगांतले सर्व कामगार एक आहेत अशा घोषणा द्यायच्या आणि ज्या ज्या देशातील कम्युनिस्ट पार्टीनें मॉस्कोच्या विचारसरणीहून थोडा वेगळा विचार मांडला त्या पक्षाच्या नेत्यांना नेस्तनाबूद करण्याची पाताळयंत्री कारस्थाने रचायचीं. या सर्व गोष्टी जेव्हां त्याच्या लक्षांत यऊं लागल्या तेव्हा त्याचे विचार अंतर्मुख झाले.

## राजकारणांत वेश्या—?

एप्रिल महिन्यात टिटोच्या नेतृत्वाखालीं परस्पर-सहाय्याचा करार करण्यासाठी एक युगोस्लाव्ह शिष्टमंडळ मॉस्कोला जाण्यास निघालें. डॉ. सुबाशिक परराष्ट्र खात्याचा मंत्रि या नात्यानें शिष्टमंडळांत होता. टिटोनें जिलासचाहि या मंडळात अंतर्भाव केला. असें करण्याचा टिटोचा मुख्य उद्देश, प्रत्यक्ष भेटून, बोलून जिलासच्या लाल सैन्याबाबतच्या आरोपामुळें जें वादळ उठलें होते तें काहीसें शांत करावे हाच होता.

या शिष्टमंडळाला घेऊन विमान मॉस्कोला उतरल्यानंतर कांहीं तासाच्या आंतच जिलासला विलक्षण अनुभव आला. रशियासारख्या देशात असे प्रकार घडतात हें वाचताना वाचक स्तिमित होतो. जिलासनें लिहिलें आहे—

"विमानतळावर आमचें स्वागत करण्याकरतां मोलोटोव्ह हजर होता. तोंडावर ओळखीचें किंचितहि हास्य न दाखवता त्यानें माझ्याशीं हस्तांदोलन करण्याचा विधि उरकला. फक्त टिटोची व्यवस्था एका स्वतंत्र व्हिलामध्यें करण्यात आली होती, व त्याला वेगळें काढून आम्हां सर्वांना मेट्रोपोल हॉटेलमध्यें धाडण्यात आलें.

"लहानसहान मनस्तापाना सुरुवात झाली व त्याची तीव्रता पुढें वाढतच गेली.

"दुसऱ्या दिवशी हॉटेलमधील माझ्या खोलींतला टेलिफोन घणघणला. एक मंजुळ आवाज कानी आला—

"मी काटिया बोलते आहे—"

"कोण काटिया—?" मी उलट विचारलें.

"आठवत नाहीं—? पण मी तुम्हाला पाहिलेलं आहे."

मागील खेपेस मला भेटलेल्या असंख्य काटिया नावाच्या मुलींचे चेहरे माझ्या डोळ्यांपुढें आले. आणि त्या पाठोपाठ मला संशयानें घेरले. सोविएट हेरखात्याला ही गोष्ट माहीत होती की, युगोस्लाव्हिया कम्युनिस्ट पार्टीची वैयक्तिक नीतिमत्तेबाबतची मतें कडक आणि उच्च होती. मला व्यभिचाराला उद्युक्त करून माझा घात साधण्याचा तर हा प्रयत्न नसेल? मॉस्को शहरांत अशीं कामें करण्याकरतां मुबलक स्त्रिया व मुली उपलब्ध असाव्यात यांत मात्र मला आश्चर्य वाटले नाहीं. परंतु त्यांना सोविएट हेरखात्याच्या परवानगीशिवाय परदेशस्थ पाहुण्यांशीं संपर्क साधणें शक्य नाहीं; हेंदेखील तितकेंच खरें होतें. इथें मॉस्कोंत तर परदेशस्थ पाहुण्यांच्या हालचालोंवर सोविएट अधिकाऱ्यांची सक्त नजर असतें.

मीं अधिक काहीं न बोलतां हातातला टेलिफोनचा कर्णा खालीं ठेवला.

मला वाटलं, फक्त मला बदनाम करण्याचाच सोविएटाचा विचार आहे कीं काय ! परंतु माझे सहकारी अॅन्ड्रेजेव्ह व पेट्राव्हिक यानाहि

फोनवरून कुणी नटाशा आणि व्होवा नांवाच्या मुली भेटण्याच्या प्रयत्नाला लागलेल्या होत्या, असें त्यानी मला सांगितलें. आम्हीं तिघानीं यापुढें काळजीपूर्वक वागण्याचें ठरविलें."

सोविएट रशियांत अशा तऱ्हेचे प्रकार घडू शकावे हें पाहून जिलासला एखाद्या लहरी सत्ताधिपाच्या राज्यांत तर आपण आलो नाहीं ना असा संभ्रम निर्माण झाला.

## नाहीं मी बोलत–

मध्यतरीच्या काळात विशेष काही घडले नाही. ११ एप्रिलला क्रेमलिनमध्यें परस्पर–सहाय्याच्या करारावर सह्या झाल्या. तिथें फक्त सोविएट सरकारच्या अधिकृत फोटोग्राफर्सखेरीज कुणीहि उपस्थित नव्हतें.

यावेळीं जिलास आता दुसऱ्यादा स्टॅलिनशहाला भेटत होता. यावेळीं स्टॅलिन त्याच्याशी एक अवाक्षरहि बोलला नाहीं. मोलोटोव्ह तर उघड उघड रुष्ट झालेला त्याला दिसत होता. लाल सैन्यावर जिलासनें जे आरोप केले होते त्यामुळें या खाशा स्वाऱ्या अशा चिथरलेल्या होत्या.

यानतर एक–दोन दिवसांनीं कॅथेरिन हॉलमध्यें युगोस्लाव्ह शिष्टमंडळाला खाना होता. त्यावेळी हजर असलेल्यापैकी एक डॉ. सुबाशिक वगळला तर बाकीचे सारे कम्युनिस्ट होते. परतु कुणी कुणाला कॉमरेड नावानें सबोधित नव्हतें. शेवटी स्टॅलिननेच सुरवात केली. फक्त स्टॅलिनलाच निराळे काही करण्याचा मक्ता होता. कारण इतर कुणीं निराळें कांहीं केलें आणि त्याला आवडलें नाहीं तर फट् म्हणतां ब्रह्महत्त्या होईल या भीतीनें सगळे पोखरलेले होते.

स्टॅलिन उभा राहिला. हातांतला ग्लास वर उचलून त्यानें टिटोकडे वळून–"कॉमरेड" शब्द उच्चारला, शिवाय त्यानें पुढें सागितलें की–टिटोला कॉमरेडच म्हणायला हवें......"

वातावरण मग एकदम सैल झालें. खाणाऱ्यांना विनोद सुचू लागले. एकमेकाना टोमणे सुरूं झाले.

रशियाचा अध्यक्ष म्हातारा कालिनिन डोळयानें अधू होता. तो ग्लास, थाळी, थाळीतले पदार्थ चाचपडत बसला होता. त्यानें टिटोकडे वळून युगोस्लाव्हमधून आणलेली सिगरेट मागितली. तितक्यात स्टॅलिनला विनोद करण्याची हुक्की आली. तो म्हणाला. "घेऊ नका ती सिगरेट. भाडवलदारानी त्या पाठवल्या आहेत......"

कालिनिन गोंधळला. त्याच्या कांपणाऱ्या बोटांतून सिगरेट खाली पडली. मग गंभीर मुद्रा सोडून स्टॅलिन खदखदां हसूं लागला. हसणें थाबल्यावर स्टॅलिननें प्रेसिडेंट कालिनिनच्या सन्मानार्थ टोस्ट सुचविला

प्रेसिडेंट कालिनिनची स्टॅलिननें केलेली ही टवाळी जिलासला अप्रस्तुत वाटली. काही झालें तरी स्टॅलिन हा पतप्रधान होता व कालिनिन राष्ट्राचा अध्यक्ष होता. याबद्दल जिलास लिहितो–

'विचार केल्यानंतर आज माझें असेंच मत झालें आहे कीं, ज्याला आज स्टॅलिनचे टीकाकार स्टॅलिनच्या व्यक्तिपूजेचें स्तोम (Cull of the personalty) म्हणतात, तें स्टॅलिननें स्वत:च माजवलें यांत शंकाच नाहीं. परतु त्याच्या अंवतींभोंवतीं जीं माणसें जमा झालेलीं होतीं त्यांनाहि स्टॅलिनचें स्तोम माजणे आवश्यक व जरुरीचें वाटत होतें तेव्हां यात केवळ स्टॅलिनचा दोष नसून त्यावेळच्या सगळयाच मास्को म्होरक्यांना याबद्दल दोषी धरलें पाहिजे. एकदां शेंदूर फासल्यावर स्टॅलिन इतका सामर्थ्यवान झाला कीं ज्यांनीं त्याला डोक्यावर घेतलें त्यांच्या मतांविषयीं व काळाच्या इशाऱ्याविषयीं तो बेफिकीर झाला."

हा ठेंगणा ठुसका माणूस एखाद्या सुलतानासारखा स्वतःला समजूं लागला. तो जाऊं लागला कीं, माणसें दुतर्फा फाकू लागली. भारलेल्या नजराच्या सलाम्या घेत त्याचा मार्ग मोकळा होऊं लागला. हुजरे मानकरी त्याचा शब्द झेलण्यासाठी अवतीभोंवती कान टवकारून खालच्या मानेनें, अदबीने उभे राहूं लागले. आपण केलेली कर्तबगारी आणि स्वत:चें कर्तृत्व याविषयीं पुरती जाणीव असलेला स्टॅलिन जें घडत होते त्याची दखल घेण्यासहि क्षणभर थांबला नाही. देश भुकेकगाल झाला होता. युद्धामुळें उध्वस्त होता. परंतु लाल सैन्याच्या त्याच्या सेनानींनी अर्धा युरोप आता टांचेखाली आणला होता. व्होडका आणि विजय याचें आकठ पान करून त्याची नशा सर्वांना चढली होती. पुढच्या फेरीत उरलेल्या अर्ध्या युरोपचाहि खातमा करण्याची हिंमत आतां स्टॅलिनच्या सेनानीनी धरली होती. याविषयी स्टॅलिनला आतां कसलीच शका नव्हती. त्याला हें समजत होतें की, आपण मानवी इतिहासांतील एक अत्यत क्रूर असे हुकुमशहा झालो आहोत. परतु याचें त्याला दु:खच वाटत नव्हतें. कारण इतिहासानें नेमून दिलेले कामच आपण उरकीत आहोंत अशी त्याची धारणा होती. त्याची सद्सदविवेकबुद्धि सतुष्ट होती. ज्यानी ज्यानी स्टॅलिनच्या मार्गाविषयी आणि साधनाविषयी अविश्वास दाखविला, शंका व्यक्त केल्या, त्याची निर्घृणपणे वासलात लावण्यात आली. स्टॅलिनच्या हुकुमासरशीं अनेकांना यमसदनाला पाठविण्यांत आलें. असख्याचे खून पडले. त्याच्या विरोधकांचा विध्वंस झाला. कारण ते संख्येनें कमी होते. सत्तेच्या शिखरावर नव्हते. स्टॅलिनच्या बाजूलाच सत्य होतें असा गवगवा झाला. कारण सत्य हें नेहमीं विजयी माणसाच्या अंकित रहाते. मग सद्सद्विवेकबुद्धीला कोण विचारतो? अशी बुद्धि असूच शकत नाही. स्टॅलिनच्या कृतीत आणि उक्तीत तर या सद्सद्विवेकबुद्धीला मुळीच थारा नव्हता. रशियाच्याच नव्हें तर जगाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या युद्धात विजयी झालेला स्टॅलिन आतां सर्वशक्तिमान झाला नसता तरच नवल! जगाच्या नकाशातल्या ⅙ हून अधिक भागांवर लाल साम्राज्य आतां पसरलेले होतें आणि अधिक अधिक मुलुखात लाल बडें होऊ घातली होती.

जिलास सांगतो–

"आपल्या लोकात काहीं परस्पर विरोधी प्रवाह आहेत हें मानायलाच आता स्टॅलिन तयार नव्हता. आपल्या लोकात आतां एकजिनसीपणा आहे म्हणून आपले लोक, आपला समाज हा जगातील कुठल्याहि समाजापेक्षा वरच्या दर्जाचा आहे असे तो समजू लागला. तो विनोद करी. दुसऱ्याशीदेखील विनोदाने सभाषण करी. त्याना 'कॉमरेड' म्हणे. परतु हे विनोद नेहमी इतराच्या व्यगावर किंवा उणिवांवर आधारलेले असत. या एकाच गोष्टीवरून स्टलिन स्वत ला एखादा तक्तनशीन अधिपति समजत असे, याचा पुरावा होता. कधी चुकून तो स्वत:वर विनोद करीत नसे. आपण फारच उच्चपदस्थ आहोंत. तिथून मध्येंच खाली उतरून या दुसऱ्या मडळीशो सुखसवाद करण्याची त्याला लहर येई. या लहरीच्या सुखासाठी तो हा देखावा करी इतकेच. मीदेखील सुरुवातीला स्टॅलिनच्या या नाटकाने भारलों गेलों. परतु माझ्या मनाच्या कोपऱ्यात मी नेहमीच अस्वस्थ असे. मला हें सर्व नेहमीच वरवरचे वाटत असे. यावेळी तो कटाक्षाने

माझ्याशी बोलत नव्हता! जेवतांना, खातानादेखील आपल्या वर्चस्वाचा आणि अधिकाराचा दर्प त्याला सोडून जात नसे."

## बेरिया-बुल्गानिन

पहिल्या खान्याच्या वेळीं जिलासला जी वागणूक स्टॅलिन-मोलोटोव्हनें दिली, त्यावरून बहुधा पुढच्या सर्व कार्यक्रमांतून आपल्याला वगळण्यांत येईल असा जिलासचा कयास होता. परतु पुढच्या खास जेवणासाठी त्याला निमत्रण मिळालें तेव्हां तो आश्चर्यचकित झाला. मुख्य म्हणजे यावेळी डॉ. सुबाझिक यानाच वगळण्यांत आले होतें व युगोस्लाव्ह सरकारचें जे कम्युनिस्ट नेते होते त्या लोकानाच निमंत्रलें होतें.

या खान्याला युगोस्लाव्ह कम्युनिस्ट नेते व मॅलेनकॉव्ह, बुल्गानिन जनरल ॲटोनाव्ह, बेरिया आणि मोलोटोव्ह हे हजर होते.

रात्रीं दहाच्या सुमारास स्टॅलिनच्या खान्यासाठी सर्व जमा झाले. टेबलाच्या मध्यभागी यावेळीं बेरिया बसला.

जिलासने यावेळी त्यानें जवळून पाहिलेल्या बेरिया, मॅलेनकॉव्ह व बुल्गानिन याची चित्रें थोडक्यात रेखाटली आहेत, जिलास लिहितो–

"बेरियादेखील ठेंगणाठुसकाच होता, स्टॅलिनच्या अतर्वर्तुळांत मात्र बेरिया सर्वांत उच होता. त्याच्या तोंडाचा आकार चौकोनी वाटे व डोळे गरगरीत वाटत. कम्युनिस्ट राजवटीतील पोलिशी अत्याचारात याचा वांटा सर्वांत अधिक होता. स्टॅलिनप्रमाणें तोहि जॉर्जिया प्रातांतीलच होता. एखाद्या खुनशी कारकुनाच्या चेहऱ्यावरील भाव त्याच्या तोंडावर दिसत होते.

"मॅलेनकॉव्ह हा बेरियापेक्षां ठेंगणा आणि जाडजूड होता. आतल्या गाठीचा, काळजीपूर्वक प्रत्येक गोष्ट करणारा हा माणूस फारसा कुणाला आवडत नसावा. त्याच्या अगावर जे चरबीचे लठ्ठ थर होते, वळकटचा होत्या, त्या सर्वांखाली एक काळ्याभोर डोळ्याचा हुषार असा माणूस दडलेला असावा असें नेहमीं पाहताना वाटे. कम्युनिस्ट पार्टीच्या सघटनात्मक बाधणीची सूत्रें स्टॅलिनच्या वतीनें मलेनकॉव्ह संभाळीत असे पदाधिकाऱ्याच्या बदल्या-बढत्या आणि त्यांना कमी करण्याचे अधिकार त्याच्यापाशीं होते. लाखो सभासद असलेल्या कम्युनिस्ट पार्टीतील प्रत्येकाचें चरित्र गुप्तपणे जमवून त्याचें व्यवस्थित दप्तर ठेवण्याचें प्रचड काम त्यानें पुरें केले होतें.

"बुल्गानिन व जनरल ॲटोनोव्ह लष्करी गणवेषांत खान्याला आलेले होते. बुल्गानिनच्या अगावर मार्शलचा गणवेष होता. या पोषाखांत तो अधिक पोलादी आणि सुदर दिसत होता. बुल्गानिन फारसा बोलत मात्र नव्हता."

## लाल सैन्याचें भयंकर मन

खान्याला सुरुवात झाली. टोस्ट झाले. मद्याचे बरेच चषक रिचवले गेले. खाताना जरा मोकळेपणाचें वातावरण पसरू लागले. तरीसुद्धा जिलासच्या बरोबर समोर बसलेला स्टॅलिन जिलासशी बोलला नाहीं. फक्त विनोद करीत होता आणि सगळे हसत होते. अखेर हंमत हमत स्टॅलिननें जिलासचा पेला व्होडकानें भरला, व त्याला लाल सैन्याच्या विजयाचें स्मरण करून पेला उचलण्यास सांगितलें.

जिलासनें चषक रिकामा केला. ग्लास खाली ठेवीत असतांना स्टॅलिननें त्याला लाल सैन्याची खबरबात विचारली. प्रश्नाचा रोख ओळखून जिलास म्हणाला––

"माझा लाल सैन्याचा अपमान करण्याचा इरादा नव्हता. परंतु जे कांहीं अपप्रकार झाले आणि त्यामुळें आमच्या कार्यांत जें राजकीय अडथळे निर्माण झाले तिकडे लक्ष वेधण्याचा माझा हेतु होता––"

जिलासचें सांगणे संपण्यापूर्वीच स्टॅलिननें त्याला मध्येंच अडवून बोलायला सुरुवात केली.

"मला वाटतं, तुम्ही डोस्टोइव्हस्की वाचला असेल. वाचलाच असला पाहिजे. माणसाचा आत्मा किती गुतागुतीचा असतो हें लक्षांत यायला हवें. माणसाचें मनोविश्लेषण का काय म्हणतात त्याला– ! मग तुम्हीच या सैनिकाच्या मनाचें विश्लेषण करा. स्वत:च्या मातृभूमीच्या हजारों मैल प्रदेशाचा स्टॅलिनग्राडपासून बेलग्रेडपर्यंतचा विध्वंस ज्यांनी डोळ्यानी पाहिला, प्रेतांच्या राशींवरून आणि प्रिय माणसांच्या शवावरून ज्यानी वाट तोडली, त्यांचीं मनें सामान्य माणसांसारखीं राहातील कशी? त्याच्या प्रतिक्रिया सामान्य माणसांच्या प्रतिक्रियाच असाव्यात अशी अपेक्षाच कशी करता? एवढ्या सहारांतून वाचल्यानतर एखाद्या सैनिकाला तरुण स्त्रीशी खेळावेंसे वाटलें तर त्यात एवढें बिघडलें काय? तुम्हीं लाल सैन्याला आदर्श सैन्य समजत होता. तें आदर्शांत थोडें घसरले यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाही, कारण तुरुगात डाबलेल्या गुन्हेगार कैद्याचीहि आम्ही सैन्यांत भरती केली होती. मी स्वत: एका विमानदलातील अधिकाऱ्यास त्यानें एका स्त्रीची विटबना केली असतानादेखील माफी देऊन आघाडीवर धाडलें. आज त्याची समरवीरांत गणना होते आहे. सैनिकाचें मन समजून घ्यायला हवें. लाल सैन्य हें आदर्श सैन्य नाहीं. नसेना कां! महत्त्वाची गोष्ट ही आहे कीं, तळहातावर शीर घेऊन आज ते जर्मनांचा मुकाबला करीत आहे.

## स्टॅलिनचें रण-प्रेम

जिलास सांगतो––

"मी मॉस्कोहून परत आल्यावर तर मला स्टॅलिनच्या या रणप्रेमाची एक भयानक हकिगत कळली. लाल सैन्याची पापें ही तो पापेंच मानीत नसे असे वाटतें. प्रशियात शिरताना रशियाच्या टॅंकर्स विभागातील सैनिकानीं असख्य जर्मन नागरिकाची–वृद्ध, स्त्रिया व मुलें– यांची कत्तल उडवली. यासबधी स्टॅलिनला जेव्हा कुणी प्रश्न केला तेव्हा तो असें म्हणाल्याचें कळते की– आपण सैनिकाना नीतीचें फारच डोस पाजतो! केव्हां केव्हा त्याना आपल्या अकलेनेंहि वागू द्यावे!" (We lecture our soldiers too much! Let them have some initiative!")

खाना चालू असताना जेव्हां जेव्हा स्टॅलिन युगोस्लाव्ह सैन्याची विनोदी कुचाळकी करून हसू लागे तेव्हा तेव्हा टिटो जिलासकडे पाहात गम्भीरपणें बसून राही. जिलासच्या दृष्टीभेटीत त्याला थोडासा दिलासा मिळे. परंतु मध्येंच स्टॅलिन जेव्हा म्हणाला, की, युगोस्लाव्हच्या सैन्यापेक्षां बल्गेरियाचे सैन्य फारच उत्तम आहे तेव्हा मात्र टिटो फारच अस्वस्थ झाला. राग त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागला.

जिलास सागतो––

"टिटोचे व स्टॅलिनचे सबध वरवर पाहतां सलोख्याचे दिसले तरी दोघें परस्पराविषयीं अढी बाळगून होते व स्फोट टाळीत होते. इतकेंच! स्टॅलिन टिटोची वैयक्तिक टवाळी टाळीत असला तरी आमच्या सैन्याविषयी कुचाळकी करीतच होता. टिटो मात्र स्टॅलिनला मान देऊन वागत होता. तरीहि त्याच्या मनांत उठणारें वादळ चेहऱ्यावर दिसत होतेंच."

बोलतां बोलतां टिटोनें असें विधान केलें कीं, समाजवादाच्या बाबतींत आतां कांहीं नवीन कलाटण्या मिळालेल्या आहेत. पूर्वी समाजवाद आणण्याचे जे मार्ग होते त्यापेक्षां निराळ्या मार्गानेंहि समाजवाद आणतां येण्यासारखा आहे. यावर स्टॅलिन कुचेष्टेनें म्हणाला.

"आज इंग्लिश राजाधिष्ठित घटनेखालीदेखील समाजवाद शक्य झालेला आहे. क्रांतीची जरूरी पडतेंच असें नाहीं. नुकतेंच ब्रिटिश मजूर पक्षाचें एक शिष्टमंडळ येथें आलें होतें. व त्यांच्याशीं आमचें याच विषयावर बोलणें झालें."

## हा खेळ पुनः खेळूं....

स्टॅलिननें आपलें युद्धविषयक विचारहि यावेळींच मांडले. तो म्हणाला—"हें युद्ध आतां पूर्वीसारखें राहिलेलें नाहीं. जो मुलुख ज्याच्या ज्याच्या अंमलाखालीं जाईल. त्याची त्याची तत्त्वप्रणाली त्या भागावर लादली जाईल. लष्कराच्या जोरावर हें जितकें करतां येईल तितकें प्रत्येकजण करणार. याला इलाज नाहीं."

कुणीतरी म्हणाले कीं, जर्मनांना पुनः पायावर उभे राहाण्यास निदान पन्नास वर्षें लागतील. तेव्हां स्टॅलिननें सांगितलें, "असें मानण्यांत गफलत आहे. ते उठतील. फार लवकर उठतील. अत्यंत प्रगत असें तें कारखानदार राष्ट्र आहे. जर्मन लोक कष्टाळू आणि कसबी कारागीर आहेत. त्यांना बारा-पंधरा वर्षांचा काळ पुरेसा आहे. म्हणून तर स्लाव्ह वंशाचे त्वरित एकीकरण आवश्यक आहे. जर स्लाव्हांचें ऐक्य अस्तित्वांत आलें तर आमच्याकडे वांकड्या नजरेनें पाहाण्याची कुणाची छाती होणार नाहीं."

बोलण्यावरून बोलणें निघत होतें. एकिकडे मद्यपान चालू होतें. मग एकाएकीं कसल्यातरी मुद्यावर स्टॅलीन एकदम उभा राहिला. दोन्हीं हातांनीं चोळणा वर ओढीत दांत–ओठ खात तो म्हणाला—"ही लढाई आतां संपल्यासारखीच आहे, पंधरा–वीस वर्षं पुनः आपल्याला तयारी करावी लागेल आणि मग हाच खेळ आपल्याला पुनः खेळावयाचा आहे."

स्टॅलिनचे हे उद्‌गार फार भयंकर होते. जग एका युद्धाच्या खाईतून अजुन पुरतें बाहेरहि आलेलें नव्हतें. परंतु ज्या मार्गानें स्टॅलिन जाणार होता ते मार्ग त्याच्यापुढें सुस्पष्ट होते यांत शंका नाहीं. त्याच मार्गानें जाण्यावांचून गत्यंतर नाहीं अशा श्रद्धेनेंच तो बोलत होता.

स्टॅलिनबरोबरचा खाना संपला. जिलस, टिटो, आदि मंडळींनीं पडण्यापूर्वी डिमिट्रॉव्हची मुलाखत घेतली. वस्तुतः बल्गेरिया मुक्त झाल्यानंतर डिमिट्रॉव्हला आपल्या देशांत जाऊं देण्यांत कसली अडचण असावी? परंतु स्टॅलिननें परवानगी देण्यास नकार दिला होता. डिमिट्रॉव्ह बल्गेरियांत जाण्यापूर्वी बल्गेरियांतील कांहीं महत्त्वाचीं कामें स्टॅलिनला उरकायचीं होतीं. डिमिट्रॉव्ह आपोआपच बल्गेरियनांच्या मनांतून उतरूं लागला होता. आणि स्टॅलिनला तेंच हवें होतें.

## ख्रुश्चेव्ह-संप्रति नवा!

परततांना जिलास, टिटो आदि मंडळी कीव्हमार्गें आली. येतांना त्यांनीं दोन दिवस युक्रेनमध्यें घालवले. युक्रेन कम्युनिस्ट पार्टीचा सेक्रेटरी होता–एन्. एस्. क्रुश्चेव्ह! (हाच सध्यां रशियाचा सर्वाधिकारी आहे.) याचवेळीं जिलास प्रथम क्रुश्चेव्हला भेटला.



डाव्यांतले उजवे!

स्टॅलिनच्या विश्वासांतील अशीं जीं तीन-चार माणसें गणलीं जात; त्यांत मोलोटोव्ह, मॅलेनकॉव्ह, कागनेविच् यांचा समावेश होता. परंतु क्रुश्चेव्हचा नव्हता. वक्ता किंवा लेखक म्हणून क्रुश्चेव्ह मुळींच यशस्वी नसला तरी आर्थिक क्षेत्रांत व संघटनात्मक कार्यांत त्यानें बरेंच नांव मिळवलेलें होतें. पहिल्या महायुद्धानंतर रशियांत जी पार्टीची साफसफाई करण्यांत येऊन अनेकांची वासलात लावण्यांत आली. त्याच सुमारास क्रुश्चेव्हचा उदय झाला. अर्थात या साफसफाईच्या कामांत त्यानें नेमका कोणता वांटा उचलला हें सांगतां आले नाहीं तरी तर्कानें त्याचा त्यांत भाग असावा हें स्पष्ट कळन येतें.

दुसऱ्या महायुद्धाला तोंड लागलें व युद्धांत रशिया ओढला गेला, तेव्हां क्रुश्चेव्हवर मोठी जबाबदारी आली. यावेळीं तो लेफ्टनंट जनरलच्या हुद्यावर असला तरी युक्रेनमधून लाल सैन्याची पीछेहाट होऊन जर्मनांनीं त्या प्रांताचा कबजा मिळतांच क्रुश्चेव्हचें महत्त्व कमी न होतां उलट वाढलें; कारण थोड्याच दिवसांत जर्मनांची युक्रेनियांतून पिछेहाट सुरू झाली. व क्रुश्चेव्हनें विजयी सैन्याधिकारी म्हणून युक्रेनमध्यें प्रवेश केला.

जिलासनें क्रुश्चेव्हच्या भेटीनंतर त्याला जें त्याच्यासंबंधी वाटलें तें मोकळेपणानें सांगून टाकलें आहे. तो लिहितो—

"रशियाच्या इतर पुढाऱ्यांसारखा क्रुश्चेव्ह हा घुम्या नाहीं तर बडबडाच म्हणायला हवा. बोलतांना तोदेखील इतरांप्रमाणें म्हणी आणि लोककथांचा भरपूर उपयोग करतो. सर्वसामान्य जनथरांत आपला घनिष्ट संबंध आहे हें सिद्ध करण्याची ही एक फॅशनच या

अधिकाऱ्यांत पडलेली होती. परंतु क्रुश्चेव्हच्या बोलण्यात मात्र म्हणी आणि लोककथा कृत्रिमपणें येत नाहीत व बोलण्याला कृत्रिम सजावटीचा रंग येत नाहीं. उलट बोलताना तो मुळीच आढ्यताखोर न वाटतां साधासुधा, मनमोकळा वाटतो.त्याच्याहि बोलण्यात विनोदाची पेरणी असते परंतु हे विनोद स्टॅलिनप्रमाणें दुसऱ्याच्या कुचाळकीचा स्वरूपाचे नसतात. त्यामुळें विनोदाला फारशी धार नसली तरी बोलणें जिवंत व प्रवाही मात्र वाटतें. जसजसा तो अधिकाराने वाढत गेला तसतसा तो बोलण्यात अधिक जबाबदारी पाळूं लागला. यात संशय नाही. परंतु मूलतःच तो काळजीपूर्वक दुसऱ्याला न दुखवतां, परतु भरपूर बोलणारा आहे.

"सर्व सोविएट अधिकाऱ्यांत क्रुश्चेव्ह हा एकच असा आहे कीं, जो प्रत्येक बाबतीत स्वतः लक्ष घालून निर्णय घेतो. त्याचें मार्क्सवादाचें वा एकंदर शास्त्राचें ज्ञान फारसे मोठें नसलें तरी नेतृत्वाला लागणारे गुण त्याच्याजवळ भरपूर आहेत. प्रत्यक्ष लोकात मिसळणारे सोविएट नेते जवळजवळ नाहीत. परंतु क्रुश्चेव्ह मात्र आमच्याबरोवर सामायिक शेतावर पायी हिंडला. शेतकऱ्यात मिसळून त्यानें व्होडका रिचवला. त्याच्या वागा-मळयांतून, जनावरातून जातीनें हिंडला. आणि विचारलेल्या लहान-सहान प्रश्नांना त्याने समाधानकारक उत्तरेंहि दिली. सामुदायिक शेताना भेट देऊन कीव्हला परतताना त्यानें या साम्यवादी प्रयोगांतील उणीवाहि आमच्याजवळ कबूल केल्या. आम्हांला त्याचें आर्थिक प्रश्नांवरील प्रभुत्व पाहण्याची संधीहि मिळाली. आर्थिक मंडळाच्या बैठकीचें कामकाज चालूं असतांना आम्ही हजर राहिलों. क्रुश्चेव्हच्या हाताखालीं काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्याजवळ आपापल्या खात्याची संपूर्ण माहिती उपलब्ध होती. आणि पुढील गोष्टीचें अदाज उगाच आंधळेपणानें ते बांधीत नव्हते.

"त्यावेळीं मला क्रुश्चेव्हच्या बोलण्यांत स्टॅलिन वा मोलोटोव्हविषयीं यत्किंचितहि नाराजी दिसून आली नाहीं. जेव्हा जेव्हां क्रुश्चेव्हच्या बोलण्यांत स्टॅलिनचा उल्लेख आला तेव्हा तेव्हां तो त्याच्याविषयीं आदरानें बोलला व त्याच्याशी स्टॅलिनचे घनिष्ट संबंध आहेत असाच बोलण्यात सूर ठेवला होता. २१ जूनला स्टॅलिनने खास फोनवरून त्याच्याशी बातचीत केली व २२ जूनपासून सुरु होणाऱ्या जर्मन हल्ल्याची त्याला माहिती दिली ही हकिगत त्याने आम्हाला सांगितली.

"क्रुश्चेव्हचें जें चित्र आमच्या मनःपटलावर उमटलें तें एका सामर्थ्यशाली, स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास असलेल्या वास्तववादी नेत्याचें आहे."

## सत्तेचें वजन हवें

याच क्रुश्चेव्हनें सत्ता हाती येताच स्टॅलिनवर जे आरोप केले, त्यांत त्यानें स्वत.चे वैयक्तिक स्तोम माजविले, व त्याप्रीत्यर्थ असंख्यावर अत्याचार केले, हा प्रमुख असला, तरी जर्मनांच्यावर त्यानें गैरविश्वास टाकून रशियाची हानि करून घेतली. हादेखील आहे. सत्ता हाती नसतांना अन्यायाचा थांगपत्ता लागू न देणें हें राजकीय मुत्सद्देगिरीचें प्रमुख सूत्र क्रुश्चेव्हला आत्मसात आहे. ही गोष्ट यावरून स्पष्ट केली. स्टॅलिनने जर्मनांवर गैरविश्वास टाकून रशियाची हानी केली हें मनोमनी पक्के ठाऊक असतांना क्रुश्चेव्हने जिलासशी बोलताना असेंच नाटक केलें की, स्टॅलिनसारखा नेता शोधून सांपडणार नाहीं. कारण क्रुश्चेव्ह हें जाणून होता कीं ज्या टीकेला सत्तेचें वजन नाहीं ती बहुधा फुकट जातें आणि कदाचित् टीकाकाराचाहि नाश करते.

स्टॅलिनबरोबर झालेल्या जिलासच्या दुसऱ्या भेटीची हकीगत येथें संपते. या भेटीच्या शेवटी जिलासचे मन पुनः उद्‌विग्नच होतें. तो या प्रकरणाच्या शेवटी लिहितो—

"जो जो मी सोविएटांच्या प्रत्यक्ष दिसलेल्या परिस्थितीचे चिंतन करू लागलों तों तों माझ्या संशयाचा गुणाकार होत गेला. पाहिलेली वस्तुस्थिती आणि माझी मानवी सदसद्विवेक बुद्धि यांचा कुठेंच मेळ बसेना. डोळयांपुढें अंधारच वाढत होता."

## तिसऱ्या भेटीचें पार्श्वसंगीत

जिलासची स्टॅलिनशी तिसरी व सर्वांत महत्त्वाची मुलाखत १९४८ च्या सुरुवातीला झाली. ज्यावेळीं युगोस्लाव्ह कम्युनिस्ट पार्टीचे व सोविएट सरकारचे संबंध बिघडावयास सुरुवात झाली, त्याचवेळेस ही गाठभेट झाली.

सोविएट सरकार आणि युगोस्लाव्ह सरकार हीं दोन्हीं कम्युनिस्ट सरकारें असलीं तरी त्यांच्यातील मतभेदवि कोपाला जाणें अपरिहार्य दिसत होते. मार्शल योजनेखालीं अमेरिकेनें जी आर्थिक मदत देऊं केली होती ती युरोपियन राष्ट्रांनीं घेऊं नये असें दोन्ही सरकाराचें जरी मत असलें तरी युगोस्लाव्हियाला रशियाहि अधिक मदत करीत नसल्यानें कुचंबणा फक्त युगोस्लाव्हियाचीच होत होती. यांतच आणखी एका घटनेची भर पडली. ग्रीसमध्यें यादवी चालूं होती व या यादवीत युगोस्लाव्हियाचा हात आहे असा आरोप जेव्हां युगोस्लाव्हियावर युनोमध्यें करण्यात आला तेव्हां रशियाचा प्रतिनिधि गप्पच राहिला; उलट युगोस्लाव्हचे पश्चिमात्यांशी बिघडत चाललेलें पाहून त्याला आनंदच होत होता असे दृष्टोत्पत्तीस येऊं लागलें.

कम्युनिस्टांच्या आंतरराष्ट्रीय चळवळीनें केंद्र म्हणून बेलग्रेडची निवड करण्यांतहि रशियन सरकारनें धूर्तपणा करून एका दगडांत दोन पक्षी मारले होते. आज ज्याप्रमाणें प्रत्येक आंतरराष्ट्रीय उचापतीत भारताला गोवण्यांत येतें तसाच हा प्रकार होता. म्हटला तर मोठेपणा नाहीतर नसतें झेंगट गळयांत! वरवर पाहतां युगोस्लाव्हियाला असे वाटावे की आपल्याला केवढें महत्त्व मिळालें आणि प्रत्यक्षात मात्र आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेंत युगोस्लाव्हियाला गोंवून या सर्व संघटनेवर रशियाची हुकमत अबाधित ठेवण्याचा हा डाव होता.

## प्रत्येक क्रांति मॉस्कोछाप हवी....

युगोस्लाव्हिया कम्युनिस्ट राजवटीखाली असूनहि ही असूया कां याचा उलगडा करताना जिलास स्टॅलिनसंबंधी लिहितो—

"चीनची क्रांति घ्या, स्पेनमधील उठाव घ्या किंवा युगोस्लाव्हियांतील क्रांति घ्या. या प्रत्येकवेळीं ऐनवेळेस रशियानें क्रांतीला यत्किंचितहि हातभार लावलेला नाहीं असें लक्षांत येईल. यावरून असा प्रवाद निघाला कीं, स्टॅलिनला या क्रांत्या मान्य नव्हत्या. परंतु हें सर्वस्वीं खरें नाहीं. ज्या ज्या वेळीं एखादी क्रांति हो रशियाच्या

ष्टीनें हिताची नव्हती त्या त्या वेळीं स्टॅलिननें त्या क्रांतीला पाठिंबा दिलेला नाहीं. जर मास्कोबाहेर चळवळीचें किंवा क्रांतीचें केंद्र गेलें तर त्या क्रांतीवर वचक राहाणें कठीण, ही गोष्ट स्टॅलिनला समजत होती. असें झालें तर कम्युनिस्ट जगांत रशियाचें जें अढळ स्थान आहे त्याला धक्का बसेल या भितीपोटीं व स्वार्थी हेतूनें स्टॅलिन अशा वेळीं स्वस्थ बसे म्हणूनच जोंपर्यंत क्रांतीचीं सूत्रें मास्कोला टिकून असत तोंपर्यंतच रशियाचा उघड पाठिंबा क्रातीला लाभत असे. मला वाटतें आजदेखील रशियाच्या या धोरणांत बदल झालेला नाहीं."

आजहि आतरराष्ट्रीय जगतात चिनी कम्युनिस्ट व रशियन कम्युनिस्ट असा जो पंक्तिभेद करण्यांत येतो व भारतांत अपसमज पसरविण्यात येतात त्याचा अर्थ इतकाच कीं, येथें येणारें कम्युनिस्ट सरकार चिनी तत्राने चालणारें यावें की रशियाच्या तत्रानें चालणारे यावें याचें मनसुबे पाहणाऱ्याची हीं भांडणें आहेत. भारताच्या हिताहिताचा त्याच्याशी काडीचा संबंध नाहीं.

१९४७ च्या डिसेंबर महिन्यांत मॉस्कोहून बेलग्रेडला एक खलिता आला. त्यांत स्टॅलिननें अशी मागणी केली होती कीं, युगोस्लव्ह मध्यवर्ती समितीच्या–जिलाससारख्या एखाद्या जबाबदार नेत्यानें त्वरित मॉस्कोला येऊन रशिया व युगोस्लव्हिया यांच्या अल्बानियाविषयक धोरणांत जी तफावत आहे त्यांत एकवाक्यता आणण्याचा प्रयत्न करावा.

## अल्बानियांतील लाथाळी

यावेळी अल्बानियांत काय घडत होतें ? जें रशियाकडे तोंड फिरवून बसलेल्या लाल राज्यातून घडतें तेंच तिथेंहि घडत होतें. सत्ता स्पर्धेच्या राजकारणांत हत्या घडली होती. अल्बानियाच्या मध्यवर्ती कम्युनिस्ट समितीचे नेते नाकू स्पिरू यानीं आत्महत्या केली होती. युगोस्लाव्हिया व अल्बानिया या दोन देशांत संपूर्ण सहकार्य प्रस्थापित झालें होते. अन्नवस्त्रें–अवजारें या सर्वांची मदत युगोस्लाव्हियाकडून अल्बानियाला होत होती. आज ना उद्यां युगोस्लाव्हिया व अल्बानिया याचे फेडरेशनच होईल या आशेवर युगोस्लाव्हिया स्वत: दरिद्री राहून ह्या मदतीचा उद्योग करीत होता. युगोस्लाव्हियाचा हा हेतु गुप्त होता असेहि नाही. त्यात गुप्तता राहावी अशी अपेक्षाहि नव्हती.

अल्बानियातील कम्युनिस्ट सरकारातील एका गटाला, ज्याचा म्होरक्या नाकू स्पिरू होता, अल्बानियाचें युगोस्लाव्हियाशी होणारें वाढतें सघटन धोकादायक वाटत होतें. त्याने उघडपणें आपलें बंड मांडले. याचा परिणाम असा झाला की नाकू स्पिरूवर चोहोंबाजूनीं टीका सुरू झाली. या टीकेने तोळामासा प्रकृतीचा नाकू स्पिरू कातावला. पक्षांतून हकालपट्टी झाल्यावर–भारतासारख्या लोकशाही देशात माणसें सुखानें दुसऱ्या पक्षात मंत्रिपदावरहि चढतात. – परतु कम्युनिस्ट हुकुमशाही देशात पक्षांतून हकालपट्टी झालेला माणूस काहीं दिवसात बघता बघतां नाहीसा होतो, काय होतें त्याचे ? कुणी सागत नाही ! तो फक्त नाहींसा होती–वितळतो, –पुन: त्याला कुणी कधीं पाहात नाहीं. हे भीषण भवितव्य स्पिरूला दिसू लागले. कारण स्पिरूनें अधिकारावर आल्यावर आपल्या प्रतिस्पर्ध्यांना याच मार्गानें नाहीसें केले असले पाहिजे. धास्तावलेल्या स्पिरूनें अखेर मृत्यूला मिठी मारली स्पिरू मेला आणि चमत्कार झाला. त्याचक्षणी युगोस्लाव्हिया व अल्बानिया याचे संबंध बिघडू लागले. स्पिरूला हवे होतें ते त्याच्या मृत्यूसरशी सुरु झाले. कुणी फिरवली ही चक्रें ? कुणाच्या इशाऱ्यावर हा पालट झाला ?

तें लवकरच स्पष्ट झालें. रशियाला युगोस्लाव्हियाची अल्बानियांतील वाढती लुडबूड मान्य नव्हती. ज्यानी स्पिरूला विरोध केला; ते लवकरच हाकलले गेले. आणि त्यानंतर अधिकारावर आलेल्या एनव्हेर होक्झा या कम्युनिस्ट नेत्यानें मोठा राष्ट्रपुरुष म्हणून स्पिरूचा गौरव केला. होक्झाने युगोस्लाव्हियाची मदत तिरस्करणीय मानली. आणि रशियाच्या हुकूमशहाच्या तालावर नाचून सत्ता हस्तगत केली होती.

## जिलासवर मायाजाळ

अशा परिस्थितीत रशियाचा खलिता आला, तेव्हा बेलग्रेडमध्यें त्याचें स्वागत झाले. कारण तोपर्यंत रशियाचाच हात अल्बानियाला खुणावीत आहे अशी बेलग्रेडमध्यें कुणालाच कल्पना नव्हती. ही हकिगत निवेदन केल्यावर जिलास लिहितो—

"परंतु आजपर्यंत मला हें कळलेले नाही कीं, स्टॅलिनने फक्त माझ्याच नावाचा उल्लेख करून मला का निमत्रावे ? मीच मॉस्कोला यावें असा स्टॅलिनचा का आग्रह होता ? मला वाटतं, त्याला दोन कारणें असावीं. एकतर मी सरळमार्गी व स्पष्टवक्ता माणूस आहे असें स्टॅलिनचें माझ्याविषयी मत झालें असावें. आमच्या युगोस्लाव्ह पार्टीतदेखील हेंच मत प्रसृत होतें ही गोष्ट मला माहीत होती. म्हणून अल्बानियासारख्या गुतागुतीच्या व नाजूक मामल्यात माझ्याशी बोलणीं करणें त्याला हितकारक वाटले असावें. परंतु मला दुसरें कारण स्पष्ट दिसत होतें व तें महत्त्वाचें होतें. मला आपल्या कच्छपीं घेऊन युगोस्लाव्ह मध्यवर्ती समितीत दुही माजवण्याचा स्टॅलिनचा विचार असावा. यापूर्वीच झूजोनिक यांना स्टॅलिननें फितवण्यांत यश मिळवलें होतें. परतु टिटोच्या अंतवर्तुळांत जीं माणसें होतीं, त्यात झूजोनिक नसल्यामुळें त्याचा फारसा उपयोग होत नव्हता."

"टिटो १९४६ सालीं जेव्हां स्टॅलिनला मॉस्कोमध्ये भेटला त्यावेळीं मला डोकेदुखीची व्यथा आहे असें त्यानें स्टॅलिनच्या कानांवर घातलें होतें. आणि त्याचवेळीं टिटोकरवीं विश्रांतीसाठीं मीं क्रिमियांत स्टॅलिनबरोबर राहावें असे त्यानें सुचविलें होतें. परंतु मी गेलो नव्हतों. कारण हें निमंत्रण मला वकिलातीमार्फत रीतसर मिळाले नाही. आणि ही सूचना बोलतां बोलता व्यक्त केलेल्या सदिच्छादर्शक स्वरुपाची होती असें मला वाटलें."

"म्हणूनच मी जेव्हां आठ जानेवारी १९४८ ला मॉस्कोला जाण्यास निघालो तेव्हा माझ्या मनांत अनेक शंकाकुशंका निर्माण होऊन मी साशंक मन:स्थितीत होतो. स्टॅलिनने मला विवक्षितपणे बोलावणें धाडावें याबद्दल मला एकीकडे अभिमान वाटत होता. परंतु हे काहीं सहजासहजी घडले नसावें व याच्याशी स्टॅलिनच्या मनात टिटोच्या संबधात काहीतरी काळेंबेरें शिरलेलें असावें त्याचा सबध असावा अशी धाकधूक मला वाटत होती."

(जिलासच्या मनात जी धाकधुक होती ती स्टॅलिनच्या प्रत्यक्ष भेटीत खरी ठरली. जिलासची तिसरी व शेवटची भेट निर्णायक ठरली. जिलासचा पुरता भ्रमनिरास झाला. या महत्त्वाच्या मुलाखतीचा वृत्तात तिसऱ्या व शेवटच्या हप्त्यात पुढील अकात देण्यात येईल.)

●●●

# विविध विषय



मूळचा थापाड्या. पण
यांच्या कादंबरीच्या
पहिल्या आवृत्तीची
प्रत तुम्हांला आज
हवी असेल तर
निदान हजार रुपये
तरी खर्च करावे लागतील.

## थिओडोर ड्रेसियर

अमेरिकन् वाङमयावर ड्रेसियरच्या लिखाणाची छाप दिसून येते. आज जी अमेरिकन् पुस्तकें दृष्टीस पडतात त्याचें आजचें स्वरूप येण्यास ड्रेसियरची पुस्तकेंहि कारणीभूत आहेत. इ. स. १९०० साली 'सिस्टर कॅरी' या नावाची कादंबरी प्रसिद्ध करून थिओडोर ड्रेसियरनें मोठें वादळ निर्माण केले. टीकाकारांनीं ही कादंबरी अत्यंत अश्लील ठरवली. धर्मोपदेशकानी आपल्या प्रार्थनेतून उघड उघड निषेध व्यक्त केले. स्त्रियांच्या समाजातून व क्लबातून बहिष्कार घालावा व पुस्तकें जप्त करावीत म्हणून मागण्या आल्या. प्रकाशक घाबरून गेले व पुस्तकाच्या प्रती विकण्याचे त्यांनी बंद केले. थिओडोरला अत्यंत आश्चर्य वाटले. तो म्हणाला, "या कादंबरीत अश्लील काय आहे? जीवन जसे मला दिसले तसें मी रंगविले यांत माझा काय अपराध?" ही १९०० सालातील हकिगत. आज ह्या कादंबरीवर कोणी आक्षेप घेणार नाही, पण तुम्हाला या कादंबरीची पहिल्या प्रकाशनाची प्रत हवी असेल तर निदान हजार रुपये खर्च करावे लागतील.

ड्रेसियरचें सुरुवातीचें जीवन किती खडतर होतें त्याचें यथातथ्य वर्णन काय करावे! त्याचे सर्व बालपण हालअपेष्टांत गेले. एकंदर १९ भावंडें. आईनें राबून राबून धुणी धुवावीत व मुलांची गुजराण करावी. मग छोट्या थिओडोरने उपाशीच राहावें. निजायला बिछाना कुठला! मिळेल त्या चटईवर, पथारीवर खाली जागा सापडेल तेथें एखादा कुत्रा झोंपीं जावा तशी अंगाची मुटकुळी करून, यानें निजावे. रेल्वेच्या बाजू बाजूने पडलेले कोळसे याने जमा करावे, घरीं शेकोटी तयार करावी व थंडी कशीबशी निवारण करावी. पायात घालायला बूट नाहीत. अनवाणी कसे जायचें, म्हणून याला शाळेंत जायला मिळू नये.

शाळेंत जाई तेव्हा शिक्षकांनीं याला ठोंब्या म्हणावें. दिलेला अभ्यास हा कधी नेमानें करीत नसे. गणित आणि व्याकरण म्हणजे याचे कट्टर शत्रू. याची गति त्यात चालत नसे. कधी यानें लक्ष दिलें असेल तर ना! सत्ता हाती येईल तर ह्या इंग्रजी वाङमयाचे व व्याकरणाचे हे शिक्षणक्रम मी बंद करून टाकीन असे तो म्हणे.

वार्ताहर व्हायचे असा बेत मनाशी करून 'शिकॉगो ग्लोब' या वृत्तपत्रसंस्थेत त्याने अर्ज केला. त्यांनी कळवलं की, आम्हाला कोणाची गरज नाही, तरी तो आपला त्या कचेरीत जाऊन एक खुर्ची अडवून बसे. असा एक महिना गेला. मग १८९१ साली शिकागोला एक मोठी डेमोक्रॅटिक राष्ट्रीय सभा भरली. त्या वेळी या वृत्तपत्रसंस्थेला काहीं जादा वार्ताहर हवे होते. त्यावेळेस त्यांनीं थिओडोरला काम दिले. ह्या नवशिक्या वार्ताहरानें अजून उभ्या आयुष्यात कधी रिपोर्टरचें काम केले नव्हते. अशा स्थितीत एका हॉटेलात इतर वार्ताहराबरोबर चहा घेत असताना या परिषदेचें अध्यक्षस्थान कोणाला मिळणार याबद्दल चर्चा सुरु झाली. कोणाला काहीच निश्चित सांगता येणार नव्हतें. त्यावेळी आपण जणू काही मुरलेले आहोत अशा आविर्भावानें थिओडोरनें सांगितले, की "माझा अंदाज चुकायचा नाही. साऊथ कॅरोलिनाचे सिनेटोर मॅकेंटी हे आजच्या परिषदेचे अध्यक्ष होणार." हें वाक्य उच्चारायला आणि सिनेटोर मॅकेंटी तेथें यायला गाठ पडली. त्यानी हें भविष्य ऐकलें व ते म्हणाले. "कोण्या महाभागाने हे वर्तविले तो पाहू द्या तर मला." थिओडोर पुढें झाला. "छान छान! तुला माझ्याबद्दल एवढा विश्वास आहे, तर चल मजबरोबर. आपण फक्कड जेवण घेऊं."

जेवण घेत असताना सिनेटोर मॅकेंटीनें त्याला बाजूला घेऊन हळूच सांगितले. "तुला एक गुप्त गोष्ट सांगतो, 'ग्रोव्हर क्लीव्हलँड' ह्याची नेमणूक अध्यक्ष म्हणून झालेली आहे व ही वार्ता प्रथम तुला मी देत आहे. अगदीं गुप्त ठेव"

दोन दिवसांपूर्वी नवशिका म्हणून पदार्पण केलेल्या ह्या वार्ताहराचें नशीब एकदम उजळलें. त्याला अस्मान ठेंगणें झाले. त्याचा आनंद गगनात मावेना. सर्वांअगोदर ही अत्यंत महत्त्वाची बातमी त्याला मिळाली. वार्ताहराच्या जगात सर्वांत अगोदर व महत्त्वाची बातमी मिळवणें याला किती महत्त्व आहे हे त्या क्षेत्रात वावरणारे लोकच बरोबर जाणोत.

आणखी काहीं महिन्यांनीं त्याला मोठें मोठें व महत्त्वाचें काम मिळू लागले. सेंटलईस ग्लोब डेमोक्रॅट, या संस्थेनें त्याला नाटय व चित्रपट परीक्षणाचें काम दिले. तो म्हणे, "मला या जगाची पुसट कल्पनाहि नाहीं आणि या संस्थेनं ही कामगिरी मजवर सोपवली तरी कशी?"

एका रात्री मोठी मजाच झाली. सेंटलुईसमध्यें एकाच वेळीं चार निरनिराळ्या ठिकाणीं प्रयोग झाले. त्याने एके ठिकाणचा नाटयप्रयोग पाहिला व त्या अनुषंगानें बाकीच्या तिन्ही ठिकाणचें रसभरित वर्णन केलें. त्याचें वृत्त पाठवताना जणू काय आपण सर्व समक्ष अवलोकन केलें अशा आविर्भावानें त्याला सर्व वृत्तांत रंगवावा लागला. कोणकोणत्या नटानें कसा कसा अभिनय केला; काम कसें वटलें, टाळ्या कोठे पडल्या, वन्समोअर कोठे कोठें व कोणाला मिळाले वगैरे सर्व हकीगत त्यानें रंगवली. दुसरे दिवशीच्या वर्तमानपत्रात हें आलें सर्व छापून; आणि मग त्याला कळलें की, कांही आकस्मिक रेल्वे अपघातामुळें हे प्रयोग सेंटलुइसमध्यें झालेच नाहीत. त्याला इतकें ओशाळें झाले कीं त्यानें त्या वृत्तपत्राचा राजिनामा दिला.

थिओडोर ड्रेसियरने लेखक व वार्ताहर म्हणून कीर्ति मिळवली; व अमाप पैसा पुढें मिळवला. त्याला एकदा विचारण्यांत आले की, 'तू हें एवढें यश कशाच्या जोरावर मिळवलेस? तर तो कपाळाला बोट लावून म्हणाला. "केवळ नशीब, परमेश्वरी कृपा, माझे गुण म्हणाल तर शून्य. भोपळयाएवढे!"

अर्थात हा त्याचा विनय मानवा लागेल. कारण चांगल्या कादंबरीकाराला लागणारे उत्तम कल्पनाशक्ति, तीक्ष्ण निरीक्षणशक्ति हे सर्व गुण त्याच्यापाशी होते,

• • •

ना. स. करंदीकर

# नागेंद्र पितांबर सुरे

अव्याहत कष्ट प्रामाणिकपणें करण्याची तयारी असूनहि अंधारांत चांचपडत असणारा हा विणकर—

'गणपत जाधव याची मुलाखत घेतांना मला स्वतला गमत वाटली. समाधान झालं. कोकणी पुरुषाच्या एकत्रित समाईक कुटुंबाचा परिचय देताना लोकांना आगळी माहिती देत आहे याची खात्री होती. चंदूलाल परदेशींची माहिती घेताना मला त्याचं भारी कौतुक वाटलं. आणि आज श्री. नागेंद्र पितांबर सुरे यांचा परिचय लोकांना करून देतांना मात्र मनांतली नाराजी जात नाहीं, त्याची परिस्थिती सुधारण्याची आशा नाहीं, मार्ग नाहीं आल्या दिवसाला फक्त कष्ट करून तोंड देण्याची त्याची तयारी आहे. कित्येक वर्षें मोठ्या धडाडीनें त्यानी तें केलेलें आहे. इथून पुढेंहि ते आणि त्याची कुटुंबीय मंडळी काम करीत राहातील.

मी त्याची हकिगत ऐकून नाराज झालों. माझी उदासीनता कित्येक दिवस राहील; पण सुरे याच्या बोलण्यात व वागण्यात मात्र मला निराशा दिसली नाही. उमेद खचलेली नाहीं. परमेश्वरावर अढळ विश्वास ठेवून सुरे हे वागत आहेत. आणि जन्मानें नशिबीं आलेले काम हसतमुखानें करीत आहेत. ऐकणारा नाराज झाला तिथें अनुभव घेणारा शांत असावा. याचं कारण निश्चत सागवां येत नाहीं.

सुरे हे स्वकूळ साळी समाजातील आहेत. त्याच वय ४५ च्या दरम्यान असाव त्याना एकूण सात मुलं आहेत. नवरा-बायको मिळून त्याच नऊ माणसाच कुटुंब आहे. या समाजाचा हातमागावर विणकाम करण्याचा पिढीजात धंदा ते करीत आहेत. तो हातमाग त्यांच्या १०'×१०' च्या खोलीत आहे. आणि त्या खोलीतली ५'×५' ची जागा हातमागानें व्यापली आहे. राहिलेल्या जागेंत ९ माणसाचं कुटुंब राहात आहे. त्याला राहणं म्हणायचं की दुसर काय म्हणायच, हें वाचकानीं ठरवावयाच आहे.

—सुरे हे पहाटे पांच वाजतां उठतात. आणि कामाला सुरुवात करतात. हातमागावर लुगडी विणण्याचं काम घरांतच चालू असतें. त्याच्या बोलण्यावरून समजल, त्यानी आठ तास मोठ्या कष्टानें काम केलें तर फक्त २॥ रुपयाच काम होतं. म्हणजे सरासरी ७५–८० रुपये महिना पडत असावा असं मी म्हटल्यावर "सरासरी ६०–६५ रुपये पडतो. कारण कांही दिवस सूत मिळत नाहीं आणि माणसाला सारख कष्टाच कामहि होत नाही" असं ते म्हणाले,

नऊ माणसाच्या कुटुंबाकरतां ६० रुपये त्याची कमाई. घरातली थोरली मुलगी आणि पत्नी घरातली काम करून दिवसभर विड्या करतात त्यात त्यांना विड्याच्या पोटी २ रुपये रोज सुटतो. म्हणजे साठ आणि साठ एकशेवीसच्या मिळकतीत नऊ माणसाच कुटुंब गुजराण करीत असाव असं दिसतं.

मी गेलों त्यावेळी संध्याकाळचा सातचा सुमार होता. दिव्याच्या प्रकाशांत सुरे याची विणण्याची कमालीची तंद्री लागली होती. मी गेलों तरी त्यांची कामावरची तंद्री भंग पावली नाहीं. कलावंत माणसाच्या तंद्रीसारखं त्याची तंद्री मोडावी लागली. विणण्याच्या कामाचा पसारा आवरून झाला. एका पोत्यावर मी कसाबसा बसलो. कारण खोलींतली बहुतेक जागा मागानें व्यापली आहे.

आपलं नाव छापून येणार, आपली माहिती येणार असं समजताच साधारणपणें मनुष्य खुलतो. पण सुरे याच्या बाबतीत मला चेहऱ्यावर काहींच बदल झालेला दिसला नाहीं. याच कारण बोलतां बोलतां मी मनाशीं शोधीत होतो. आणि तें कारण मला अगदीं शेवटीं समजलें.

साळी समाजाचें प्रतिनिधित्व दाखवण्यासाठी कुणी आल तर साळी समाजातील लोक त्या माणसाला नेमक याच्या घरी घेऊन येतात इतकी त्याची वागणूक आदर्श आहे. इजिप्तच्या प्रतिनिधीने त्याची माहिती नेली आहे. अफगाणिस्तानच्या प्रतिनिधानें त्याच्या घराला पायधूळ झाडली आहे. इंडोनेशियाच्या माणसाने माहिती नेली आहे. समाधानी वृत्ति हें त्याच्या जीवनाच सार असावं. कारण पुढं येण्याचा कोणताच मार्ग नसताना तशी आशा नसताना हे मात्र समाधानी दिसले, त्यांची विचारसरणी, धारणा उत्तम आहे. मी असं कां म्हणतो हे त्याच्या खालील उद्गारावरून दिसून येईल, मी म्हणालों "साधारणपणें मनुष्याला आपली मुलगी मोठी झाली की,

## आमचे प्रतिनिधींकडून

तिच्या लग्नाची काळजी वाटते. तुम्ही म्हणता लग्नाला दोन हजार रुपये खर्च येणार. मग त्याची तरतूद—?"

चेहऱ्यावर कोणताच भाव उमटू न देतां, ते म्हणाले, "परमेश्वर माझा पाठीराखा आहे. अजूनपर्यंत त्यानें कधी नडू दिलें नाहीं. तसंच काहीतरी होईल–"

त्यांनीं आपला मुलगा अहमदाबादला पाठविला आहे. "तो का!" असें मी म्हणतांच ते म्हणाले, "आम्ही राहातों त्या भागात मुलांना चांगलें वळण लागत नाहीं. मुलं फार खेळतात किंवा व्यसनी होतात. मुलगा नापास झाल्याबरोबर मी त्याला गांवी पाठवून दिला."

ज्यांनी माझी त्यांची ओळख करून दिली त्याच्या नि माझ्यापुढेंच चहा आल्यावर सहाजिकच "तुम्हांला–?" मीं म्हटलें. त्यावर ते म्हणाले, "मी चहा ११ वर्षांपासून सोडला आहे. त्यावेळी साखर मिळत नव्हती. आता मी आणि मुलं यांच्यापैकी कुणीच चहा पीत नाही. तो परवडत नाही. आणि जें परवडत नाही त्याचा नाद आपण सोडलेला बरा असं तुम्हाला वाटत नाही कां?–"

–जीव मारून जगणाऱ्या माणसाला एकदा तरी आपण जरा चैन करावी असे वाटेल कां नाही! म्हणून मी म्हटले, "मग तुम्हाला नाही वाटत, आपण सिनेमा पाहावा. आपण आणखी काही करावं?"

माझा हा प्रश्न मात्र त्यांच्या जिव्हारी बसला असावा. त्यांचा स्वर जरासा कापयमान झाला. दुःखाला वाचा फुटली. कळवळून ते म्हणाले, "पण करता कुठले-? परमेश्वराने जसें ठेवलें तसेंच आपण राहिलें पाहिजे. त्यावर दुसरा उपाय नाहीं. जिथ मन मारणं जरूर आहे त्या ठिकाणीं, त्यावेळी मन मारलच पाहिजे" पण या असल्या कठिण परिस्थितीतहि मुलीचें त्यानीं फायनलपर्यंत शिक्षण पूर्ण केलें आहे. पुढेंहि अगदी नाईलाज झाला म्हणूनच तें बंद ठेवावें लागलें.

विणकर समाजाची एक सोसायटी आहे. त्या सोसायटीचा २० रुपयांचा शेअर घेऊन ते सभासद झाले आहेत. सोसायटींतून सूत पुरवलं जातं. आणि त्या सूतापासून हातमागावर लुगडी विणून ते सोसायटीला देत असतात. सरकारने सोसायटीला मदत दिलेली आहे. सरकारची त्यावर देखरेख असते.

'पुणे विणकर सहकारी संघ लिमिटेड.' या संस्थेचे ५५० च्या दरम्यान सभासद असून सोसायटीच्या उत्तम कामकाजामुळें वरील सर्व लोक कसेतरी पोटाला मिळवत आहेत "आमच्या सोसायटीसारखी सचोटीने कारभार करणारी दुसरी सोसायटी नसावी" असे सुरे यानी बोलून दाखविले. पण सरकारकडून मिळणारे साहाय्य विणकराच्या प्रत्यक्ष पदरात पडत नाही अशीहि त्यानी तक्रार नोंदवली. "सरकारनें विणकामाच्या कामगारांसाठीं घरांची अडचण दूर व्हावी म्हणून सोसायटीमार्फत पैशाला मजूरी दिली असतांनाहि विणकराला अद्याप त्याचा प्रत्यक्ष लाभ झालेला नाहीं कागदी मंजुऱ्या प्रत्यक्ष काम करणाऱ्या माणसापर्यंत पोहचत नाहींत, त्या पोहचतील अशी व्यवस्था पाहिजे" असे सुरे यांनीं निक्षून सांगितले.

साळी समाजाची, विणकर समाजाची एकी नाही, नाहीतर आम्हाला खास चागले दिवस आले असते. विणकर समाजाला सरकार आज जगवीत आहे. पण सरकारच्या योजनेचा आम्हांला पुरेपूर फायदा घेतां येत नाही असेंहि त्यांचें प्रामाणिक मत आहे.

बैठ्या घरांतल्या कामामुळें माणसाचा जोस कायम राहात नाही. कमी जास्त आजार होतात असं त्यांनीं बोलून दाखवल. पुण्यात गिरणी एक असल्यामुळें काम मिळत नाहीं. मुंबईला ५–७ रुपये रोज मिळेल पण खोली मिळणार नाहीं. दोन ठिकाणीं प्रपंच होणार असं त्यांचं मत.

ही त्यांची परिस्थिति. अव्याहत कष्ट प्रामाणिकपणे करण्याची तयारी असूनहि हा विणकर अंधारांत चाचपडत आहे. जन्माला आलों. आतां मरेपर्यंत कष्टच केले पाहिजेत. अशी त्यांची धारणा झाली आहे. मुलं भराभरा मोठी होत आहेत. महागाई वाढतच जाणार आहे. तरीपण सुरे याच्या मिळकतीत फारसा फरक पडणार नाहीं. त्यांच्या हातून जें विणकाम होतं तें उत्तम दर्जाच होतं असं लोकाचं प्रामाणिक मत आहे. अस असूनहि मला तरी त्याच्या भावी आयुष्यांत अधार दिसत आहे.

याला जबाबदार कोण? यांत फरक पडणार आहे की नाही? राष्ट्र बिकट परिस्थितीतून जात आहे. या समाजाचा हा प्रतिनिधि मानला तर हीच परिस्थिति त्या समाजाची असावी. फायनलपर्यंत शिक्षण म्हणजे फार झालें! मला तर काहीच सुचत नाही. समजतय् येवढंच की, काहीं तरी चुकतय्. कुठतरी खटकतय्.

●●●



# पै. नथ्थनखाँ !

कै. भास्करबुवा बखले म्हणजे साक्षात् भू-गंधर्व ! धारवाडला एका महा कर्मठ ब्राह्मणाच्या माडीवर राहात असत. त्यांचे गुरु त्यांना तिथें येऊन गाण्याची तालीम देत असत. एक दिवस वाड्याचे मालक भर दुपारीं बाहेरून आले तर त्यांना माडीवरून साक्षात् स्वरगंगेच्या अपूर्व विलास ऐकूं आला. भास्करबुवांच्या सहवासांत वारंवार संगीत ऐकून मालकांचे कान तयार झाले होते, परंतु त्या दिवशीं कांहीं वेगळेंच, अपूर्व आणि दिलखेचक संगीत त्यांना ऐकूं येत होतें. सारें वातावरण धुंद झालें होतें. मालकांचे पाय पुढें जाण्यास तयारच होईनात. त्यांनीं खालूनच विचारलें, "काय बुवा, वर येऊं कां ?" भास्करबुवांची एकच धांदल उडाली. मालकांना वर या किंवा नका येऊं असें कसें म्हणावे ? त्यांना कांहींच कळेना. त्यांचे गुरुजी मदिरापान करण्यांत अगदीं दंग होऊन गेले होते. भोंवती बाटल्या, ग्लास, पसरले आहेत अशा थाटांत भास्करला ते तालीम देत होते. मद्याच्या वाढत्या कैफाबरोबरच तानांचीं चक्रें, आलापांची अपूर्व गोडी वाढवत होतीं. भास्करबुवा लगबगीनें उठून तो पसारा आवरूं पाहूं लागले. तो त्यांचे गुरु एकदम ओरडले, "अबे ओ ! क्या करता है !" भास्करबुवांनीं भीतभीतच मालकांच्या कर्मठपणाबद्दल सांगितलें. हा सारा प्रकार– त्यांना पसंत पडणार नाहीं असेंहि कळवळयानें सांगितलें. त्यावर खाँसाहेब उतरले, "चुप ठहेर जा ! अरे हम क्या हजाम है ! अब देखो !!" असें म्हणून ती चीज अर्धवट सोडून एक भजन अशा कांहीं आर्ततेनें आणि आकर्षक पद्धतीनें त्यांनीं सुरू केलें कीं, तोंपर्यंत दारांतून आंत येणारे मालक त्या स्वरगंगेत पार बुडून गेले. चिजेचा अंतरा आणि ताना, अशा कांहीं थाटांत सुरू झाल्या कीं वाऽऽ! खोलींतील इतर गोष्टींकडे त्यांचें लक्षच गेलें नाहीं. त्यांची समाधीच लागली आणि आणि त्यांना फक्त दिसूं लागलें तें साकार संगीत ! ती अवीट माधुरी !! खाँसाहेबहि एकदम रंगून गेले. साक्षात् संगीत तिथें नाचूं लागलें. अर्धा तास कसा आणि कधीं गेला हें मुळीं कळलेंच नाहीं. मालक दारांतच उभे होते. खाँसाहेब गात होते आणि भास्करबुवा ? अपराधी नजरेनें कधीं मालकांकडे पाहात होते तर कधीं अत्यादरानें गुरुच्या मुखाकडें दृष्टिक्षेप करीत होते. भजन संपलें आणि ती अपूर्व समाधी भंग पावली. तंद्रींतून जागे होऊन मालकांनीं खाँहेबांपुढें अक्षरशः लोटांगण घातलें आणि म्हणाले "खाँसाहेब आम्हीं जन्मभर पूजाअर्चा केली. पण असल्या स्वरांनीं मोहित होऊन भगवान शंकर खरोखर आमच्या आधीं तुम्हांला मुक्ति देईल यांत तिळमात्र संदेह नाहीं! देवाचे खरे भक्त आपणच आहांत !!" असें म्हणून आजूबाजूला नजर जरासुद्धां ढळूं न देता केवळ खाँसाहेबांच्या मुखाकडेच अत्यादर आणि भक्ति अशा संमिश्र भावनेनं पाहात मालक निघून गेले. खाँसाहेबांनी हंसत हंसत विचारले; "बेटा भास्कर ! यांतील थोडा 'प्रसाद' तुझ्या मालकांना नेऊन देतोस कां ?" भास्करबुवांनाहि हंसूं आवरेना. त्यांनीं चटकन् गुरुचे पाय धरले. हा अजब संगीत–सम्राट म्हणजेच नथ्थनखाँसाहेब आग्रेवाले. संगीतक्षेत्रांत त्यांचा लौकिक फार मोठा होता. कर्तबगारी अशीच नजरेचा ठाव घेणारी होती. एक अजब चीज म्हणूनहि त्यांची ओळख त्यांचें समकालीन विसरूं शकले नाहींत.

आग्र्यास १८४० च्या सुमारास त्यांचा जन्म झाला. तेथेंच सुमारें १२ वर्षे त्यांनीं गुलाम अब्बास खाँ यांचेकडे तालीम घेतली. तेथून पुढें ते जयपूरला गेले. तेथें संगीताचे अनेक जलसे ऐकून त्यांच्या गाण्याला आकर्षक ढंग प्राप्त झाला. आवाज जात्याच मधूर, तशांतच उपजत ज्ञानाचा अमाप फायदा. यामुळें खाँसाहेबांच्या मैफिली लोकांच्या स्मरणांतून जाईनात. त्यांच्या अशाच एका मैफिलीवर बडोद्याचे महाराज इतके खूष झालें कीं, त्यांनीं खाँसाहेबांना मुद्दाम बोलावून घेतलें. त्यांचा मानसन्मान केला. नथ्थनखाँच्या मफलींत एक अगळाच रंग भरे. तो हैदरखाँ यांच्या सारंगीमुळें आणि कल्लनखाँ यांच्या तबल्याच्या थापेनें ! जणूं आटीव दुधांत केशर आणि साखर यांचा झालेला एक अपूर्व मिलाफच !

नथ्थनखाँसाहेब मूळचे जरी आग्र्याचे तरी त्यांची सारी उमर म्हैसूर दरबारचे खास गायक म्हणून नोकरी करण्यांतच गेली. म्हैसूर दरबारी त्यांना नोकरी कशी मिळाली. हें मनोरंजक तर आहेच पण खाँसाहेबांच्या गुणांची साक्ष तत्काळ पटविण्यास उपयोगी आहे. कै. गोविंदराव टेंबे यांनीं यासंबंधीं दिलेली आठवण त्यांच्याच शब्दांत मांडणें योग्य ठरेल. गोविंदराव म्हणतात–"श्री. चामराज महाराज एकदां उत्तरेकडे प्रवासास गेले असताना त्यांनीं नथ्थनखाँचें गाणें ऐकलें; व त्या प्रसंगीं दाक्षिणात्य संगीताच्या भोक्त्या महाराजांना उत्तरेच्या या कुशल गायकानें भारून टाकलें. महाराजांनीं त्यांना म्हैसूरला येण्याचा आग्रह केला. सवडीप्रमाणें नथ्थनखाँसाहेबांनीं आग्र्याहून म्हैसूरचा कंटाळवाणा प्रवास केला. आणि स्वारी म्हैसूरला दाखल

झाली. इतक्या लांबच्या प्रवासाच्या श्रमपरिहारार्थ मदिरादेवीचा प्रसाद त्यानीं भरपूर सेवन केला. 'ब्रह्मानदी लागली टाळी कोण देहाते साभाळीं ' अशा स्थितींत खाँसाहेब होते. भास्करराव त्यावेळी बरोबर गेले होते, म्हैसूरच्या दरबारबक्षीना त्यानीं खबर दिली कीं, नथ्थनखाँसाहेब आले आहेत आणि धर्मशाळेंत उतरले आहेत, अगाऊ पत्राने नक्की तारीख कळविण्याची खबरदारी घेण्याची त्यावेळच्या कलावंताना सवयच नसे. हल्ली तरी आहे कीं नाही याची शकाच आहे. निघण्याचा वेतच नक्की नसायचा, तेथें तारीख नक्की कोठून असणार ? आणि इतके सर्व नक्की होऊन अखेरच्या मुक्कामाला नक्की पोंचायची हमी कोण घेणार ! असो !

दरबारबक्षीनीं महाराजाच्या कानावर ही गोष्ट घातली, मग महाराजांना दम कुठला ! लगेच रात्रीची खास मैफिल ठरविली. लांबच्या प्रवासामूळें खाँसाहेब थकले असतील तेव्हां एक दिवस त्याना विश्रांति घ्यावी अशी विनती दरबारबक्षीनीं केली. पण महाराजांची लहर ? त्यामुळें कोणाचें काय चालणार ? फर्मान घेऊन बक्षी धर्मशाळेकडे आले. त्यावेळीं नथ्थनखाँसाहेब अर्धवट जागरूक स्थितीत होतें. कसेंबसे अंगावर कपडे चढविले. त्यापूर्वी भास्कररावबुवांनीं दरबारबक्षीना खाँसाहेबांच्या सैरभैर अर्धवट स्थितीचा इषारा दिला होता. बिचारा दरबारबक्षी—गाण्याला रग यावा म्हणून थोडा प्रसाद घ्यायची त्यानें सल्ला दिली. खाँसाहेबाना वाटलें. दुधांत साखर पडली— दरबार हॉलमध्यें मडळीं पोंचली. तंबोरे जुळविले. गाणें सुरुं झालें. खाँसाहेबांना गाणे आवरेना. आपण कोठें आहोंत कोणासमोर आहोत याचीहि जाणीव नाहीशीं झाली. महाराज सतापले आणि उठून गेले. खाँसाहेबांची धर्मशाळकडे रवानगी करण्यांत आली.

दरबारबक्षीनीं दुसऱ्या दिवशी दोन हजार रुपांयाच्या दोन थैल्या आणल्या आणि खाँसाहेबांपुढें ठेवून त्यांना सांगितलें, " ही कालच्या गाण्याची बिदागी. आपण आता आपल्या गावीं जावें " खाँसाहेब चकित झाले " भास्कर ! ये क्या मामला है ?" भास्करराव मनांतून खूप चिडले होते. त्यांनी उत्तर दिलें " तुमचं कमनशीब !" पण बेटा झालय् तरी काय ?" भास्करराव कपाळाला हात लावून म्हणाले, " काल रात्री महाराजापुढें आपलं गाणं झाल आणि त्याची ही बिदागी !"

खाँसाहेबाच्या डोकीत थोडा प्रकाश पडू लागला. त्यांनी त्या थैल्या दरबारबक्षीपुढें लोटून दिल्या आणि म्हणालें, " कुठल्यातरी दुसऱ्या गवयाची ही बिदागी घेण्याइतका मी बेवकूफ नाहीं. ही परत घेऊन जा. देखिये, महाराजांना आज रात्रीं गाण ऐकवीन आणि मगच आग्रेवाला नथ्थनखाँ येथून जाईल. महाराजानीं माझं गाण मात्र ऐकलच पाहिजे. त्यावांचून मी इथून हलायचा नाहीं " महाराज म्हैसूरचे राजे आणि हे कलावंतांचे राजे ! बिचारा दरबारबक्षी परत गेला. त्यानी महाराजांची कशीतरी मोठ्या कष्टाने समजूत घातली. चामराज महाराज तरी खरे सगीतप्रेमी होते. त्यानी मोठ्या दरबारांत बैठकीची आज्ञा दिली त्या रात्रीच्या नथ्थनखाँसाहेबाच्या गाण्याचें वर्णन कोण करणार ? महाराज झालेला प्रकार पार विसरून गेले. आणि त्यांनी खाँसाहेबांना दरबारांत कायमची नोकरी दिली.

खांसाहेब जसे अव्वल दर्जाचे गायक होते तसे ते उत्तमपैकीं गुरु म्हणूनहि मानमान्यता पावले होते. शिष्याला शिकविताना कोणत्याहि




प्रकारचा चोराचोरीचा मामला त्यांच्या ठिकाणी आढळत तर नसेच तर उलट त्यांच्या मनांत आलें कीं ते शिकवून रिकामे होत. ' जें जें आपणासीं ठावें तें दुसऱ्याशी सांगावें ' या उक्तीप्रमाणें त्यांचें आचरण असें. म्हणूनच त्यांच्या शिष्यांनाहि त्यांच्याकडून विद्या ग्रहण करण्यांत मोठी धन्यता वाटे. त्याचे एक जिवलग दोस्त हैदरबक्षखाँसाहेब म्हणून होते ! नथ्थनखाँच्या अंतसमयीं ते त्यांना भेटण्यास गेले तेव्हा नथ्थनखाँ अत्यंत विकलांग अवस्थेंत शेवटच्या घटका मोजीत होते. हैदरबक्ष तें दृश्य पाहून त्यांना कडकडून मिठी मारून ढसढसा रडूं लागलें सारा प्रसगंच हृदयस्पर्शी होता. पण कांहीं वेळांन तो आवेग आवरून नथ्थनखाँनीं एक ठुमरी म्हणण्यास सुरुवात केली. तेव्हा खासाहेबाची तब्येत लक्षांत घेऊन हैदरबक्षांनी त्याना अडविले. त्यावर नथ्थनखाँ म्हणाले, " बे ! कमनसीब ! सुनले, अब नथ्थन जा रहा है ए बात फिर नही सुननेमें आयेगी !" असें म्हणून ती ठुमरी अशा कांही रगतीनें आणि ढंगानें म्हणण्यास सुरुवात केली की, हैदरबक्ष तर बेभान झाले. ते स्वत.ला विसरले. त्याच्या नेत्रांतून घळघळा अश्रू ओघळूं लागले. ते पाहून नथ्थनखाँ पुन्हा एकदा थाबून म्हणाले, " अबे सुन ! रोता है क्या ? नथ्थन जायेगा लेकिन ये रंग तुम्हारे पासही रहेगा !" आणि खरोखरच त्या अवीट ठुमरी नंतर खाँसाहेबांच्या तोंडून पुन्हा सगीत म्हणून बाहेर पडलें नाहीं. बस्स त्यांचा तोच अखेरचा स्वरविलास !

सुधीर दामले

●●●



एस्. ए. कुलकर्णी
( जतकर )

" मराठी रंगभूमीला यापुढें उर्जितावस्था येईल असे मला वाटत नाहीं; निदान माझ्या आयुष्यांत तरी हा भाग्याचा योग माझ्या डोळ्यांनीं पाहण्याचें सुख मला लाभेल याबद्दल मी शंभर टक्के साशंक आहे " असे निराशेचे पण अर्थपूर्ण उद्गार काढणारे स्वरराज छोटा गंधर्व गेलीं ३२ वर्षे रंगभूमीची यथायोग्य सेवा करीत आले आहेत. २२ जुलै १९२८ रोजीं मराठी रंगभूमीवर पहिल्यांदा प्रवेश करणाऱ्या या जादुगार नट–गायकाचें सारें जीवन अतिशय उद्बोधक आहे; भावी नटाला आदर्श ठरेल असें आहे. कलेला संपूर्णतया वाहून घेतल्याविना आणि रात्रंदिवस तिची अत्यंतिक निष्ठेनें व प्रामाणिपणें सेवा केल्याविना ती कलावंतावर कधींच प्रसन्न होणार नाहीं––हेंच त्यांच्या कष्टाळू प्रभावी जीवनाचें मूल्य व मूलभूत वर्म आहे !

सातारा जिल्ह्यांतलीं माणसें कर्तृत्ववान ठरत आलेलीं आहेत अशी महाराष्ट्रांत ख्याति आहे. याच जिल्ह्याच्या कोरेगांव तालुक्याच्या ठिकाणीं छोटा गंधर्वांचा जन्म १९१८ सालीं झाला. त्याचें मूळ नांव सौदागर नागनाथ गोरे. घरांत वडिलोपार्जित असा विणकामाचा व्यवसाय चालू होता. सौदागरनीं लहानपणीं या व्यवसायाचीं छोटीं छोटीं कामें हस्तगत केलीं होतीं. आणि मराठी दुसरीपर्यंत फक्त शिक्षण घेतलें. जन्मतः त्यांना अतिशय गोड गळा लाभल्यानें वर्गांतल्या कविता, कार्यक्रमाची स्वागतपद्यें वगैरे ते अतिशय गोड म्हणत आणि साहजिकच सर्वांकडून त्यांचें भरपूर कौतुक होत असे. कुणीहि आपलं बाळ सौदागरला बोलवावें, त्याच्याकडून चार-दोन गोड गाणीं म्हणवून घ्यावींत नि त्याला खाऊ द्यावा हा नित्याचा प्रकार होता. घराण्यामध्यें संगीताचा बिलकुल वारसा नसतांनाहि सौदागरला लाभलेली मधुर आवाजाची देणगी म्हणजे दैवी देणगीच यात शंका नाहीं.

## रंगभूमीवरला बालनट

याच सुमारास कोरेगांव शेजारच्या शिरढोण गांवचे श्री. दामुअण्णा जोशी ' आनंद संगीत मंडळी ' ( बालनटांची )मध्यें मॅनेजर होते. तेथें त्यांचे मतभेद झाल्यामुळें ते स्वतः वेगळे झाले आणि त्यांनीं स्वतःची कंपनी काढण्याचें ठरविलें. श्री. जोशींनीं १९१८ च्या पाडव्याला आपल्या ' बालमोहन संगीत मंडळी ' च्या उद्घाटनाचा नारळ फोडला. ही कंपनीदेखील बालनटांचीच होती; परंतु उद्घाटनानंतर श्री. जोशींनीं अनुरूप मुलें शोधण्याचें काम हाती घेतलें, कोरेगांव व शिरढोण मध्यें केवळ दोन मैलांचें अंतर आहे. त्यामुळें सौदागरांच्या गोड आवाजाची प्रसिद्धी त्यांच्या कानांवर गेली आणि श्री. जोशींनीं सौदागरच्या वडिलांना प्रथमतः गांठलें. वडिलांनीं सौदागर व पितांबर या सुपुत्रद्वयांना जोशींच्या स्वाधीन केलें. साहजिकच गोड आवाजामुळें सौदागरना स्त्री भूमिका मिळाली. बालमोहनचें दुसरे मालक श्री. नानासाहेब गोखले हे उत्तम नाटककार होते. त्यांनीं लिहिलेलें ' प्राणप्रतिष्ठा ' हें नाटक पहिल्यानें रंगभूमीवर आलें. त्यांत सौदागरांच्याकडे मुख्य नायिकेची भूमिका होती. त्या काळीं मोठ मोठ्या गवयांनीं कंपनीमध्यें येऊन बालनटांना संगीताचे धडे द्यायचे अशी वहिवाट होती; इतकेच नव्हे तर ज्या ज्या गांवीं कंपन्या मुक्काम करीत तिथल्या गवय्याकडेदेखील संगीताचे पाठ मिळत. त्यानुसार सौदागरना श्री. नरहरबुवा पाटणकर यांच्याकडून गानविद्येचे पहिले पाठ मिळाले.

## नांव बदललें

त्यानंतर कंपनीनें श्री. स. अ. शुक्ल यांचें ' भक्त प्रल्हाद ' हें दुसरें नाटक बसविलें. या नाटकांतील पदांनीं सौदागरनीं श्री.

# मराठी नाटयसृष्टींतील प्रभावी जादुगार

# स्वरराज छोटागंधर्व

समतानंद गद्रे व श्री. दामुअण्णा जोशी याना अक्षरशः मोहवून सोडलें. " हा एक छोटा गंधर्वच आहे " असे उद्गार त्यांच्या तोंडून नकळत बाहेर पडले आणि सौदागराचें मूळ नाव बदललें. ' छोटा गंधर्व ' या नावानेंच त्यांची प्रसिद्धी होत गेली. आज ते एक विख्यात गायक— इतकेच काय पण स्वराज, गायनाचार्य म्हणून प्रसिद्ध असले तरी त्याची ओळख ' छोटा गंधर्व ' या परिचित नावानेंच आहे.

बालमोहन संगीत मंडळीनें, नंतर श्री. गद्रे यांची कांहीं नाटकें बसविली आणि मग ' संशयकल्लोळ ' हें प्रसिद्ध नाटक हाती घेतलें. त्यांत छोटा गंधर्वांनी ' रेवती 'ची भूमिका केली, ती अतिशय गाजली. लहान मुलाचें सुप्रसिद्ध नाटक म्हणून या ' संशयकल्लोळ 'चा खूपच बोलबाला झाला. या सुमारास श्री. रघुवीर सावकार संशयकल्लोळ-मधील रेवतीच्या कामासाठी खूपच प्रसिद्ध होते. त्या थाटाचें अप्रतिम काम छोटा गंधर्वांनीं आपल्या बालवयात रंगभूमीवर सादर केलें. बैठकीच्या प्रसंगीं ' आदा करण्याचा ' नमुनेदार हावभाव त्यांना ताराबाई कुमठेकर याच्याकडून शिकविला गेला होता. (ताराबाई या सुप्रसिद्ध ठुमरी गायिका वत्सलाबाई कुमठेकर यांच्या मातोश्री) याच बैठकीच्या प्रवेशांत ' ऐसी ना मारो पिचकारी ' या हिंदी पदाचें रूपांतर ' मारू नको पिचकारी कन्हैया ' मराठी शब्दात छोटा गंधर्वांनी रसिकाना ऐकविले.

## आवाज फुटल्यानंतर

श्री. भास्करबुवाचे दोन शिष्योत्तम श्री. नरहरबुवा व श्री. दत्तुबुवा बागलकोटकर यांच्याकडून छोटा गंधर्वांना शास्त्रोक्त संगीताची तालीम मिळत होती. त्यावेळी कंपनीची आठवड्यांतून तीन नाटके होत. याच सुमारास म्हणजे वयाच्या तेराव्या वर्षी छोटा गंधर्वांच्या आवाजात बदल होऊ लागला. म्हणून श्री दामुअण्णानी त्यांना संपूर्ण एक वर्षभर विश्रांति दिली; परंतु त्याना परत गावी धाडलें नाही. कंपनीतच मुलाप्रमाणें त्यांचा उत्तम प्रकारें सभाळ केला. छोटा गंधर्व म्हणजे कंपनीतल्या संगीत बाजूचा मूळ आधार. त्यांच्या गैरहजेरीत कंपनी बंद नसावी या उद्देशाने दामुअण्णानीं ' नाटिकां 'चा नवा प्रकार रंगभूमीवर आणला. एक वर्षानंतर छोटा गंधर्व पुन: रंगभूमीवर उतरले. १९३२ पर्यंत गद्रयांची ५, शुक्लाचें १, गोखल्याचे १ अशी नाटके होत होती. १९३३ मध्यें आचार्य अत्र्याचें तुफान विनोदी नाटक ' साष्टांग नमस्कार ' रंगभूमीवर आलें. आवाजांत फरक झाल्यामुळें छोटा गंधर्वांना पुरुष भूमिका करणे प्राप्त होते. त्यानुसार ' घराबाहेर ' नाटकापासून त्याच्याकडे पुरुष भूमिका आली. आचार्य अत्र्याची एकाहून एक सरस–विनोदी–गंभीर नाटकें बालमोहन संगीत मंडळीने रंगभूमीवर गाजविली आणि तिची गणना मोठ्या व प्रसिद्ध कंपन्यामध्यें होऊ लागली. छोटा गंधर्वांना संगीताची अंगोपांगे पचनी पडल्यामुळें त्यांनी आपलें स्वतःचें एक खास वैशिष्टय रंगभूमीवर निर्माण करण्याचा हव्यास घेतला नि तो यशस्वीहि करून दाखविला. भिंगरीवजा तान मारावी अन् दमछाटपणें सूर घोळत ठेवावा नि अखेर 'टाळी' घ्यावी ही प्रथा त्यानी हातावेगळी केली. गातां गातां कमालीचे गोड स्वर छेडावेत, आकर्षक ' गमक ' घ्यावी रोमांचकारी ' घुमाव ' सुनावून प्रेक्षकाना तल्लीन करून सोडावे, अजब नि कसबी हरकती घोटाव्यात अशा थाटाची स्वत:ची गायनपद्धति छोट्या गंधर्वांनी निर्माण केली ती आजतागायत अजोड ठरलेली आहे. गाण्याची हुबेहूब नक्कल म्हणजेच काही संगीत नव्हे असे त्यांचें प्रथमपासूनचें मत असल्यानें त्यांच्या गाण्यात ' कोणाशी साम्य आढळत नाहीं. छोटा गंधर्वांचें गाणें हें केवळ त्यांचेंच गाणें वाटतें ही अतिशय गौरवास्पद बाब आहे. " सदैव दुसऱ्याच्या घरात राहण्यापेक्षां स्वतःचें घर असावें. यात एक आगळें समाधान असतें " अशी त्यांची वाजवी श्रद्धा आहे. आपल्या गायनाच्या बाबतीत त्यांनीं हीच श्रद्धा आजवर राबविली आहे.

## अवलियाच्या सानिध्यांत

' मानापमान ' मधील ' धैर्यधरा 'ची भूमिका छोटा गंधर्वांनीं प्रथम स्वीकारली तेव्हां त्यांतील पद्याचा नूर कायम ठेवूनदेखील त्यानीं आपली स्वतंत्र पद्धत ( स्टाईल ) प्रेक्षकाच्या खास नजरेला आणून दिली; इतकेच नव्हे पण धैर्यधराचा पोषाखहि त्यांनीं बदलला. बालमोहनची कीर्ति दिवसेदिवस फैलावत गेली. बापूराव माने, पंडितराव नगरकर, सुलोचना पालकर याच्यासारखे कलावंत कंपनींत दाखल झाले. त्यामुळें छोटा गंधर्वांना आपल्या संगीतविद्येची खोली अधिकाधिक वाढविण्यास अवसर मिळूं लागला. कै. सवाई गंधर्वांकडूनहि थोडीफार संगीताची संथा त्याना १९३० मध्यें लाभली होती; परंतु उस्तादी गवयाची खरीखुरी शिकवण त्याना ' बाबा शेंदेखाँ ' याच्याकडून मिळाली. बाबा शेंदेखाँ म्हणजे एक अवलिया होते, जगाची शुद्ध नसलेले एक लहरी–वेडे गवई होते. १९३९ मध्यें त्याची व छोटा गंधर्वांची अचानक गांठ पडली आणि रीतसर ' गंडा ' बांधून छोटा गन्धर्वांनी त्याच्याकडे गायकीचा अभ्यास केला. उस्तादजी अतिशय व्यसनी व जवळजवळ बेशुद्ध अवस्थेत मुंबईमध्यें फोरास रोडला एका घाणेरड्या बोळात राहात होते. दिवसा त्या बाजूला फिरकणेदेखील अश्लाघ्य व धोक्याचे मानले जाई, परंतु संगीतविद्येवर अपूर्व निष्ठा बाळगणारे छोटा गन्धर्व आपल्या तपश्चर्येपासून तसूभरहि ढळले नाहीत त्या बोळातील वास्तव्याला साजेसा विचित्र पोषाख ( तुर्की गोंडेदार टोपी, इजार इत्यादी ) करून ते बुवाच्याकडे जात, त्याची सेवा–शुश्रूषा प्रामाणिक निष्ठेने करीत आणि त्याची लहर सांभाळून विविध रागदारीच्या चिजा हस्तगत करीत. संगीतशास्त्रावरचे अनमोल ग्रंथ वाचावेत; त्यांतील रागदारीच्या खाचाखोचा, शंकाकुशंका यांचें निरसन बुवाच्या तोंडून करून घ्यावें अशा बुद्धिवादी प्रयत्नानें त्यानीं गायकीचा सखोल अभ्यास केला. बुवा एवढे लहरी की कुठेंहि लहर

लागेल तेथेच छोटा गन्धर्वांना चिजा सांगत व शिकवत, एकदां तर चौपाटीवर कॉरोनेशन हॉटेलच्या फुटपाथवर बुवांना लहर लागली आणि छोटा गंधर्वांना एक नवी चीज शिकवू लागले. ही अजब तालीम पाहायला पन्नास-साठ जणांदेखील जमले--ही आठवण छोटा गन्धर्व अगदी हसत हसत सांगतात. ख्याल, टप्पा, ठुमरी, वगैरे गायनांतील विविध प्रकाराची यथायोग्य तालीम बाबा शेंदेखां यांच्याकडूनच छोटा गंधर्वांना मिळाली. १९४७ पर्यंत जेव्हां जेव्हां सवड सांपडेल तेव्हां तेव्हां ते बुवाच्याकडे जात आणि गाण्यातल्या बारीकसारीक खाचा-खोचा समजून घेत असत.

## गंडांतरांचा कडेलोट

१९४२ मध्यें श्री. नागेश जोशी यांच्या समवेत छोटा गन्धर्वांनी 'कला विकास नाटक मंडळी' काढली. 'देवमाणूस' 'फुलपांखरें' 'मुलांचा दगड' वगैरे सुप्रसिद्ध नाटके या कंपनीनें गाजविली. त्यांतल्या पदांच्या सर्व चाली छोटा गन्धर्वांनी बसविल्या. परंतु ही कंपनी अल्पायुषी ठरली. कंपनीतल्या नटांनी आपल्या स्वतंत्र नाटक कंपन्या काढावयाचा हा जणू महाराष्ट्राला शापच आहे. तसच याहि बाबतींत घडलं नि १९४८ मध्यें कंपनीचा कारभार थंडावला. चाळीस हजार रुपयांचें प्रचंड कर्ज छोटा गन्धर्वांच्या माथ्यावर बसलें. १९४९ हें साल तर त्यांच्या आयुष्यांतल्या गंडांतराच्या कडेलोटाचें ठरलें. सिगरेट ओढायलाहि पैसा नाहीं अशी अवस्था प्राप्त झाली. स्वतंत्र बाण्यानें वावरणाऱ्या छोटा गन्धर्वांना नोकरी पत्करण्याचें अगदीं जिवावर आलें होतें. परंतु करणार काय बिचारे! त्याच वेळी 'पठ्ठे बापूराव' हा बोलपट निघाला; त्यांतील गाण्यांना प्लेबॅक देऊन त्यांनीं अडीच हजार रुपये मिळविले. श्री. पंडितराव तरटे यांनीं 'भारत नाट्य कला' ही संस्था काढली. या संस्थेत छोटा गन्धर्वांनीं ४०० रु. पगारावर अखेर नोकरी पत्करली. ही संस्था 'विद्याहरण,' 'सौभद्र,' 'मानापमान' आदी जुनी नाटकं करीत होतीं. 'विद्याहरणां'-तील 'कचा'ची भूमिका छोटा गन्धर्वांनी त्यावेळी अजरामर करून सोडली. 'मानापमान'मधील 'धैर्यधरा'ची भूमिका छोटा गन्धर्वांनीं करूच नये म्हणून होणारी पूर्वीची सोंवळी टीका थंडावून 'धैर्यधरा'ची भूमिका छोटा गन्धर्वांनीच करावी असा आग्रह निर्माण होईल एवढी लोकप्रियता त्यांनी आपल्या प्रदीर्घ तपश्चर्येच्या जोरावर एव्हांना मिळविली होती. आठ-नऊ महिन्यातच त्यांनीं आपल्या नोकरीला रामराम ठोकला. तेव्हांपासून ते 'नाईट' पद्धतीवर नाटकां-तलीं कामें करीत आले आहेत. पूर्वी त्यांना 'नाईट'ला ५० रु. मिळत आत्तां त्यांना ३०० रु. मिळतात. नाटकातली कामे व मैफली यांच्या जोरावर त्यांनीं लक्ष्मी खेंचून आणली. ते कर्जमुक्त झाले. नाट्यातल्या उपवर मुलामुलींची लग्नें त्यांनीं केली आणि पुण्याच्या डेक्कन जिमखान्याच्या बाजूला 'स्वरराज' नावाचा सुंदर टोलेजंग बंगला बांधला. आजवर छोटा गन्धर्वांनीं 'मानापमान' 'सौभद्र' नाटकाचे पांच-सहाशे प्रयोग केले. त्यांनीं अलीकडच्या प्रसिद्धि-भिमुख नट-नटी-कंपन्याप्रमाणें त्याची बिनचूक मोजदाद ठेविली असतीच तर शत-सवत्सऱ्या साजऱ्या करण्याचा मान त्यांना पांच-पन्नास वेळा प्राप्त झाला असता! हें टामटूम त्यांच्या स्वभावांत बसत नाहीं. प्रामाणिक निष्ठेनें काम करायचे एवढेंच त्यांचें ध्येय ठरलेले आहे. पैश च्या मागें लागून त्यांनीं बोलपटसृष्टिकडे धाव घेतली नाही. "आपल्या गायकीची तेथें आवश्यकता नाहीं." असेंच त्यांना वाटते. नाहीं म्हणायला नुकतेच "रंगल्या रात्री अशा" या बोलपटाचे संगीत दिग्दर्शन त्यांनीं केलें आहे. "दिग्दर्शन कसले- जें आजवर गायलो तेंच तिथं म्हटलं" अशा शब्दांत ते या संगीत-दिग्दर्शनाचं वर्णन करतात. बोलपटांत जाऊन "आपला गळा दुसऱ्याच्या ताब्यात देऊ नये" असा त्यांचा अनुभव आहे.

## गायनाची हुकमी करामत

श्री. गोपीनाथ सावकाराच्या 'कलामंदीर' मध्यें छोटा गन्धर्व अलीकडे बरीच कामें करतात. श्री. विद्याधर गोखले लिखित 'सुवर्ण-तुला' या नवीन नाटकातली त्यांची नारदाची भूमिका बरीच प्रसिद्ध झालेली आहे. गाताना स्वरावर श्रोत्यांना झुलवीत ठेवून अगदीं वेगळ्या ठिकाणी नेऊन सोडायचें आणि अखेर बेमालूमपणे त्यांना मूळपदावर आणून सोडायचें ही छोटा गन्धर्वांची गायनातील हुकमी करामत आहे. जोडराग त्यांना विशेष आवडतात. शुद्धकल्याण, मारु-बिहाग, बिहागडा, शंकर-केदार, मधुकंस आदी रागांमधील त्यांची करामत दृष्ट लागण्याजोगी वाटते. त्यांचा आवाज पल्लेदार असल्या-मुळें मध्य व तार सप्तकात फुलणारे राग त्यांना अतिशय प्रिय आहेत. गायनाला ते एक अपूर्व 'सुंदरी' समजतात; सुंदरीला जसे विविध अलंकारांच्या साजशृंगाराने नटवावें तसे तिचें सौंदर्य खुलून दिसतें; त्याचप्रमाणें गायनाला अप्रतिमपणे सजविण्यांतच त्यांच्या गायनातील लोकप्रियता व गोडी सामावलेली आहे यांत वादच नाहीं. गाण्यामध्यें रंजकता व सहजता असावी यावर त्यांचा प्रामुख्याने भर आहे. शरी-रानें आकांड तांडव करून गायिलेले गाणें रंजक वाटणार नाहीं अशी त्यांची निश्चित श्रद्धा आहे. अभिनय तथा गायन या दोहोंमधें कृत्रि-मता उपयोगी नाहीं असें ते मानतात. मानापमानमधील धैर्यधर केवळ एक लष्करी खाक्याचा आसामी असा अभिनय करणे त्यांना योग्य वाटत नाहीं धैर्यधर अंतःकरणाने भावनाप्रधान दाखविलेला आहे. "प्रत्येक सैनिकाच्या ठिकाणी मला वनमाला दिसते" असं म्हणणाऱ्या धैर्यधराचें अंतःकरण एका उच्च दर्जाच्या प्रेमिकाचें आहे असें दिसून येतें; त्यामुळें सबंध वक्तव्य किंचाळून करावयाचें व पदें ओरडून ओरडून ठासून ठासून म्हणायची या पद्धतीला त्यांनी मुरड घालून 'धैर्यधर' जसा हवा तसाच तसा रंगभूमीवर उभा केला. स्पष्ट शब्दोच्चार, लडिवाळ गायन पद्धति आणि सहज सुलभ रंजक गायन आणि हेंच छोटा गंधर्वांचें वैशिष्ट्यच आहे. वर्षाला १००-१५० नाटकाचे प्रयोग व १०-१२ मैफली यामधून छोटा गधर्व आपली वैशिष्ट्यपूर्ण गायकी मराठी रसिकांना सादर करीत आहेत.

## उत्कृष्ट कवि

छोटा गंधर्व प्रामुख्यानें सौंदर्यवादी आहेत. त्यामुळें त्यांना सर्वांत मृच्छकटिक नाटक अत्यंत प्रिय आहे. त्यात त्यांना सौंदर्यवादी स्थायी-भावाला पोषक असा रसास्वाद खूपच जाणवतो. फावल्या वेळी कविता पदें करण्याचा त्यांना फार मोठा छंद आहे. 'गुणरंग' या टोपण नावानें वेगवेगळ्या रागांतील दीडशेहून अधिक पदें-चिजा त्यांनीं तयार केलेल्या आहेत. त्यांचें काव्य मराठी भाषेत आहे तसेच हिंदी व संगीताच्या 'व्रज' भाषेंतहि आहे. 'देवमाणूस' मधलें "चांद माझा हा हासरा! नाचवी कसा प्रेमसागरा" हे त्यांनी रचलेलें पहिलें मराठी पद होय. अलीकडेच बसविलेल्या 'सुवर्णतुला' नाटकां-तील नारदाच्या तोंडचें एक लोकप्रीय पद त्यांच्याच प्रभावी लेखणी-तून उतरले आहे--

नारायण नारायण। नाम तुझें अतिपावन
कमलापति कमल नयन। भवतारण, भयहारण ॥

तूं धरती, तूंच गगन
तूंच आप, तेज पवन
तूं स्थिति, लय रजनी-दिन
तूंच कार्य, तूं कारण॥

हें उत्कृष्ट पद त्यांच्याच तोडून ऐकताना श्रोते भाविकतेनें अक्षरशः तल्लीन होऊन जातात.

हरीहर ब्रह्म राम गुरुराज
गावत सब तुम रे गुणगान
अगन गगन जल धरति
पवन तुम्ही हो, गुणरगके तुम प्राण

हें सुंदर पद त्यांचेच आहे. तसेंच बिहागमधील त्यांचें खालील पद व्रज भाषेंतलें अप्रतिम ठरलेले आहे--

दृगनवा चपल मृगनवा
दशनवा चमक रही दामनिया
सिंह कटी गजगामनिया
सुरख रूप गुण-रंग गोरो कामनिया

अशा अनंत चिजांपैकीं विविध-रागांतल्या स्वतःच्या चिजाच ते प्रामुख्यानें आपल्या बैठकीत म्हणतात. अशा रसभरीत काव्याला ते अजोड रागाच्या रंजक स्वराचा साज जेव्हां चढवितात तेव्हा त्यांची बैठक आरंभापासून शेवटपर्यंत रगून जाते. परवा सांगलीला झालेल्या त्यांच्या ताज्या बैठकीत त्यानी म्हटलेल्या 'जयत-मल्हार' व 'वसंत-कंस' चा मला कालत्रयीहि विसर पडणें शक्य नाही! त्याचे मुलायम सूर आजहि माझ्या कानात घुमतात.

### अध्यात्मवादाचा अभ्यास

काव्याप्रमाणेंच अध्यात्माचीहि छोटा गधर्वाना अत्यंत आवड आहे. धार्मिक ग्रंथाचें वाचन, पूजा-अर्चा, व्रतवैकल्य यामध्यें ते सदैव निमग्न असतात. प्रतिवर्षी श्रावण महिन्यात ते चुकूनहि नाटकात काम करीत नाहींत; बैठक करीत नाहीत; तीर्थाच्या ठिकाणीं जाऊन अज्ञातपणें अध्यात्मिक उपासना करण्यात ते हा महिना घालवितात. साधारणतः कलावंत व्यसनामध्यें खितपत पडलेला आढळतो; छोटा गंधर्व या बाबतीत अपवाद ठरण्यासारखे सोज्वळ आहेत; इतकेच नव्हे पण आध्यात्मवादामध्यें ते डुबून जातात! ते अतीव मितभाषी आहेत; आपण लहरी आहोंत असं तें स्वतःच एकदके कबूल करतात. त्याना आपल्या लोकप्रियतेचा-मोठेपणाचा गर्व नाही. ते स्वतःला सगीताच्या सदैव उपासक समजतात. भ्रमराप्रमाणे सगीतातील मधुगध वेचण्यात त्यांना निस्सीम आनद वाटतो. एकदा बडोदा ते मुबईचा प्रवास करतांना त्याना डब्यांत दूध विकणारा भोई भेटला. तो पूरब भाषेतली गाणीं गुणगुणत होता. छोटा गधर्वांनी त्याची तेथल्या तेथें दोस्ती केली आणि त्याच्या तोंडातल्या सुदर चिजा हा हा म्हणता हस्तगत केल्या.

### भावी मराठी नाट्यसृष्टी

मराठी नाटयसृष्टीला यापुढे स्थैर्य प्राप्त होईल असें त्यांना वाटत नाहीं. "भोंवतालच्या महागाईच्या परिस्थितीनें सारच काही दुर्मिळ होत चाललं आहे" असें सागून ते याबाबतीत मला पुढें म्हणाले, "पूर्वी ७-८ रुपयाला थिएटर भाड्यानें मिळत असे. आता ३०० रु. भाडें मागतात. सरकारनें करमणूक कर माफ केला हें खरं; पण एवढ्यावर नाटयसृष्टीला बाळसें मुळीच येणार नाही. नाटकाचे दर उतरल्याशिवाय सामान्य माणसाला त्याचा आस्वाद घेता येणार नाहीं; आणि जोंवर महागाई कमी होत नाहीं तोंवर हे दरहि उतरण्याची शक्यता कमी आहे. अलीकडच्या नटाला पूर्वीच्या पगारांत जीवन कठणें अशक्यच आहे, कारण त्यालाहि प्रत्येक ठिकाणीं अधिक पैसे मोजावे लागतातच ना? थिएटरवाल्यांनाहि कमी भाडें परवडत नाही. असें हें महागतेचे दुष्ट वर्तुळ बनलें आहे. हीं कोंडी फुटल्याशिवाय रंगभूमीच्या उद्धाराची आशाच करायला नको." याबाबतीत उपाय सुचवितांना ते म्हणाले, "सरकारनेंच थिएटरे बाधावीत व स्वस्त भाड्यानें उपलब्ध करून द्यावीत. सध्याची जीं सिनेमा थिएटरें आहेत त्यामध्यें नाटकापुरती रंगभूमीची जागा पडद्यामागें ठेवावी; हीं थिएटरें महिन्यातून किमान पाच-सात रात्रीसाठी नाटचसंस्थांना ठराविक भाड्यात देण्याची सक्ती करायला हवी. फार तर सरकारनें अशा थिएटसंना आर्थिक मदत द्यावी; परंतु अमूक इतके दिवस व अमूक इतकेच भाडें अशी बधनें लादली गेली पाहिजेत."

छोट्या गंधर्वांना जुनीं नाटकेंच अतिशय प्रभावी वाटतात. तितक्या अव्वल दर्जाची नाटकें आता लिहिलीं जात नाहींत; तसे नट पुढें येत नाहीत. सगीताची बाजू कमी कमी होत चालली; आजच्या तकलुपी नाटकाचा ससार फार काल टिकेल असे त्याना वाटत नाहीं याबाबतीत एक आठवण सागताना छोटा गंधर्व म्हणाले, "पूर्वीच्या नाटकातील पदे नि पदे लोकाना पाठ असतात. मराठी प्रेक्षक तसे चोखदळ आहेत. एकदा माझी तब्येत बरी नव्हती म्हणून मानापमानातील एक पद गाळले; तों काही रसिक लोक विगमध्यें घोळक्याने आले नि म्हणाले, 'तुमची प्रकृती बरी नसेल तर नाटकातले भाषण करूं नका; पण एखादी खुर्ची टाकून पद म्हणा.' एवढी ही प्रभावी नाटकं आहेत. नि त्यातली पदें परिणामी आहेत. इतक्या तोडीची नवी नाटक उपलब्ध नाहीतच उगीच ओढून ताणून बसविलेल्या एकांकिका, नाटिका आदी जुजबी मामल्याचा नाद सोडून पुनः पुनः तीच नाटकें आम्हाला करावी लागतात; हीदेखील नाटयसृष्टीच्या भवितव्यतेच्या मार्गावरील मुख्य अडचण आहे."

बालगंधर्व, मा. दिनानाथ केशवराव भोसले आदि ख्यातनाम नट व त्याची जुनी गाजलेली नाटकें आणि आत्ताचें छोटे-मोठे नट नि नवी विविध वळणाची नाटकें याच्या सधिकालात छोटा गधर्व उदयास आले आहेत. त्याना मराठी नाटयसृष्टीला आपल्या अपूर्वाईने नटविलें आहे; रसिक श्रोत्याना आजवर एक आगळ्या रजकतेने भरपूर रिझविले आहे. त्यामुळें व टते की, प्रसाद सावकार, सुरेश हळदणकर, छोटा गधर्व, राम मराठे आदींच्या सगीत-नाटयाची परपरा पुढे कोण चालवील? याला उत्तर कोण देणार आहे! परतु एवढे खास की, छोटा गधर्वांना ज्या अडचणी आज समोर दिसतात त्याच्या पारचक्रात फिरत राहून बालाट सृष्टीशी मुकाबला देऊन मराठी नाटयसृष्टी तेज ने तळपण्याची आशा थोडी-फार गैरवाजवीच असे म्हणावें लागेल!

●●●



# दीर्घायुष्य व कायाकल्प

लेखांक : दुसरा

प्रत्यक्ष शारीरिक पीडा किंवा व्यथा सुरू होईपर्यंत जो तो आपण निरोगी आहोंत असें समजतो. दुःखानें विव्हळण्याची पाळी येण्यापूर्वी आपल्या शरीराचा ऱ्हास होत असल्याचीं शेकडों चिन्हें दृग्गोचर होतात तीं अज्ञानानें किंवा निष्काळजीपणामुळें आपल्या लक्षांत येत नाहीं. खालील आरोग्य-अनारोग्याचीं लक्षणें वाचल्यावर तुम्हांला हें पटेल कीं, शास्त्रीयदृष्टचा खरोखर निरोगी व आदर्श प्रकृति असणारी व्यक्ति हजारांत एखादीच निघेल.

अनारोग्याचीं दैनंदिन चिन्हें ओळखून त्यांचे उपाय पीडा किंवा व्यथा सुरू होण्यापूर्वीच करीत गेले तर आयुष्य वाढत राहील. आरोग्याची एक उत्तम दैनंदिन कसोटी आहे ती इतकी अचूक आहे कीं, त्या कसोटीस व्यक्ति उतरेल त्या त्या दिवशीं ती व्यक्ति संपूर्णतया रोगमुक्त आहे असें सांगतां येईल. ही कसोटी जितके दिवस पार पडेल तितके दिवस म्हातारपण व (म्हातारपणानें येणारे) मरण येणार नाहीं. आरोग्याची अंतिम व अचूक कसोटी समजून घेण्यापूर्वी आपण आरोग्य-अनारोग्याचीं अनेक सामान्य व सहज दृग्गोचर होणारीं चिन्हें कोणतीं तें पाहूं.

कोणतीहि व्यक्ती शास्त्रीय चिकित्सक दृष्टीनें रोगी आहे कीं निरोगी हें माणसाचा चेहरा व अंगयष्टी पाहून सांगता येते. आरशांत जो तो स्वतःचेंहि निरीक्षण करूं शकतो. कृश किंवा स्थूल माणसें दोघेही रोगीच. दोघांमही अपचनाचा विकार असतोच. एक अपचनानें कृश कृश तर दुसरा स्थूल स्थूल होत जातो.

वर 'रोगी' हा शब्द मोघम वापरलेला आहे. ज्यांच्या शरीरांत बिघाड वा विकृती सुरू झालेली आहे अशा सर्व लोकांस 'रोगी' म्हटलेलें आहे प्रत्यक्ष त्यांना पोटदुखी, डोकेदुखी, नवज्वर, पक्षाघात, न्युमोनिया, क्षय इत्यादि लहान मोठ्या व्यथा सुरू झालेल्या असोत किंवा नसोत. तो केवळ काळाचा—समयाचा प्रश्न असतो. कित्येक वेळा चांगला 'खणखणीत' समजला जाणारा मनुष्य भोंवळ येऊन निपचित पडतो व मरतो. त्याच्या मृत्यूबद्दल किंवा इतरांच्या नवीन सुरू झालेल्या शरीर पीडेबद्दल जो तो आश्चर्य व्यक्त करतो. अहो अगदीं कालपर्यंत कांहीं नव्हतें. आणि अचानक असें कसें झालें ! असे सगळीकडून उद्गार ऐकूं येतात. परंतु तसें म्हणायचें कांहीं कारण नसतें. शारीरिक बिघाड पुष्कळ पूर्वी झालेला असतो त्याच्या खाणाखुणाहि उमटलेल्या असतात. त्या आपल्याला कळल्यातरी नसतात किंवा कळून आपण त्याकडे दुर्लक्ष केलेलें असतें. शरीर हें अगदीं काटेकोर नियमांनीं बद्ध असें एक यंत्र आहे. तें चालणें किंवा बिघडणें हा जादू नव्हे. म्हणूनच वर 'रोगी' याचा अर्थ ज्या शरीरांत बिघाड सुरू झालेला आहे एवढाच घेतलेला आहे.

## बिघडत चाललेलें शरीरयंत्र

चेहरा पडलेला, तेलकट, त्रासिक दिसणें रोगीपणाचें लक्षण आहे. चेहऱ्यावरील रेषा खोल नसाव्यांत. गाल, डोळे खोलगट दिसूं नयेत. खरोखर निरोगी म्हणतां येईल अशा मनुष्याचा चेहरा सतेज, कातडी नितळ व चेहऱ्यांतून सौंदर्य ओसंडतांना दिसेल. डोळ्यांत तेज व चमक दिसते.

माणूस गौरवर्णी असो वा श्यामवर्णी व नाकाडोळ्यांची ठेवण कशीहि असो तो खरोखर निरोगी असला तर तो सुंदर, तेजःपुंज दिसलाच पाहिजे. आजकाल सगळ्यांचे चेहरे पडलेले दिसतात. यावरूनच ते सर्व रोगी होत. ते रोगी कां, त्यांच्या शरीरांतील मुख्य बिघाड कोणता, तो केव्हां सुरू झाला, ह्या प्रश्नांचीं उत्तरें आरोग्याची शेवटली अचूक कसोटी सांगावयाची आहे त्यांत मिळतील.

पोट खपाटी ( खोल गेलेलें ) असलें पाहिजे. छातीच्या पातळीबरोबर किंवा छातीच्या सपाटीच्याहि पुढें असलेलें पोट रोगीपणाचें लक्षण आहे. अंगावर इतरत्र सूज येऊन अंग पुष्ट दिसूं लागल्यावर आपण जितकें लक्ष देतां तितकें लक्ष छातीवर मात करणाऱ्या पोटाकडे दिलें पाहिजे. असें फुगीर लठ्ठ पोट असतांना अनेक पीडा सुरू होतात. म्हातारपण येतें. किंवा मृत्यू ओढवतो यांत नवल नाहीं

# तुम्ही निरोगी आहांत काय ?

पु. ना. ओक

'लठ्ठ' पोट केवळ अगडबंब व्यक्तीचेंच असतें असें कोणीं समजूं नये. कृश मनुष्याचेहि छातीच्या सपाटीबरोबर किंवा त्याहून वर असणारें पोट लठ्ठच म्हणावें लागेल.

थुंकावें लागणाऱ्या व्यक्ती रोगी असतात. खरोखर निरोगी माणसाला कधी थुंकावेसे वाटणार नाही. थुंक तोंडांत आली तर थुंकणें योग्यच. तें रोगाचे लक्षण म्हणून लाजेखातर ती तशीच दडपणें योग्य नव्हे. परंतु थुंकावें लागत असल्यास बिघाड सुरूं झाल्याचे उमजून त्याचा उपाय केला पाहिजे. तोंडास घाण यणारा माणूस निरोगी नसतो.

आरोग्य उत्तम असतां माणूस घोरत नाहीं. कित्येकांस आपण झोपेत घोरतो हें लक्षात येत नाहीं. परतु तुम्हीं झोपेत घोरतां कां हें आप्तेष्टांस मनमोकळेपणें विचारा. घोरत नसल्यास तुम्ही निदान आरोग्याची ही एक कसोटी उतरलात असें समाधान अवश्य माना. अस्पष्ट कां होईना घोरणें सुरूं होतें त्या दिवशी शरीराचा ऱ्हास होत असल्याचा स्पष्ट इशारा तुम्हाला दैवाने दिलेला असतो. घोरावे लागूं नये असे उपाय सुरू झाले पाहिजेत.

उठतां बसतांना "आई आई ग ..अरे रामारे...अरे देवा देवा" असे उद्गार निघत असल्यास शरीराचा ऱ्हास होत आहे हें जाणावें. लवकर थकवा यणें, उन्हातान्हाचा त्रास जाणवणें, थोडे श्रम करताच धापा टाकाव्या लागणें ही रोगीपणाची अनेक लक्षणे होत.

कानातून नेहमी पूं वाहणें, व झोपेंत तोंडांतून लाळ गळणें ही अशक्तपणाची म्हणजेच शारीरिक बिघाडाची चिन्हें होत. वारंवार ढेकरा व शिंका येणें या बिघडलेल्या शारीरयंत्राच्या किंचाळ्या होत. खाकरे येणे, घशांत नेहमीं कफ असल्यासारखा वाटणे, फिटस् व चक्कर येणें, दृष्टि व कर्णेंद्रिय अधू होणे ही शरीर घसरगुंडीस लागल्याची लक्षणे होत.

हाता पायाचे तळवे नेहमी गुळगुळीत असावेत, ते जर खरबरीत होऊ लागले असतील किंवा त्याना भेगा पडूं लागल्या असतील तर ताजें जिवत रक्त शरीरात निर्माण होत नाही व तेथपर्यंत पोंचत नाही असें समजावें. पुन्हा हातापाय चे तळवे पूर्ववत मृदु करण्याच्या खटपटीस लागावें. पायाच्या आगठ्याच्या व बोटाच्या पुढल्या बाजूसहि कातडी मऊ व कोरी किंवा मळकट व सुरकुतलेली होत आहे तें जाणवतें तसेंच टाचेच्या बाजूसहि दिसून येतें.

पुरुषांस श्मश्रू ( दाढी ) केल्यावर जर गालांवर आग होत असेल तर त्यावरून शरीरात पुरेसे रस निर्माण होत नाहींत हें सिद्ध होतें. सामान्य म नवी व्यवहारांत शरीरांची जी जी झीज होते ती तात्काळ भरून काढणारे अनेक रस व इतर पदार्थ आपल्या शरीरांत तयार होत असतात. त्वचेला मृदु व तकतकीत ठेवणारा रस जर अत्यल्प प्रमाणात तयार होऊं लागला तर दाढी केल्यावर गालावर आग होतें. त्याचें प्रत्यतर म्हणजे अपचनाचा विकार असणाऱ्या व्यक्तीस व इतरास आजारीपणांत किंवा आजारांतून उठल्यावर तशी आग झाल्याचें विशेष लक्षात येते.

### यमाचा पांढरा झेंडा

केस पांढरे होऊं लागतांच यमानें पांढरा झेंडा आपल्या शरीरावर रोंवला असें समजून त्याचा सर्वप्रकारें प्रतिकार करण्याच्या तयारीस लागलें पाहिजे. सळसळणाऱ्या निरोगी रक्ताचा शरीरात सर्वत्र सचार असेपर्यंत शरीराचा भगवा ध्वज ओठावर, गालावर व कातडीवर चमकत असतो. विजयाचें तेज डोळ्यात दिसतें, केस पांढरें होताच आपण यमाला शरण जाण्याची तयारी चालविली आहे हें प्रत्येकानें ओळखावें. कारण पाढरा हा शरणागतीचा झेंडा असतो. आजकाल अल्पवयीन किंवा तरुण लोकांचेंहि केस पाढरे होतात. म्हणून वयोमानाचा व केस पांढरे होण्याचा विशेष सबंध येत नाही. अनेक रस व रसायनें तयार होणाऱ्या आपल्या शरीरातील भट्टीत केसांसाठी काळा रग तयार करणारी भट्टी बद पडली हें ओळखून ती भट्टी पुन्हा चालूं करण्याचा चंग बाधला पाहिजे. यत्रें शरीरांत शाबूत असतांतच. ती केवळ बिघडून बधीर व शिथिल झालेलीं असतात वय काहीहि असो योग्य उपाय केल्यानें पुन्हा पूर्ववत् केस काळे झालेच पाहिजेत.

वारा सरणें अथवा पादणें हा मृत्यूचा भोंगा म्हटला पाहिजे. युद्धकालात शत्रूची विमानें हल्ला करण्यास येऊ लागल्याचा इशारा एका मोठ्या भयसूचक भोंग्याद्वारें देण्यात येई. तितकाच भयसूचक हा शारीर विकृतीचा भोंगा असतो. जितका बिघाड जास्त तितक्यां अधिक वेळा दिवसांतून वारा सरतो. म्हणूनच ज्याना वृद्ध समजतात किंवा वृद्ध दिसतातजे त्याचे बाबतीत हा विकार व प्रकार बळावलेला दिसतो.

शारीरयंत्र नीट काम करीत नसल्याची दुसरी एक खूण म्हणजे पांढरी व चरबरीत जीभ. पोटातील परिस्थिती दर्शवणारी जीभ हा एक

आरसा आहे, अर्थात विडा, गूळ किंवा लाल पेपरमिंटची गोळी खाल्ली तर हा आरसा तात्पुरता खोटा पाडता येतो. जेवण झाल्यावरहि कित्येकाची जीभ लाल दिसते. प्रात:काली शौचास जाण्यापूर्वीहि जर जीभ नेहमीं लाल असली तर तें आरोग्याचें लक्षण असते. पोटातील आरोग्य हें निर्मल कातडीतून तांबडया रक्ताच्या आरक्त छबीच्या रूपाने ओसडतांना दिसेल.

अंथरुणावर पडतांच चार-पाच मिनिटाच्या आत झोप लागणे ही चांगल्या प्रकृतीची खूण आहे. झोप शांत व गाढ लागली पाहिजे. झोपेच्या कालाविषयी व उपयुक्ततेबद्दल वगैरे पुढें सविस्तर विचार करूं. तूर्त एवढेंच सांगणे पुरे होईल कीं, सतत ६–७ तास अखंड गाढ झोंप लागणे हें आरोग्याचें एक महत्त्वाचे लक्षण आहे.

मेंदू बधीर होऊन वाचण्या-बोलण्याकडे लक्ष न लागणें, एखाद्या गोष्टीचा सुसगत विचार करताना विचार प्रवाह खंडीत होणें, स्मृति कमी होणें हें मेंदूस पुरेश्या ताज्या रक्ताचा प्रवाह होत नसल्याचें लक्षण आहे. खरोखर निरोगी व आदर्श आरोग्य असलेल्या माणसाचा मेंदू तिक्ष्ण व जाग क असला पाहिजे.

वर सांगितलेलीं लक्षणें कोणीहि मनुष्य निरोगी आहे कीं नाही हें सांगण्यास पुरेशीं आहेत. तशा तऱ्हेची आणखीहि अनेक लहान लक्षणें सागतां येतील. उदाहरणार्थ निरोगी माणसास दिवसातून दोन–तीन वेळां नैसर्गिक ( साधे पदार्थ खाण्याची ) भूक व तहान लागली पाहिजे. वजन इंचास सुमारे दोन पौंड असावें. डोळयाच्या खालच्या खाचांत आरक्तपणा असावा. ( फिकेपणा असू नये. ) शौचास दिवसातून एकदा तरी घाई लागली पाहिजे. परंतु दोन पेक्षा अधिक वेळी जावें लागूं नये.

परतु वरील सर्व कसोटयात किंवा चिन्हांत शास्त्रीय निश्चितता किंवा काटेकोरपणा नाही. उदाहरणार्थ, भूक किती जोरात लागली पाहिजे ? अथरुणावर पडल्यावर पाच मिनिटांच्या आत गाढ झोंप लागत नसली परतु १० मिनिटात झोप लागत असली तर त्या व्यक्तीचें आरोग्य चागलें आहे का ? शिवाय चेहरा पडलेला दिसणें इत्यादि लक्षणात बिघाड कोणत्या दिवशी सुरू झाला हे सागणें अशक्य होतें. अनेक दिवसाच्या बिघाडामुळें हा अनिष्ट परिणाम झालेला आहे एवढेंच सागता येते. अमक्या एका दिवशी शारीरयंत्रात विकृति सुरू झाली हें कळणारे प्रमाण उपलब्ध नसतें तर आयुष्य वाढविण्याच्या व आदर्श शरीरप्रकृती राखण्याच्या बाबतीत मोठीच अडचण निर्माण झाली असती. कारण आदर्श शरीरप्रकृति झाल्याचें व त्या पातळीवर प्रकृती सतत टिकवण्याचे प्रमाणच आपल्याजवळ नसतें तर आपल्या प्रयत्नाचे उद्दिष्ट, ध्येय किंवा लक्ष्य नसल्याने शरीरसंवर्धन हा 'आधळया कोशिबिरीचा' खेळ झाला असता. सध्याचे तें प्रमाण बहुतेकास माहित नसल्यानें शरीरसंवर्धन हें व्यायामशाळातून सुद्धा अदाजपक्की व हुकेलप्पी पद्धतीने होत असतें.

## आदर्श आरोग्याची दैनंदिन कसोटी

आदर्श आरोग्याची दैनंदिन कसोटी म्हणजे विशिष्ट प्रकारचे मलविसर्जन. भाताच्या मुदी पाडताना आपण पाहतों की मूद जर हुबेहूब वाटीच्या आकाराची पडली तर वाटीत एकहि शीत चिकटलेलें नसलें पाहिजे. म्हणजेच वाटी स्वच्छ असली पाहिजे हें वाटीचा आंतला भाग न पहाता आपण सांगू शकतो. आपल्या पोटांत ज्या नलिकेंत मल साठतो ती नलिका एका मोठया पोकळ फुकणीप्रमाणें आहे. यातून बाहेर पडलेल्या मलाच्या मुदी नलिका छाप्याच्या पाहिजेत. फरक एवढाच की मलविसर्जन स्नायूच्या उघड–झांक उघड-झांक क्रियेमुळें त्या मुदीचा मागील भाग निमूळता असतो. शौचास बसल्यापासून लागोपाठ अशा तीन–तीन मुदी अवघ्या दोन–तीन मिनिटात पडून नि:शेष मलविसर्जन झालें पाहिजे. गाजर किंवा मुळयाप्रमाणे मुदी पुढल्या बाजूनें भरीव गोल व मागल्या बाजूस निमुळत्या असाव्यात. मुदीचा रग अंमळ पिवळसर ( पित्ताचा रंग असतो त्या छटेचा ) असला पाहिजे व मुदी थोडया ओषट दिसल्या पाहिजेत. अशा प्रकारचें मल विसर्जन झाल्याची दुसरीही एक अनुषंगिक खूण म्हणजे गुदद्वाराचा भाग धुण्यास जवळ जवळ पाणी लागतच नाही असें म्हटले तरी चालेल कारण नि:शेष मलविसर्जन झाल्यानें तो भाग लडबडत नाहीं.

मुदीच्या आकाराप्रमाणे रगहि महत्त्वाचा आहे. हिरवी भाजी खाल्ली म्हणून हिरवी शौचाला झाली असे आदर्श स्थितीला शारीरयंत्रांत होत नाही. खाल्लेल्या अन्नांतील पूर्ण सत्वांश शरीरात मुरू शकला नाही हे त्याचेवरून सिद्ध होतें. पोटांत गेलेल्या अन्नाचे सर्व सत्वांश ओढून घेतले जात नसले तर तें शारीरयंत्र नादुरस्त आहे असेंच म्हणावें लागेल. अन्नाचा वर्ज्य भाग हा पाचक रसांच्या क्रिया प्रक्रियानीं शारीराच्या निरनिराळया दालनांतून पिवळा रंग घेऊनच बाहेर पडला पाहिजे.

मुदीस ओशटपणा असावा हें वर सांगितलें आहे. भाताच्या मुदी पाडताना किंवा छापाचे गणपती पाडताना आपण वाटीस तुपाचा हात व छापास तेलाचा हात लावतो. तसें केल्यानेच मूद वा छाप बरोबर पडतात. तसें केले नाही तर छाप वा मूद विस्कळित होईल. म्हणजेच भात किंवा माती ही वाटींत किंवा छापात चिकटून राहील.. मलाच्या मूदीस जर जठरातून ओषटपणा लाभला तरच त्या योग्य आकारस्वरूप घेऊन बाहेर पडतात. म्हणूनच प्रत्येकाचे आहारांत भरपूर दूध, दही किंवा लोणी असणें अत्यावश्यक असतें हें ओघानें आलें. तेल किंवा इतर ओशट वस्तूंनीं हा कार्यभाग साधत नाहीं. कारण दुधदुभत्या इतका तेलांतील ओशटपणा शोषून घेण्यासारखी शारीरयंत्राची घडण नाहीं. मग दिवसभर दुधाची जागा चहा-कॉफीनें भरून काढणाऱ्या लोकांच्या शारीरयंत्राची स्थिति किती केविलवाणी होत असेल ?

प्रकृति उत्तम असताना किंवा ऐन तारुण्याच्या भरांत प्रत्येकास असेच मलविसर्जन होते तसे मलविसर्जन होत राहिल्यास म्हातारपण येण्याचें काही कारण नाही. आपले आरोग्य उत्तम आहे असा दावा करणाऱ्याचें आरोग्य असे मलविसर्जन होत असल्यासच उत्तम असल्याचें मानावें आदर्श आरोग्याची हीच उत्तम, अंतिम व दैनंदिन कसोटी आहे. असे मलविसर्जन होणार नाही नेमका त्याच दिवशीं शारीरिक बिघाड सुरू झाला, ऱ्हास सुरू झाला व मृत्यूने आपले निशाण रोवलें असे समजावें. आपणास पोटदुखी, डोकेदुखी इ. काही पीडा होत नसून आपण चैनीनें फिरत आहोत म्हणून आपले आरोग्य उत्तम आहे अशी भ्रामक कल्पना त्या व्यक्तीने अथवा त्याच्या नातेवाईकांनी करून घेऊ नये. बोटावर शुद्ध वरणभाताचें खरकटें दोन चार दिवस सतत राहिलें तर फोड होऊ लागतात. तर वर्षानुवर्षे विस्कळित

शौच्याला झाल्यानें शरीरात विष्टेसारखा अत्यंत दुर्गंधी व किळसवाणा पदार्थ रोज पायलीभर तरी सांठत असतांना डोकेदुखी, पोटदुखी, थकवा, खोकला, अपेंडिसायटिस, मधुमेह, जलोदर, क्षय, कॅन्सर, गंडमाळा किंवा नुसते केस पाढरे होणें, कंबर वाकने, मासल भाम लोंबणें आदि व्यथा व विकृति होतील व होतात. यांत कांहीं नवल नाही. उलट आश्चर्य वाटल तर ते शारीरयंत्राच्या सहनशीलतेचें मानले पाहिजे. रोज पायली पायलीभर घाण सां वूं लागल्यापासून माणूस ३०–४० वर्षं तरी कसा जिवत राहातो. टॉयफाईड वगैरे सर्व आजार व हृदय एकाएकीं बद होणें हें शरीरात रोज साठणाऱ्या घाणीमुळें होतात. हवाबदल झाल्यानें आजार आला किंवा हवा बदल केल्यानें आजार गेला अशी कोणी कल्पना करून घेऊं नये.

## मुख्य दिशेनें संशोधन व्हावें

बाहेर न पडलेली विष्टा वाळून चिळून शरीराच्या निरनिराळया भागात अनेक रसांच्या सहाय्याने ओढली जाते. ती घाण कातडीकडे येऊ लागली तर कातडी काळी व खरबरीत होते, भेगा पडतात किंवा इसब, नायटे, खरूज होते. ती घाण solid, liquid of gaseous म्हणजे घन द्रव किंवा वायु अशा तीन्ही रूपानें अगात सचरत असते. रोजचा मल ज्या नळीच्या तळाशी साचतो. तेथें शिळी घाण राहून चालत नाही. तिला तेथून धक्के मिळाल्याने ती शरीराच्या अन्य भागांत शिरकाव करून घेते. याच घाणीचे कण अडकून थ्रांम्बोसिस म्हणजे शरीरयंत्रणेंत अटकाव सुरू होऊन हृदय एकाएकीं बंद पडतें. किंवा पक्षघात होऊन स्नायूंवरचा ताबा नाहीसा होतो. केसाना काळा रंग येण्याची क्रिया याच घाणीनें थांबतें. मेंदूच्या निरनिराळया भागावर ही घाण जाऊन पोंचली कीं, दृष्टि अधू होते किंवा बहिरेपणा येतो. अपेंडिक्सवर याच घाणीची पुटें चढून तें सडू लागलें कीं वेदना होतात, व तें कापणे भाग पडतें. घशात किंवा पोटांत एकाद्या विविक्षित नाजूक स्थळीं या घाणीतील कृमीकिटक घर करून राहिले कीं कॅन्सर, क्षय, सग्रहिणी गंडमाळासारखे रोग सुरू होतात. म्हाताऱ्या माणसांच्या मेंदूत पाढरी भुकटी रंध्रारध्रांत विखुरलेली सापडते. असें म्हणतात. ती याच घाणीची.

इकडे पोटात घाण सांठत राहू देणें व तिकडे टायफाइड, कॅन्सर आदि रोगांचें उपाय शोधीत रहाणें म्हणजे विरलेल्या चिरगुटास ठिगळ लावणें होय. वर सांगितल्याप्रमाणे जिशेष मलविसर्जन होण्याकडे व्यक्तीनें व समाजानें लक्ष दिलें जर जगातील शारीरपीडा व अनेक रोगाचें प्रमाण हीं जादूची कांडी फिरविल्याप्रमाणें एकदम कमी होईल व आयुर्मान एकदम वाढेल. शारीरदृष्टया आयुष्य सुखी व समाधानाचें होईल.

एरवीं शरीरांत घाण सांठत आहे हें माहित असूनहि कॅन्सर, टायफॉईड अशीं काहीतरी नावें देऊन त्यावर सशोधन करूं पहाणें हें तर्कशक्तीस पटणारें नाहीं. पारा ज्याप्रमाणें इकडून धरूं लागले तर तिकडून निसटतो त्याप्रमाणें ही घाण एकावेळी आपण ज्या नांवानें संबोधतो त्या एकाच रोगाचें रूप धारण करील असें नाही. आपण कॅन्सरचा उपाय करीत राहिलों तरी ती थ्रांबोसिस, वांत्या, हगवण, सधिवात, ज्वर अशा कोणत्याही रूपानें शरीराचा फन्ना पाडील. घाणीतून कोटयांवधी जतू अनेकप्रकारें शारीरपीडा करीत असतात. आपण त्यांच्या स्थूलपीडेस एक स्थूल नांव देऊन उपाय करतो तें बरोबर नव्हें. कॅन्सर म्हणून तुम्ही उपाय करूं लागला तरी रोज साठणाऱ्या घाणीनें रक्ताचें पाणीसुद्धां होऊ लागेल. आभाळच फाटल्यावर ठिगळें लावणें समजसपणाचें होणार नाहीं. म्हणून सर्व रोगांचा अंतिम उपाय म्हणजे मलविसर्जनाची क्रिया रोजच्यारोज आदर्श होत राहील अशी व्यवस्था करणे होय. तारुण्यहि त्यानेंच टिकते. असें मलविसर्जन होत राहील. शरीराच्या आंतून उद्भवणारे रोग होणार नाहींत व म्हातारपण येणार नाहीं. मग जीर्णत्वानें येणाऱ्या मरणाचें तर नांवच नको. आयुष्य वाढविण्याची इच्छा करणाऱ्यांनीं, वृद्धत्वातून पुन्हा तरूण होण्याची इच्छा असेल त्यानीं आपल्या शरीरांतील मलविसर्जनाची क्रिया वर वर्णिल्याप्रमाणें आदर्श करण्याचें ध्येय ठेवावें म्हणजे त्यांचा उद्देश साध्य होईल.

●●●


**समाज प्रबोधन संस्था**

१२४२, सदाशिव पेठ, पुणे २.


| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोलकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २.६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठी आचारसंहिता : सं. निबध | २·०० |
| अतरीक्ष प्रवास : ना. वा. कोगेकर | २·०० |

**पांढरे डाग**

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवूं.

नकली वैद्यांपासून सावध राहावें.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन माणू.
मु. पो. मंगरूळपीर. जि. अकोला महाराष्ट्र.



# ★ प्रेमपत्र ★

## भुरटा मजकूर आणि शिवाय नॉटपेड !

कविता आणि अरुण ★ → साधना आणि शशिकपूर

"लव्ह लेटर्स" नांवाचा एक इंग्रजी चित्रपट कांहीं वर्षांपूर्वी येऊन गेला. या बोलपटाचं संपूर्ण कथानक आतां नीटसं आठवत नाहीं. युद्धावर गेलेल्या दोन सैनिकांची ती कथा होती. एका सैनिकाला युद्धावर असताना आपल्या प्रेयसीला प्रेमपत्र पाठविण्याचा विचार सुचतो. पण त्याला पत्र पाठविण्याचा विशेष सराव नसल्यामुळें तो आपल्या एका सैनिक मित्राकडून प्रेमपत्रं लिहून घेतो. याचेंहि त्याच मुलीवर प्रेम असते, परंतु तें अनुच्चारित असतें. त्या पत्रांतील सौंदर्यावर ती तरुणी अतिशय प्रेम करूं लागतें. युद्ध संपतं. सैनिक परतात. तो सैनिक आपल्या मैत्रिणीला भेटायला जातो. प्रेमपत्रातील वाक्य न् वाक्य तिच्या हृदयात कोरलं गेलेलं असतं. ती त्या पत्रांतील भाषेंत त्याच्याशीं बोलण्याचा प्रयत्न करते पण त्या सैनिकाला कांहींच उलगडा होत नाहीं, कारण तीं सारीं पत्रं त्याच्या मित्राकडून त्यानें लिहून घेतलेलीं असतात. अखेर त्याच्या लक्षांत येतं, कीं त्या तरुणीचं प्रेम ज्या व्यक्तीनें पत्र लिहिलीं त्याच्यावर केंद्रित आहे. अखेर त्या सैनिकाच्या मित्राचं आणि त्या तरुणीचं मीलन होतं.

'प्रेमपत्र' हा चित्रपट पाहायला जातांना मला या चित्रपटाची आठवण येत होती. निदान या चित्रपटासारखा काहींतरी चांगला चित्रपट पाहायला मिळेल ही अपेक्षा होती, पण चित्रपट पाहातांना मनाचें समाधान होत नव्हतें. उणीवाच भासत होत्या. बिमल रॉय यांच्या दिग्दर्शनावर हवाला ठेवून जाणाऱ्या असंख्य प्रेक्षकांची हीच अवस्था होते, असंच म्हणावं लागेल, कारण यापूर्वी दिग्दर्शित केलेल्या 'परीणिता,' 'काबूलीवाला,' किंवा 'परख' या चित्रपटाच्या आसपासहि हा चित्रपट पोहचत नाहीं.

### कथानक

चित्रपटाचा नायक अरुण ( शशिकपूर ) हा मेडिकल कॉलेजचा हुशार विद्यार्थी. कॉलेजच्या शेवटच्या परिक्षेंत तो प्रथम श्रेणीत पहिल्या क्रमांकानें उत्तीर्ण होतो हें निराळें सांगणें नकोच. त्याला परदेशी जाण्याची शिष्यवृत्ती पण मिळते. याच सुमारास त्याच्याच कॉलेजमधील कविता कपूर ( साधना शिवदासानी ) नांवाच्या सुंदर मुलीशी त्याचा परिचय घडून येतो. हॉस्पिटलमधील एका पेशंटचें डॉ. अरुण ऑपरेशन करतो, त्या निमित्तान कवितेचा आणि त्याचा परिचय वाढतो. दुसऱ्या दिवशी अरुणनें ऑपरेशन केल त्याप्रसगीं कविता त्याला असिस्टंट म्हणून होती ही बातमी कॉलेजांत पसरते. कॉलेजच्या नोटीस बोर्डावर कुणीतरी चावटपणानं लिहून ठेवतो की, "अरुणनें काल दोन ऑपरेशनस् केली. त्यातलं एक यशस्वी झालं पण दुसरं हृदयाचं ऑपरेशन केलं तें यशस्वी झालं की नाही हें मात्र समजलं नाही." या प्रकरणामुळें अरुण आणि कवितेच्या नांवाचा बराचसा अपप्रचार होतो. तो अरुणची बहीण रत्ना ( कु. खोटे ) हिच्या कानावर जातो. परतु यापूर्वीच तिनें कवितेला अरुणच्या नावानें एक प्रेमपत्र पाठविलेलं असत, तें कॉलेजातील विद्यार्थिनीच्या व नंतर कवितेच्या हातात पडतं. ती त्या पत्रामुळें चिडते व तें पत्र कॉलजच्या प्रिन्सिपॉलच्या हवालीं करते. प्रिन्सिपाल, अरुणच्या ह्या दुर्वर्तनामुळें त्याची परदेशाची शिष्यवृत्ती रद्द करतात.

अरुण निराश मनानें गावी परत येतो. तेथील एक श्रीमंत गृहस्थ ( विश्वास कुटे ) त्याला इंग्लंडला जाण्यासाठीं पैसे देतात. पण त्याचा मोबदला म्हणून त्यांच्या तारा ( सीमा ) नावाच्या मुलीशीं लग्न करायचे ही त्याची अट असते. ताराला न पाहाताच अरुण ती अट मान्य करतो, व इंग्लडला रवाना होतो. ज्या मुलीशीं वाङ्निश्चय झालेला असतो ती कवितेची मामेबहिण असते. आपल्या खेडवळ मुलीला शहरांतले सस्कार घडावेत म्हणून ताराला तिचे वडिल आपल्या बहिणीच्या घरी–म्हणजे कवितेच्या आईकडे आणून ठेवतात. अरुण इंग्लडहून ताराला पत्र लिहितो या पत्राला काय उत्तर द्यायचं हें ताराला समजत नाही, ती तें पत्र कवितेच्या हवाली करते. व तिलाच उत्तर लिहिण्यास सागते. अरुणच्या पत्राला कविता 'तारा' या नावानं उत्तर धाडते. अरुण आणि कवितेचा 'तारा' या नावाखालीं पत्रव्यवहार सुरू होतो या कवितारूपी ताराच्या प्रेमपत्रांवरून अरुणचें ताराविषयीचें मत सपूर्णपणे चागले होते. कवितेला तो विसरू लागतो. या प्रेमपत्रातील अलकारिक भाषेमुळें अरुणच पत्रलेखिका तारेवर प्रेम बसत तो तिला पाहाण्यास, भेटण्यास अतिशय आतुर होतो, पण इंग्लडमधील आपला अभ्यासक्रम पुरा करीत असताना अरुणला लॅबोरेटरीत ( प्रेमपत्र वाचीत असताना अवधान न राहिल्यानें ) अपघात होतो, व त्यातच त्याचे डोळे जातात. आपला शिक्षणक्रम अर्ध्यावरच सोडून अरुण हिंदुस्थानात परततो. कविता त्याची नर्सिंग-होममध्यें व्यवस्था करते व आपण तारा आहोंत अशी बतावणी करून त्याची शुश्रुषा करते. अरुणच्या डोळयावर शस्त्रक्रिया केली जाते व त्याचे डोळे येतात. ज्या दिवशी त्याच्या डोळयांवरची पट्टी काढायची असते. त्या दिवशीं कविता निघून जाते व ताराला तिच्या जागी हजर करते. आपली शुश्रुषा करणारी ही तारा नव्हे हें त्याच्या लक्षांत येतं. तो 'तारा'ला हाका मारतो, कविता येते. कविता हीच तारा हें त्याच्या लक्षांत येतं. व कविता–अरुणच मिलत होतं. हें मीळल अधिक सोपें व्हावें म्हणून तारा अधुनिकता शिकता शिकता एका अफ्रिका रिटर्नड् घाडशी तरुणाच्या ( सुधीर वर्दे ) प्रेमांत सांपडतें व त्यामुळें तीदेखील अरुणबद्दल फारशी विवंचना करत नाहीं.

### कथा–संवाद–पटकथा

या चित्रपटाची पटकथा व संगीत सलील चौधरी यांचें असून संवाद राजेन्द्रकृष्ण याचे आहेत. मूळकथा भट्टाचार्य याची आहे. पटकथा अत्यत सदोष असून संवादांतहि फारशी चमक नाही. अरुणची बहीण रत्ना चित्रपटाच्या पहिल्याच देखाव्यात 'प्रेमपत्र कसे लिखें' हें पुस्तक वाचीत असल्याचें दृष्य आहे. हीच बहीण कवितेला अरुणच्या नांवानें प्रेमपत्र पाठविते. प्रेमपत्र कशी लिहावीत. हें पुस्तकी ज्ञान प्रयोगदाखल ती अरुणच्या नांवानें पत्र लिहून कपाला लावते. पुढे ही रत्ना प्रेमपत्र आपणच पाठविल असा खुलासा कवितेला करते. ज्या प्रेमपत्रामुळें प्रिन्सिपॉलनी अरुणची इंग्लडची शिष्यवृत्ती रद्द केली. त्या प्रिन्सिपॉलजवळ मात्र हा खुलासा ती कां करत नाहीं हें समजत नाहीं. तसेच प्रिन्सिपॉलनी खुलासा विचारल्यावर हे प्रेमपत्र आपण लिहिलेलें नसून आपल्या बहिणीनें लिहिले आहे असा खुलासा न करतां तो गप्प राहातो हे फारसे सयुक्तिक वाटत नाहीं. प्रेमपत्र जरी बहिणीने लिहिले तरी त्यात व्यक्त झालेली भावना आपलीच आहे असें काही कारण सुचविलेले असल्यास तें नीटसें


महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति
मंडळ पुरस्कृत ग्रंथ क्र. १


**गुजराथेंतील मराठी राजवट**

वि. गो. खोबरेकर

मूल्य सात रुपये

**राजहंस प्रकाशन**

४१९ नारायणपेठ, पुणें २.



"प्लीज ! गरीबावर दया करा. हे सर्व दागिने घेऊन जा.
मूळांत ते १४ कॅरेटचेच होते असें कळलें तर
बायको आतां माझा जीव घेईल."
शरद् अभ्यंकर

प्रेक्षकांच्या गळीं उतरत नाहीं. अरुणला इंग्लंडमध्यें अपघात होतो व त्याला अंधत्व येतें; तो हिंदुस्थानांत परत आल्यावणर त्याचे मानलेले आईवडील, त्याला इंग्लंडला जाण्यासाठीं पैसे देणारा त्याचा भावी सासरा व वाग्दत्त वधू ज्या बहिणीच्या प्रेमपत्रामुळें साऱ्या चित्रपटाचा डोलारा रचला गेला ती बहिण, ही सर्व अरुणला कधींच भेटत नाहींत. त्यापैकीं कुणी मेलेले दाखविलेले नसल्यामुळें तीं जिवंत आहेत यापलिकडे प्रेक्षकांना कांहींच कळत नाहीं. त्याला प्रेमपत्र लिहिणारी कवितरुपी ताराचं फक्त काय ती त्याची एका निसर्गरम्य नर्सिंगहोममध्यें शुश्रुषा करते. अरुण इंग्लंडहून परत आल्यापासून तों चित्रपटाच्या शेवटच्या देखाव्यापर्यंत अरुणची ही नातेवाईक मंडळी अदृश्य राहातात व शेवटीं कविता–अरुणला आशी दि द्यायला प्रगट होतात. ज्या प्रेमपत्रांच्याभोंवतीं कथेची गुंफण करायला पाहिजे होती ती बाजूला राहून फक्त अरुण–कवितेचें नर्सिंगहोममधील प्रियाराधन यांतच कॅमेरा खर्च केला गेला आहे. हें प्रियाराधन साधनेचा गोड चेहरा आणि शशिकपूरचें तारुण्य यामुळं फारसें खटकत नाहीं हेंच समाधान. हें सर्व चालू असतांना तारा व तिचा शिकारी प्रियकर यांचेहि प्रणयप्रसंग चालू राहातात. प्रेक्षकांवर पकड न बसतां एक भरकटलेलं कथानक आपण पाहात आहोंत याची प्रेक्षकांना वेळोवेळीं जाणीव होते.

### अभिनय

अरुणचें काम शशिकपूर यांनीं केलें आहे. त्यांच्या कामांतला नवखेपणा व बुजेरपणा जाणवतो. साधना हिनं नायिका कविता कपुर हिचं काम उत्कृष्ट केलं आहे. फारसं न बोलतां चेहऱ्यावरच्या अभिनयानं प्रेक्षकांना सारं सांगण्याचं कसब तिच्यांत आहे. मराठी चित्रपटांत काम करणाऱ्या सीमानं यांत काम जरी चांगलं केलं असलं तरी साधनेचें सौंदर्य खुलविण्यांत जेवढे श्रम खर्ची पडले त्याच्या निम्मेहि या अभिनयकुशल नटीवर खर्ची पडलेलें नाहींत. हें लक्षांत येतें. बाकीच्यांचा विशेष उल्लेख करावा असं कुणालाचच काम नाहीं सुधीर वर्दे यानें आपलें काम नोट केलें आहे. परंतु त्या भूमिकेला कणा नाहीं. कु. खोटे हिच्या अंगावरचा स्कर्ट जाड तक्क्यावर अभ्रा चढवावा तसा बेढब वाटतो. तिच्या स्थूलपणांतला उठाव आणणारा हा वेष टाकला असता तर तिचें व चित्रपटाचे असलेलें थोडें-फार सौंदर्य खुललें असते. संवाद व पटकथा ही सदोष व ठिसूळ असल्यामुळें बिमल रॉय यांच्या दिग्दर्शनाची चमक कुठेंच दिसत नाहीं. बिमल रॉय यांच्यासारख्या चांगल्या प्रतीच्या दिग्दर्शकानें चांगल्या मूळ कथेची अशी माती कां करावी ? संगीत सलील चौधरी यांचे असून तें गीताला व प्रसंगाला साजेसें आहे एक-दोन गाण्याच्या चाली नव्या वाटतात. छायाचित्रण दिलिप गुप्त याचें असून तें अत्यंत बहारदार आहे. या चित्रपटाला बराचसा जिवंतपण आला आहे. तो छायाचित्रणामुळेंच. बाह्य देखाव्यांत चंद्र, माडाचीं झाडें, आकाश हीं खरोखरच चित्रित केलीं आहेत. डोळ्यांना सर्व चित्रपट अत्यंत सुखकारक वाटतो. मळ कथा हळुवारपणें हाताळायला हवी होती. असा चित्रपट यशस्वी होण्यास हाताळायला प्रभावी भाषाशलीचे उत्कृष्ट संवाद असायला हवेत.

गल्ल्यावर लक्ष न देतां फालतू उपकथानकें आणि अचाट विनोद याना रजा मिळायला हवी. डोळे जाणें, पुन्हां डोळे येणें असले बोजड हास्यास्पद प्रसंग वगळावयास हवेत. हे सर्व 'परिणीता,' 'परख' च्या दिग्दर्शकाला अगम्य होते असेंहि नाहीं. म्हणूनच शांतारामांच्या उत्तरार्धाप्रमाणें बिमल रॉय यांचाहि उत्तरार्ध सुरू झाला काय या शंकेनं मन व्यथित होतें. इतर धांगडधिंग्याच्या पंधरा हिंदी चित्रपटांहून हा चित्रपट उजवा असला तरी बिमल रॉय यांच्या आजवरच्या चित्रपटांत याचा क्रमांक सध्यां तरी शेवटचा लागतो. रॉयबाबूंनीं तरी 'प्रेमपत्रा'च्या नांवाखालीं असली चोंयटचा उसवलेली पत्रावळ मांडायला नको होती. हें प्रेमपत्र–भुरट्या मजकुराचें आणि शिवाय नॉटपेडच निघालें !



[ Regd. No. : B 9304




# शिवचरित्र प्रसार योजना

आजच्या आणीबाणीच्या प्रसंगीं

छत्रपति शिवरायांच्या चरित्राचा आणि चारित्र्याचा आदर्श साऱ्या भारतीयांपर्यंत नेऊन पोहोचविणें प्रत्येक मराठी माणसाचें कर्तव्य आहे.

'राजहंस प्रकाशन संस्थे'नें श्री. ब. मो. पुरंदरेकृत **'राजा शिवछत्रपति'** या दशखंडात्मक शिव-चरित्रग्रंथाचा प्रसार करण्याची एक अभिनव व आटोपशीर योजना तयार केली आहे.

आमच्या असंख्य हितचिंतकांना
या योजनेंत
सहभागी होता येण्यासारखें आहे.

कृपया पत्रानें वा समक्ष चौकशी करावी

**राजहंस प्रकाशन संस्था**

४१९ नारायण पेठ, पुणें २.


संपादक–मुद्रक–प्रकाशक : **श्री. ग. माजगांवकर** * प्रकाशनस्थळ : **राजहंस प्रकाशन**, ४१९ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रणस्थळ : **प्रशांत प्रिंटिंग प्रेस**, ४६१ सदाशिव पेठ, पुणें २. * कव्हर छपाई : **उदय मुद्रणालय**, पुणें २.